सोलापूर तरुण भारत
आसमंत



# भारतीय सामर्थ्याचे जागतिक दर्शन

लक्ष्यवेध
प्रतिनिधी

ब्रिक्सची व्याप्ती गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. आज हा समूह ‘उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा मंच’ इतकाच मर्यादित राहिलेला नाही, तर जागतिक अर्थव्यवस्था, व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, वित्त आणि ‘ग्लोबल साऊथ’च्या राजकीय आकांक्षांवर प्रभाव टाकण्याची क्षमता या समूहाने निर्माण केली आहे. अशा वेळी भारताचे चौथ्यांदा अध्यक्षपद स्वीकारणे अतिशय महत्त्वाचे ठरते. भारताने अध्यक्षपदासाठी बिल्डिंग फॉर रेझिलियन्स, इनोव्हेशन, को-ऑपरेशन ॲण्ड सस्टेनेबिलिटी हा मूलमंत्र निवडला आहे. वर्षभर झालेल्या व्यापार, उद्योग, डिजिटल तंत्रज्ञान, आरोग्य, विज्ञान, शेती, पर्यावरण आणि युवकांशी संबंधित बैठकींतून या चारही संकल्पनांना प्रत्यक्ष सहकार्याची दिशा देण्याचा यातून प्रयत्न झाला. म्हणजेच, शिखर परिषद दोन दिवसांची असली, तरी अध्यक्षपदाची प्रक्रिया वर्षभर चालते. तिच्यातून निर्माण होणारे नेटवर्क, प्रस्ताव आणि सहकार्याचे मार्ग हेच प्रत्यक्षफलित ठरू शकतात. या व्यासपीठाच्या माध्यमातून भारताला व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि नवोन्मेषाच्या नव्या शयता खुल्या करता येतात. त्याहून महत्त्वाचे म्हणजे भारतीय स्टार्टअप, डिजिटल व्यवस्था आणि विकासाचा अनुभव ‘ग्लोबल साऊथ’समोर मांडून भारत नेतृत्वाची नवी भूमिका स्वीकारत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘ब्रिक्स’च्या व्यासपीठावर भारताकडे पाहण्याची दृष्टीच बदलण्याचा प्रयत्न केला. भारत ही निव्वळ मोठी लोकसंख्या असलेली बाजारपेठ नाही; तर ती उत्पादन, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषासाठी जागतिक संधींचे केंद्र आहे, हा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेचा झालेला विस्तार, तरुण उद्योजकांची वाढती क्षमता आणि तंत्रज्ञानाच्या आधारे नव्या अर्थव्यवस्थेची उभारणी, याकडेही त्यांनी ‘ब्रिस’ देशांचे लक्ष वेधले. भारताने ‘ब्रिक्स इनयुबेटर नेटवर्क’ आणि ‘ब्रिक्स स्टार्टअप इनोव्हेशन फंड’सारख्या संकल्पना पुढे केल्या आहेत. याचा अर्थ तितकाच महत्त्वाचा आहे. ‘ब्रिक्स’ची चर्चा सरकारे आणि राष्ट्रप्रमुखांपुरती मर्यादित न ठेवता, ती उद्योजक, स्टार्टअप, संशोधक आणि नव्या पिढीच्या अर्थव्यवस्थेपर्यंत नेण्याचा भारताचा प्रयत्न आहे.

याच संदर्भात भारताची ‘डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रचर’ जगासमोर सादर करण्याची संधी भारताला मिळाली. ‘यूपीआय’सारखी व्यवस्था ही भारतातील डिजिटल व्यवहार सुलभ करणारी यंत्रणा राहिलेली नाही, तर ती विकसनशील देशांसाठी डिजिटल समावेशनाचे एक मॉडेल ठरणार आहे. भारताने ‘ब्रिक्स’च्या डिजिटल अजेंड्यात ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’, सायबर सुरक्षा, पुढील पिढीच्या ‘नेटवर्क’ तंत्रज्ञानाबरोबरच स्टार्टअप आणि डिजिटल कौशल्यांना स्थान दिले आहे. भारताचा अनुभव इतर देशांसाठी उपयोगी ठरू शकतो आणि त्याच वेळी इतर देशांच्या अनुभवातून भारतालाही शिकता येते. सहकार्याचा अर्थ हा कधीही एकतर्फी नसतो. अनुभवांची देवाणघेवाण आणि परस्पर क्षमतांची सांगड ही त्याची खरी ताकद असते. त्यामुळे भारत ‘ब्रिक्स’मध्ये काही मागण्यासाठी नाही; तर स्वतःचे यशस्वी मॉडेल मांडण्यासाठीही उभा आहे, असे आज ठामपणे म्हणता येते.

> **‘ब्रिक्स’च्या व्यासपीठावर भारताने आपली कूटनीतिक ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला आहे असे नाही, तर बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेतील आपली भूमिकाही स्पष्ट केली आहे. अर्थव्यवस्था, स्टार्टअप, तंत्रज्ञान, डिजिटल व्यवस्था आणि ‘ग्लोबल साऊथ’च्या आकांक्षांना दिशा देण्याचे ‘ब्रिक्स’च्या व्यासपीठावरुन आवाहन करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय सामर्थ्याचे जागतिक दर्शन घडविले आहे.**



आगामी जागतिक अर्थव्यवस्थेतील स्पर्धेचे स्वरूपही भारताने ‘ब्रिस’च्या चर्चेत पुढे आणले आहे. सेमीकंडटर, क्वांटम तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’, ‘क्रिटिकल मिनरल्स’ आणि ‘रेझिलियंट सप्लाय चेन्स’ ही पुढील दशकातील आर्थिक शक्तीची साधने आहेत.

आज एखाद्या देशाची आर्थिक ताकद त्याच्या कारखान्यांच्या संख्येनेच ठरत नाही; तर त्याला आवश्यक असलेले तंत्रज्ञान आणि कच्चा माल संकटाच्या काळात उपलब्ध राहतील का, यावरही ठरते. त्यामुळे ‘क्रिटिकल मिनरल्स’पासून ‘एआय’पर्यंतच्या क्षेत्रांत ‘ब्रिस’ सहकार्याला धोरणात्मक महत्त्व प्राप्त होते. जागतिक संस्थांमध्ये विकसनशील देशांचा आवाज अधिक प्रभावी व्हावा, व्यापार व्यवस्था अधिक न्याय्य व्हावी आणि विकासासाठी वित्त, तंत्रज्ञान व बाजारपेठांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, हा भारताचा दृष्टिकोन! विविध आर्थिक रचना, वेगवेगळे विकासमार्ग आणि भिन्न राजकीय अनुभव असलेल्या देशांना एका व्यासपीठावर आणून त्यांच्यात व्यवहार्य सहकार्य निर्माण करणे, हेच ‘ब्रिस’समोरचे खरे आव्हान आहे.

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनीही ‘ब्रिस’च्या विविधतेकडे काल आपल्या भाणषातून लक्ष वेधले आहे. प्रत्येक सदस्य देशाची विकासाची स्वतःची वाट, आर्थिक मॉडेल आणि ऐतिहासिक-सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहेत. या विविधतेला अडथळा न मानता सहकार्याची ताकद बनवणे, हे ‘ब्रिक्स’समोरचे मोठे काम आहे. पंतप्रधान मोदी यांच्या भाषणातून भारताची आर्थिक आणि तांत्रिक क्षमता पुढे येते, तर पुतीन यांच्या भूमिकेतून विविध देशांना एका चौकटीत आणण्याचे आव्हानही स्पष्ट होते. या दोन भूमिकांचा संगमच ‘ब्रिक्स’ला अधिक परिणामकारक बनवू शकतो.

मोदी- पुतीन भेट ही याच व्यापक चित्राची महत्त्वाची बाजू आहेत. ‘ब्रिक्स’च्या शिखर परिषदेच्या निमित्ताने होणार्या द्विपक्षीय भेटी हे या व्यासपीठाचे अतिरिक्त सामर्थ्य आहे, असे म्हणता येईल. व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान, संरक्षण किंवा ‘कनेटिव्हिटी’ अशा क्षेत्रांतील चर्चा सामूहिक व्यासपीठाला प्रत्यक्ष आर्थिक परिणामांशी जोडतात. त्यामुळे ‘ब्रिक्स’चा लाभ मोजताना, अंतिम घोषणापत्रात किती निर्णय झाले, एवढाच हिशोब पुरेसा नाही. एका छताखाली अनेक देशांचे नेतृत्व, उद्योग, गुंतवणूकदार आणि धोरणकर्ते एकत्र येतात, ही स्वतःमध्ये मोठी कूटनीतिक आणि आर्थिक संधी आहे. भारताने २०२३च्या ‘जी-२०’ अध्यक्षपदात या क्षमतेचे दर्शन घडवले होते. भारतात जगाला आणणे आणि त्यातून भारतासाठी संधी निर्माण करणे, ही आयोजनाची खरी कसोटी आहे.

भारताने यंदा ‘ब्रिक्स’कडे पाहण्याची हीच व्यापक दृष्टी ठेवली आहे. ‘भारताला जगाकडून काय मिळेल,’ या प्रश्नाइतकेच ‘भारत जगाला काय देऊ शकतो,’ हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. स्टार्टअपपासून डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत, उत्पादनापासून तंत्रज्ञानापर्यंत आणि ‘ग्लोबल साऊथ’च्या आवाजापासून नव्या आर्थिक सहकार्यापर्यंत भारताने स्वतःचा अनुभव मांडला आहे. ‘ब्रिस’चे व्यासपीठ भारतासाठी प्रभाव दाखवण्याचे माध्यम न राहता, भारतीय सामर्थ्याला जागतिक संधींशी जोडण्याचे साधन ठरले; तरच या अध्यक्षपदाचे खरे फलित दिसेल. आजच्या बदलत्या जगात भारताचा आत्मविश्वास हेच त्याचे सर्वांत मोठे कूटनीतिक भांडवल आहे, असे निश्चितपणे म्हणता येईल.

# कुप्रचारावर संस्कृतीचा विजय

लक्ष्यवेध
ओंकार मुळ्ये

**अलीकडच्या काळात जागतिक स्तरावर हिंदू धर्मातील प्राचीन परंपरा आणि धार्मिक मूल्यांना चुकीच्या पद्धतीने सादर करून ‘हिंदूफोबिया’ पसरवण्याचे प्रयत्न वाढताना दिसतात. पॅरिसच्या आयफेल टॉवर परिसरात ‘बॅप्स’ प्रतिनिधी मंडळाच्या भेटीदरम्यान एका धार्मिक परंपरेला ‘लिंगभेद’ आणि ‘असमानता’ यांसारख्या शब्दांचे लेबल लावून जागतिक स्तरावर बदनाम करण्याचा प्रयत्न केला गेला.**

हा प्रकार केवळ एका संस्थेविरुद्ध नव्हता, तर हिंदू संस्कृती आणि परंपरांबद्दल समाजात पूर्वग्रह निर्माण करण्याच्या कुटिल कटाचा भाग होता. मात्र, याच फ्रान्समधील बुसी-सेंट-जॉर्जेस येथे नुकत्याच उभारलेल्या नव्याने ‘बॅप्स’ स्वामीनारायण हिंदू मंदिरात दि. १० सप्टेंबर रोजी पार पडलेला ‘इंडो-फ्रेंच कल्चरल ओपन डे’ हा अशा अजेंडा रेटणार्यांसाठी एक अत्यंत सणसणीत आणि सकारात्मक उत्तर ठरला आहे. ‘युनेस्को’मधील भारताच्या स्थायी प्रतिनिधी मंडळाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात युरोप, आफ्रिका, आशिया, अरब देश, अमेरिका आणि कॅरिबियन प्रदेशातील तब्बल ४३ देशांचे राजदूत, मुत्सद्दी आणि प्रतिनिधी एकत्र आले. ज्या परंपरेला बदनाम करण्याचे षड्यंत्र रचले गेले, त्याच परंपरेच्या मंदिरात विविध संस्कृती आणि धर्मांचे जागतिक जागतिक प्रतिनिधी एकत्र आले. या कार्यक्रमाने हे सिद्ध केले की, हिंदू संस्कृती ही कोणालाही वेगळे पाडणारी नसून ‘वसुधैव कुटुम्बकम्’ या तत्त्वावर आधारलेली आहे. यापूर्वीही अमेरिका, कॅनडा, ब्रिटन आणि युरोपमधील विविध देशांमध्ये हिंदू मंदिरांवर होणारे हल्ले, सणांवर होणारी टीका आणि धार्मिक नियमांचा विपर्यास करून केला जाणारा दुष्प्रचार या घटनांमधून ‘हिंदूफोबिया’चे विदारक स्वरूप समोर आले आहे. निष्पाप परंपरांना जाणीवपूर्वक वादाच्या भोवर्यात ढकलणे, भारतीय मूल्यांना मागासलेले ठरवणे आणि सामाजिक माध्यमांवर हिंदू धर्माविरोधात द्वेष पसरवणे, हे या अजेंड्याचे प्रमुख हत्यार राहिले आहे.

हिंदू धर्माची सर्वांत मोठी ताकद म्हणजे, त्याचा संयम आणि सर्वसमावेशकता. वादाला वादाने उत्तर न देता, आपल्या कृतीतून आणि सेवेच्या माध्यमातून संस्कृतीचे श्रेष्ठत्व दाखवून देणे, हाच या ‘फोबिया’वर उत्तम उपाय आहे. बुसी-सेंट-जॉर्जेस येथील मंदिराने जगाला हे दाखवून दिले की, कुप्रचाराला उत्तर देण्यासाठी जागतिक व्यासपीठांवर सांस्कृतिक देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. हिंदू मंदिरे ही केवळ उपासनेची ठिकाणे नसून ती शांतता, एकता आणि मानवी मूल्यांचे केंद्र आहेत. आयफेल टॉवरच्या छायेत झालेला दुष्प्रचार एका बाजूला आणि ४३ देशांच्या जागतिक प्रतिनिधींनी स्वामीनारायण मंदिरात दिलेली एकत्र हजेरी दुसर्या बाजूला या घटनेने हे स्पष्ट केले आहे की, कुटिल हेतूने पसरवलेला हिंदूद्वेष तात्पुरता भ्रम निर्माण करू शकतो; परंतु हिंदू संस्कृतीची सर्वसमावेशक आणि वैश्विक सत्यता शेवटी जिंकते.

जेव्हा काही ठरावीक विचारसरणीचे लोक हिंदू धर्मातील विविध परंपरांचा विपर्यास करून त्याला संकुचित, भेदभाव करणारा आणि लिंगभेदावर आधारित ठरवण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा असा दुष्प्रचार फार काळ टिकत नाही. कोणत्याही द्वेषाला वा वादाला सामोरे न जाता, प्रेम, सेवा आणि वैश्विक बंधुत्वाच्या बळावर दिलेले हे प्रत्युत्तर ‘वसुधैव कुटुम्बकम्’ या मूल्याची खरी ताकद दर्शवते. जागतिक स्तरावर अजेंडा चालवून हिंदू संस्कृतीची प्रतिमा मलीन करू पाहणार्यांसाठी ही एक वैचारिक आणि सांस्कृतिक पातळीवरील सणसणीत चपराक आहे.

शेवटी, हे स्पष्ट होते की सत्याचा मार्ग आणि संस्कृतीची खरी शक्ती ही कोणत्याही दुष्प्रचारापेक्षा कितीतरी पटींनी मोठी असते. फ्रान्समधील या घटनेने जागतिक पटलावर हे सिद्ध केले आहे की, हिंदू संस्कृतीविरुद्ध रचलेले वैचारिक कट आणि पसरव-लेला ‘हिंदूफोबिया’ हा एका सकारात्मक, सेवाभावी आणि उदार दृष्टिकोनासमोर निरर्थक ठरतो. पॅरिसच्या भूमीवरून दिलेला हा संदेश केवळ एका मंदिराचा किंवा एका कार्यक्रमाचा विजय नाही, तर तो भारत आणि त्याच्या हजारो वर्षांच्या उदात्त परंपरेचा विजय आहे. आज जगाला अशाच सर्वसमावेशक विचारांची गरज आहे आणि हेच मूल्य जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत कोणताही कुप्रचार किंवा अपप्रचार या वैश्विक परंपरेला बाधा आणू शकणार नाही.





# फोडणारेच फुटीच्या उंबरठ्यावर!

**युनायटेड किंगडमच्या भवितव्याचा प्रश्न, पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंडमधील सत्ताधार्यांनी एकत्र येत, त्यांच्या प्रदेशांना आत्मनिर्णयाचा अधिकार असल्याचे अलीकडेच कार्डिफ येथील परिषदेत ठामपणे सांगितले. तसेच, ब्रिटनच्या संसदीय सरकार प्रणालीतून बाहेर पडण्याबाबतच्या सामंजस्य करारावरही तिन्ही देशांच्या नेत्यांनी स्वाक्षरी केली आहे.**

परराष्ट्रकारण
कौस्तुभ वीरकर

स्वतंत्र होण्यासाठी सार्वमत घेण्याची मागणी ही आजची असली, तरी तिची मुळेही आजची नाहीत. ब्रिटनची राजकीय रचनाच मुळी, एका राष्ट्राच्या स्वाभाविक एकीकरणातून निर्माण झालेली नाही; ती अनेक शतकांच्या राजकीय व्यवहारांची परिणती आहे. त्यामुळे आज तिच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे, हे अगदीच अनपेक्षित नाही. १६०३ मध्ये स्कॉटलंडचा राजा जेम्स सहावा इंग्लंडच्या सिंहासनावर, जेम्स पहिला म्हणून आरूढ झाला. तेव्हा दोन राज्यांचे राजमुकुट एक झाले; परंतु दोन्ही राज्ये स्वतंत्रच राहिली. १७०७ मध्ये इंग्लंड आणि स्कॉटलंड संसदेने ‘युनियन ॲट’ मंजूर केल्यावर, ग्रेट ब्रिटनचे एक राज्य व एक संसद अस्तित्वात आली. या संघामागे भावनिक एकात्मतेबरोबर, व्यापार, राजकीय स्थैर्य, उत्तराधिकाराचा प्रश्न आणि स्कॉटलंडच्या आर्थिक अडचणींसारखी अनेक कारणे होती. १८०१ मध्ये आयर्लंडही याच संघात सामील झाल्यावर, ‘युनायटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन ॲण्ड आयर्लंड’ अस्तित्वात आले. मात्र, आयरिश प्रश्नाचा शेवट एकीकरणात झाला नाही. १९२१ नंतर आयर्लंडचा बहुतांश भाग स्वतंत्र झाला आणि उत्तर आयर्लंड ब्रिटनमध्ये राहिले. तेव्हापासूनच ‘युनायटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन ॲण्ड नॉर्दर्न आयर्लंड’ हीच रचना अस्तित्वात आहे. म्हणून, ब्रिटनची एकता ही एखाद्या एकभाषिक, एकजातीय राष्ट्राची नाही. स्कॉटलंडला स्वतःची ऐतिहासिक राजसत्ता, कायदेव्यवस्था आणि राष्ट्रीय ओळख आहे. वेल्सची स्वतंत्र भाषिक, सांस्कृतिक परंपरा आहे. उत्तर आयर्लंडचा प्रश्न तर ब्रिटिश आणि आयरिश राष्ट्रवादाच्या प्रदीर्घ संघर्षाशीच जोडलेला आहे.


१९९८च्या ‘गुड फ्रायडे करारा’ने उत्तर आयर्लंडच्या भवितव्याचा निर्णय लोकशाही पद्धतीने घेण्याची, घटनात्मक वाटच खुली ठेवली.

(पान ६ वर)

राष्ट्ररक्षा

हेमंत महाजन

# बदलते युद्धस्वरूप आणि भारताची सुरक्षा!



> रणांगणाऐवजी थेट समाजामध्ये लढले जाते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शत्रू जनतेला संभ्रमित करून, युद्ध जिंकू शकतो. त्यामुळे या धोक्याकडे सजगपणे बघणे आवश्यक झाले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर बदलत्या तंत्रज्ञानाचे वाढते धोके आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा या संदर्भात परिस्थितीचा मागोवा घेणारा हा लेख...

चीन, पाकिस्तान, डीप स्टेट, वेस्टन वर्ल्डमधले काही देश भारताचे शत्रू आहेत. यांना भारताची प्रगती खुपते. या देशांचे भारतामधील हस्तक, समाज माध्यमांचा गैरवापर करून, भारताविरुद्ध नॅरेटिव्ह युद्ध, माहिती युद्ध लढत आहेत. समाज माध्यम हे अलीकडे, युवकांचे माहितीचे मुख्य साधन झाले आहे. अनेक तरुण वर्तमानपत्र किंवा दूरदर्शनपेक्षा इन्स्टाग्राम वरील रील्स, युट्यूबफ शॉर्ट्स, व्हॉट्सॲप फॉरवर्ड्स किंवा इन्फ्लुएन्सर व्हिडिओंमधूनच माहिती घेतात. यातील समस्या अशी की, समाज माध्यमांचे अल्गोरिदम लोकांचे लक्ष वेधणारी सामग्रीच पुढे ढकलतात. त्यामुळेच राग, भीती, धक्का किंवा द्वेष निर्माण करणारी सामग्री अधिक वेगाने पसरते.

**यातून पुढील परिणाम होतात:**

समाजात ध्रुवीकरण वाढते. लोक एकमेकांविषयी संशयी होतात. संस्थांवरील विश्वास कमी होतो. कट्टर विचारसरणीला बळ मिळते. लोकशाही संवाद कमकुवत होतो. यालाच अटेंशन इकॉनॉमीचे दुष्परिणाम म्हटले जाते.

**भारतीय युवक : सर्वांत मोठे लक्ष्य**

भारताची जवळपास निम्मी लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. त्यामुळे भारतीय युवक हे माहिती युद्धातील प्रमुख लक्ष्य ठरतात. ऑनलाईन गेमिंग, इन्फ्लुएन्सर संस्कृती, मनोरंजन आणि डिजिटल जाहिरातीच्या माध्यमातून, युवकांच्या विचारांना प्रभावित केले जाते. कधी कधी हे प्रभाव सांस्कृतिक, सामाजिक किंवा आर्थिक स्वरूपाचेही असतात. काही वेळा युवक नकळतपणे, चुकीची माहिती पुढे पाठवतात. अनेकदा माहितीची पडताळणी न करताच, ती पुढे पाठवली जाते. त्यामुळे प्रत्येक युवक हा माहिती युद्धातील संभाव्य सैनिक किंवा लक्ष्य असू शकतो.

**राष्ट्रीय सुरक्षेवरील परिणाम:**

भविष्यातील युद्धांत शत्रूला, भारतीय सीमांना लक्ष्य करण्याची गरज नाही. तो भारतीय समाजामध्येच अविश्वास, अस्थिरता आणि विभाजनाद्वारे नुकसान करु शकतो. अफवांच्या आधारे सांप्रदायिक दंगली भडकवणे, निवडणुकां प्रभावित करणे, आर्थिक घबराट निर्माण करणे, सशस्त्र दलांच्या मनोबलाचे खच्चीकरण करणे, सरकारवरील विश्वासावरही प्रहार करता येतो. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न केवळ सीमांच्या सुरक्षेपुरताच मर्यादित नाही. तो मानसशास्त्र आणि सामाजिक एकतेशीही जोडला जातो.

**भारताविरुद्धचे नवीन रणांगण :**

अलीकडे युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. आज मात्र एखाद्या देशाच्या नागरिकांच्या मनामध्ये शंका, अविश्वास, भीती आणि गोंधळ निर्माण करणेही, युद्धातील प्रभावी शस्त्र झाले आहे. यालाच संज्ञानात्मक युद्ध किंवा नॅरेटिव्ह युद्ध म्हणतात. भारतासारख्या लोकशाही देशात हे युद्ध, विशेषतः धोकादायक ठरते. भारतात ९० कोटींपेक्षा अधिक इंटरनेट वापरकर्ते असून, अनेक भाषा, विविध धर्म, जाती, प्रादेशिक अस्मिता आहेत. त्यामुळे भारत हा माहिती युद्धासाठी एक सोप्पे लक्ष्य ठरतो.

**चीनचे थ्री वॉरफेअर्स आणि मनांवरील नियंत्रण:**

चीनने अनेक वर्षांपूर्वीच, तीन प्रकारच्या युद्धांची संकल्पना विकसित केली आहे. त्यामध्ये जनमत युद्ध, मानसशास्त्रीय युद्ध, कायदेशीर युद्धाचा समावेश होतो. चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीचे उद्दिष्ट प्रतिस्पर्धी राष्ट्राच्या निर्णय क्षमतेवर आणि सामाजिक एकतेवर प्रभाव टाकण्याचे आहे. अभ्यासांनुसार, चीन मनांवरही प्रभुत्व मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे. समाज माध्यम, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, बॉट नेटवर्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करून, माहितीवर नियंत्रण मिळवण्याचा त्याचा उद्देश आहे. गलवान संघर्षानंतर भारताविरुद्ध दिशाभूल करणाऱ्या बातम्या, व्हिडिओ आणि समाज माध्यम मोहिमा राबवल्याचे समोर आले होते. याचा उद्देश चीनच्या कृतींना योग्य ठरवणे हाच.

**पाकिस्तानचे नॅरेटिव्ह युद्ध :**

पाकिस्तान अनेक दशकांपासून भारताविरुद्ध माहिती युद्धाचा वापर करत आहे. काश्मीर-प्रश्न, मानवाधिकार, धार्मिक ध्रुवीकरण आणि दहशतवादांसारख्या मुद्द्यांवर, जागतिक मतप्रवाह प्रभावित करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. कारगिल युद्धादरम्यान सुरुवातीच्या काळात, पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय स्तरावर दिशाभूल करणारे कथानक निर्मितीचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे समाज माध्यमाच्या युगात बॉट नेटवर्स आणि खोट्या प्रचार मोहिमांद्वारे, भारताविरुद्ध वातावरण तयार करण्याचे प्रयत्न अनेकदा दिसले आहेत. २०२५ मधील भारत-पाकिस्तान संघर्ष काळात, दोन्ही बाजूंनी डीपफेक व्हिडिओ, कृत्रिम ऑडिओ संदेश आणि दिशाभूल करणाऱ्या दृश्यांचा वापर झाला. यामुळेच युद्ध माहितीच्या क्षेत्रातही लढले जात असल्याचे स्पष्ट झाले.

**डीपफेसफ : सत्य आणि असत्यातील सीमारेषा पुसणारे शस्त्र :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तयार केलेले डीपफेक व्हिडिओ आणि ऑडिओ, हे नव्या युद्धातील सर्वांत धोकादायक शस्त्र. एखादा नेता, लष्करी अधिकारी, प्रत्यक्षात कधीही न बोललेले शब्द बोलताना दाखवणे, आता तांत्रिकदृष्ट्या शय आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना सत्य आणि असत्यांमधील फरक करणे, कठीण होत आहे.

२०२६ मध्ये पश्चिम आशियातील संघर्षाच्या संदर्भात, भारतातील वरिष्ठ नेत्यांचे आणि अधिकार्यांचे कथित व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसिद्ध झाले होते. नंतर ते कृत्रिमरीत्या तयार केलेले असल्याचे आढळले. अशाच घटनांमुळे काही मिनिटांत, लाखो लोकांची दिशाभूल होऊ शकते.

**भारताने काय करावे?**

संज्ञानात्मक युद्ध, डीपफेस, कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे दिशाभूल करणारी माहिती आणि अल्गोरिदमंचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी, भारताने बहुआयामी आणि दीर्घकालीन रणनीती अंगीकारली पाहिजे. सर्वप्रथम शालेय आणि महाविद्यालयीन स्तरातूनच, डिजिटल साक्षरता अनिवार्य करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना माहितीची सत्यता कशी पडताळायची, डीपफेक कसे ओळखायचे, अल्गोरिदमची कार्यपद्धती आणि ऑनलाईन प्रचार मोहिमांचे मानसशास्त्राचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

दुसरे म्हणजे, भारताने डीपफेक आणि एआयवर आधारित दिशाभूल शोधण्यासाठी, स्वदेशी साधनांच्या विकासासाठी गुंतवणूक करणेही आवश्यक आहे.

केंद्र सरकारच्या माध्यमातून, विविध योजनांद्वारे अनेक प्रकल्प सध्या सुरू आहेत. तिसरे म्हणजे, भारतातील सर्व प्रमुख भाषांमध्ये तथ्य पडताळणी यंत्रणेचा विकास करणे आवश्यक आहे. चौथे म्हणजे, सीमावाद, दहशतवादी हल्ले, सांप्रदायिक तणाव किंवा नैसर्गिक आपत्ती यांसारख्या राष्ट्रीय संकटांच्या वेळी सरकारने जलद आणि विश्वासार्ह माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. माहितीचा अभाव हा अफवा आणि दुष्प्रचाराला खतपाणी घालतो.

पाचवे म्हणजे, समाजमाध्यम कंपन्यांना त्यांच्या अल्गोरिदम प्रणाली आणि डीपफेक सामग्रीबाबत अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी बनवणे आवश्यक आहे. भारताने डिजिटल प्लॅटफॉर्मच्या जबाबदारीसंदर्भात आधीच काही नियम लागू केले असून, एआयनिर्मित सामग्रीसाठी लेबलिंग आणि मेटाडेटा सारख्या उपाययोजनांना प्रोत्साहन दिले जात आहे.

आजचा शत्रू केवळ संगणक प्रणालींवर हल्ला करत नाही, तर नागरिकांच्या मनांवर आणि समाजाच्या विचारविश्वावरही प्रभाव टाकतो. त्यामुळे सशस्त्र सेना, गुप्तचर संस्था, शैक्षणिक क्षेत्र, तंत्रज्ञान उद्योग आणि माध्यम संस्था यांच्यात समन्वय वाढवणे आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे भारताने सकारात्मक, तथ्याधारित सत्य समाजासमोर मांडली पाहिजेत.

भारतीय युवकांचे विविध क्षेत्रातील योगदान प्रभावीपणे जगासमोर आणले पाहिजे. संज्ञानात्मक युद्धाच्या या नव्या युगात भारताची सर्वांत मोठी शक्ती म्हणजे सुशिक्षित, माहिती- सजग आणि राष्ट्रीय हितांविषयी जागरूक नागरिक समाजनिर्मिती होय. एकविसाव्या शतकातील युद्धामध्ये सैन्य आणि सैनिक जितके महत्त्वाचे, तितकीच महत्त्वाची माहिती आणि मनांवरील पकडही. चीन आणि पाकिस्तानसारखे प्रतिस्पर्धी, याक्षेत्रात सातत्याने गुंतवणूक करीत आहेत. त्यामुळे भारतानेही संज्ञानात्मक सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेची नवीन सीमा म्हणून स्वीकारली पाहिजे. भविष्यातील युद्धाचा निकाल नागरिकांच्या मनामध्ये, मोबाईलच्या स्क्रीनवर आणि डिजिटल विश्वातील माहितीच्या प्रवाहात ठरणार आहे. म्हणूनच सजग नागरिक, जबाबदार माध्यमे, तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय एकात्मता हेच भारताचे सर्वांत प्रभावी संरक्षण कवच ठरणार आहे.

---

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर

# बालविवाह : गुन्हा असूनही सुरूच




भारतात बालविवाहाला स्पष्टपणे कायद्याने प्रतिबंध केला असतानाही ही प्रथा कायम राहणे म्हणजे कायदा आणि सामाजिक वास्तव यांच्यातील दरी अद्याप भरून निघालेली नाही, याची जाणीव करून देणारे वास्तव. भारताने बालविवाहाविरोधात कायदा केला, जनजागृती केली, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या योजना राबविल्या आणि प्रतिबंधात्मक यंत्रणा उभी केली. या प्रयत्नांचा परिणामही दिसतो. मात्र, उपलब्ध ताज्या आकडेवारीकडे पाहिले तर प्रगती झाली असली, तरी अंतिम लक्ष्य अद्याप दूर आहे.

**ग्रामीण भारताची मोठी दरी:** बालविवाहाच्या प्रश्नात ग्रामीण- शहरी दरी अजूनही स्पष्ट दिसते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण- ६ नुसार २० ते २४ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये १८ वर्षांपूर्वी विवाह झाल्याचे प्रमाण ग्रामीण भागात २३.३ टक्के तर शहरी भागात ११.४ टक्के आहे. याचा अर्थ ग्रामीण समाज दोषी आणि शहरी समाज निर्दोष असा अजिबात नाही. बालविवाहामागे गरिबी, शिक्षणाची अपुरी उपलब्धता, मुलींच्या सुरक्षिततेविषयीची चुकीची धारणा, सामाजिक दबाव, कौटुंबिक आर्थिक असुरक्षितता आणि रूढी-परंपरांचे अंधानुकरण अशी अनेक कारणे एकत्र काम करतात. कायद्याने मात्र यापैकी कोणतेही कारण बालविवाहाचे समर्थन मानलेले नाही.

**कायदा स्पष्ट; मग बालविवाह का?**

बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ हा या समस्येविरोधातील भारताचा प्रमुख कायदेशीर आधार आहे. या कायद्यानुसार मुलगा २१ वर्षांखालील आणि मुलगी १८ वर्षांखालील असल्यास त्या विवाहाला बालविवाहाच्या कक्षेत आणले जाते. बालविवाह लावणे, त्याला प्रोत्साहन देणे किंवा तो घडवून आणण्यास मदत करणे यासाठी दंडात्मक तरतुदी आहेत. महाराष्ट्राच्या महिला व बाल विकास विभागानेही हा कायदा महत्त्वाच्या बालकेंद्री कायद्यांमध्ये समाविष्ट केला आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांची तरतूद आहे. त्यांचे काम केवळ विवाह थांबविणे नसून संभाव्य बालविवाह रोखणे, पुरावे गोळा करणे, कुटुंबांचे समुपदेशन करणे आणि समाजात जनजागृती करणे असेही आहे. केंद्र सरकारने संसदेत दिलेल्या माहितीनुसार, कायद्याच्या कलम १६ अंतर्गत राज्य सरकारांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी नियुक्त करण्याचा अधिकार आहे. मग प्रश्न असा कायदा इतका स्पष्ट असताना बालविवाह थांबत का नाहीत? कारण बालविवाह हा अनेकदा घराच्या चार भिंतींच्या आत घेतलेला निर्णय असतो. विवाहाच्या आधीच मुलीची शाळा बंद होते, तिच्या शिक्षणाबाबत निर्णय घेतला जातो, नातेवाईकांमध्ये बोलणी सुरू होतात आणि अखेरीस लग्न ठरते. प्रशासनाला माहिती मिळेपर्यंत उशीर झालेला असतो. याच ठिकाणी प्रतिबंधात्मक यंत्रणेची खरी कसोटी आहे.

**गुन्हे नोंदले जातात; पण त्यातून काय दिसते?** राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या क्राईम इन इंडिया अहवालानुसार २०२३ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत देशभरात ६, ०३८ प्रकरणे नोंदविली गेली. ही संख्या २०२२ मधील १,००२ आणि २०२१ मधील १,०५० प्रकरणांपेक्षा मोठी आहे. या वाढीकडे पाहताना एक महत्त्वाची सावधगिरी आवश्यक आहे. नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या वाढली म्हणजे प्रत्यक्ष बालविवाह त्याच प्रमाणात वाढले, असा सरळ निष्कर्ष काढता येत नाही. केंद्र सरकारने संसदेत स्पष्ट केले आहे की, वाढलेली नोंद ही सुधारलेली माहिती- नोंदणी व्यवस्था आणि वाढलेली जनजागृती यांचाही परिणाम असू शकते. म्हणूनच बालविवाहावरील चर्चेत दोन वेगवेगळे प्रश्न कायम वेगळे ठेवले पाहिजे- बालविवाह किती होतात आणि त्यापैकी किती प्रशासनाच्या नोंदीत येतात?

**महाराष्ट्र: घट झाली, पण प्रश्न संपलेला नाही :** महाराष्ट्रातही बालविवाहाच्या प्रमाणात घट झाली आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण - ५ मध्ये २० ते २४ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये १८ वर्षांपूर्वी विवाहाचे प्रमाण २१.९ टक्के होते. NFH-६ मध्ये ते १९.७ टक्क्यांवर आले. म्हणजे सुधारणा झाली आहे; पण जवळपास प्रत्येक पाचव्या तरुण महिलेचा विवाह १८ वर्षांपूर्वी झाल्याचे सर्वेक्षण सांगते.

**न्यायव्यवस्थेतील एक कठीण प्रश्न:**

बालविवाह प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी केवळ विवाह रोखण्यापुरती मर्यादित नाही. गुन्हा नोंदवला गेल्यानंतर तपास, आरोपपत्र, खटला आणि दोषसिद्धी या सर्व टप्प्यांना महत्त्व आहे. महाराष्ट्राबाबत केंद्र सरकारने लोकसभेत दिलेल्या अधिकृत माहितीनुसार २०२३ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायद्याखाली ९३ प्रकरणे नोंदवली गेली, ८६ प्रकरणांत आरोपपत्र दाखल झाले, ९ खटले पूर्ण झाले; मात्र एकाही प्रकरणात दोषसिद्धी झाली नाही. या आकडेवारीवरून मकायदा अपयशी ठरलाफ असा सरळ नष्किर्ष काढणे योग्य नाही. कारण ९३ गुन्हे नोंदवले गेले म्हणून ९३ खटल्यांचा त्याच वर्षी निकाल लागेलच असे नाही. न्यायालयीन प्रक्रियेला वेळ लागतो. मात्र तपासाची गुणवत्ता, पुरावे, साक्षीदार, कायदेशीर मदत आणि खटल्यांच्या गतीचा प्रश्न यामुळे नक्कीच उपस्थित होतो.

**विवाहाच्या दिवशी नव्हे, त्याआधी हस्तक्षेप हवा:**

बालविवाह रोखण्यासाठी केवळ विवाहाच्या दिवशी धाव घेऊन उपयोग नाही. मुलगी शाळेतून बाहेर पडते तो दिवस अनेकदा बालविवाहाचा पहिला इशारा असू शकतो. शाळेत अनुपस्थिती वाढणे, अचानक शिक्षण थांबणे, कुटुंबाचे स्थलांतर, किशोरवयीन मुलीच्या विवाहाची चर्चा सुरू होणे या संकेतांकडे शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत, बाल संरक्षण यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाने एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे.

**मुलीला विचारले जाते का- तुला काय हवे आहे?**

बालविवाह रोखण्याच्या प्रयत्नात मुलीचा आवाज केंद्रस्थानी असला पाहिजे. मुलगी ही कुटुंबाची केवळ जबाबदारी नाही; ती स्वतःचे अधिकार असलेली व्यक्ती आहे. तिला शिक्षणाचा, आरोग्याचा, संरक्षणाचा आणि स्वतःच्या भवितव्याबद्दल मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. लहान वयात विवाह झाल्यास मुलीचे शिक्षण खंडित होऊ शकते आणि तिच्यावर लवकर वैवाहिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या येऊ शकतात. त्यामुळे बालविवाहाविरोधातील लढा हा प्रत्यक्षात बालकाच्या शिक्षणाच्या, आरोग्याच्या, संरक्षणाच्या आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचा लढा आहे. भारताने प्रगती केली आहे, हे नाकारता येणार नाही. २००५-०६ मध्ये २० ते २४ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये १८ वर्षांपूर्वी विवाहाचे प्रमाण ४७.४ टक्के होते. ते NFH- 5 मध्ये २३.३ टक्के आणि NFH- 6 मध्ये २०.१ टक्क्यांवर आले. हा बदल महत्त्वाचा आहे. पण हा बदल आपल्याला समाधानासाठी नव्हे, तर पुढील टप्प्यासाठी प्रेरणा देणारा असला पाहिजे. आजची खरी गरज बालविवाह रोखण्यासाठी आणखी कायदे एवढीच नाही. कायदा आहे. यंत्रणा आहे. प्रतिबंधक अधिकारी आहेत. जनजागृतीची साधने आहेत. आता प्रश्न आहे. ही व्यवस्था मुलीपर्यंत विवाह ठरण्यापूर्वी पोहोचते का? बालविवाहाचा मंडप उभा राहिल्यानंतर पोलिस किंवा प्रशासन पोहोचण्यापेक्षा, त्या मंडपाची तयारी सुरू होण्यापूर्वी समाज जागा झाला पाहिजे.

---

# विवंचना



कथा

क्मिता भोयटे

भारतने बैलांना चारा पाणी केले. गोठ्यातील झाडझूड, शेणपाणी असताना मालकाचा आला,

अरे भारत, आपला चण्याचा नंबर लागला आहे. उद्या मेटॅडोर पाहून ठेव.

उद्याच का जी?

हो, दोन महिने झाले नंबर लावला होता नाफेडला ऑनलाईन. आत्ताच मॅसेज आला, उद्या चणा घेऊन या म्हणून.

मालक, मेटॅडोर किती सांगू?

अरे, एका सातबारावर २५ क्विंटल माल घेतात. आपला तर दीडशे क्विंटल आहे. बाकीच्या मालाचं कसं?

ए बाबा, आम्ही दोघे व दोन मुले मिळून चार खात्यावर शंभर क्विंटल देऊ शकतो.

माल गाडीत भराले पोर सांगतो जी, संध्याकाळी गाड्या भरल्या तर मार्केटमध्ये सकाळी लवकर नंबर लागलं नं.

दोघेही मेटॅडोर पाहू लागले, पण अडचणी येत होत्या. इकडे तिकडे फोनाफोनी करून कसेतरी तीन मेटॅडोर मिळाले. तर काय, नाफेडमधून फोन आला. खूप गर्दी आहे. दोन दिवसांनी माल आणा. भारत म्हणाला, बरं झालं जी, आपण माल भरला नाही. नाही तर आगाऊचाच खर्च झाला असता.

नितीन, गज्जू, भारत आवतं सोडून झाडाखाली भाकर खायला बसले. तेव्हा नितीन म्हणाला, अवंदा सोयाबीन पार गेलं. पण बरं झाल चणा चांगला पिकला, न सरकारने भावही चांगला देल्हा, पण व्यापारी आमच्या मुंड्या मुरगाळते. सरकारी भाव ५ हजार ३० रुपये आहे तर व्यापाऱ्याचा भाव ४ हजार २०० रुपये आहे. एका क्विंटलवर एक हजाराचं नुकसान होते. एवढा तोटा कसा शेतकरी सहन करन ब्बा! भाकरीचा बोकना भरत गज्जू बोलला, एवढे दिवस मी थांबू शकत नाही. नाफेड पैसे एक महिन्याने देते, बहिणीचं ऑपरेशन झालं, घरी बुढ्ढी बिमार हाय, पैशाची भाई अडचन हाय राजा. व्यापार्याला देल्या बगर गत्यंतर नाही. नितीन म्हणे, पोरीले शाळेत घाला लागते, पोट्टं सायकल घेऊन मांगत हाय, बायकोले लग्नाले जायचे आहे. आहेर, आंदण घ्या लागन. पैशाबगर कसं भागन राव? भारत म्हणे, बैलाले पाणी पाजून येतो गड्या! नदीवर बायका धुणं धूत होत्या. कोणी पाणी भरत होत्या, वाघाडी नदीले हात जोडून तो म्हणे, माय, तू लक्ष ठेव, पोटभर दाणा पाणी मिळू दे... अशी प्रार्थना करून ढोरं बंड्यात बांधून घरी गेला. घरी नुक्तच लगन झालेली पोरगी पूनम आली होती. खराब झाली होती. लग्नाच्या वेळी गोरीपान केळीवानी भरदार पोरगी पार चिपाड झाली होती. गाल पार आत गेले होते. पोरीची पार रयाच गेली होती. पाहून बापाचं काळीज तीळतीळ तुटलं. सालदार होता मालकाकडे. चार एकर घरच्या जमिनीवर भागत नव्हते. पोटतिडकीनं बाप विचारू लागला, बाय, काय झालं? तुझ्या मनातलं आमच्या जवळ उकलवाकल कर बेटा. पूनम रडत म्हणाली, बापू, मी नाही जात त्या घरी. नवरा दारू पिऊन मारझोड करतो अन् सासू मोठी पाजी हाय जी! तशी सावित्री कातावून बोलली, जात नाही म्हणजे? तुह का इथसा लोणचं घालू का? तसा भारत बायकोला म्हणे, ऐ तू चूप राहा. मलेच चूप करा. अजून दोन पोरी उजवायच्या आहे, हे घरी येऊन बसली तर लोक काय म्हणल, पूनमचे बापू? रडतच सावित्री बोलली. ये थोडं धीरानं घे! काढू काही तरी मार्ग. उद्या पोरीले पहिले दवाखान्यात दाखव; मग बाकीचे पाहू. कास्तकाराच्या जिंदगानीले गरिबीचे ठिगळ लागलेलंच आहे, पण हे लोक फाटलेले शिवण्यापेक्षा त्याले बोट घालून मोठे करते अन् असे अनेक संघर्षाचे गाठोडे बांधून आपल्या रिकाम्या धान्याच्या कणगीत, पेवात भरून ठेवतो. दुसऱ्या दिवशी मालकाचा फोन आला,

भारत, आज रात्री मेटॅडोर भरू. तू सगळं तयार ठेव. माल भरायला रात्रीचा १ वाजला. थकून सगळे तिथेच झोपले व पहाटेच गाड्या निघाल्या. सकाळी १० वाजता नाफेडला पोहोचले तर गेटला कुलूप होते. तोपर्यंत न्याहारी केली सर्वांनी. ११ वाजले तरी गेट उघडले नाही. १२... मग १ वाजला तेव्हा वाट पाहून पाहून मालकाने अध्यक्षाला फोन लावला. तेव्हा ते म्हणाले, साहेब, वरून आत्ताच आदेश आला. (पान ६ वर)

वळणावरच्या नोंदी

**स्वाती काळे**

मार्कोने त्याच्या प्रवासात अनेक धर्मांचे लोक पाहिले. शेकडो पंथांचा अभ्यास केला. मध्यपूर्व आशियात फिरताना तो इस्मायली या शिया पंथाच्या उपपंथाबद्दल माहिती देतो आणि त्यावेळचा प्रमुख अल्लाउद्दीनच्या प्रसिद्ध आलामत किल्ल्याचे सविस्तर वर्णन करतो. किल्ल्यात त्याने कुराणातल्या नंदनवनासारखी जागा करवून घेतली होती. तेथे स्त्रिया पर्यांसारख्या नांदत. तरुणांना अत्युच्च समृद्धी दाखवून अमली पदार्थांच्या साह्याने तो कह्यात ठेवायचा आणि आजूबाजूच्या सत्ताधार्यांचे खून घडवून आणायचा. अखेरीस हलाकूने त्याच्या सैन्याचा बीमोड केला आणि ते नंदनवन उद्ध्वस्त केले.मार्कोच्या प्रवासात अनेक संकटे आली. तो सांगतो की, वाळवंटी टप्प्यामध्ये कुठेही पाणी दिसत नाही.

प्रवाश्याला ते स्वतःजवळ ठेवावे लागते. मजल- दरमजल करीत तो अफगाणिस्तानच्या मशेबरघानफ ला पोहोचला. येथे जगातील सर्वश्रेष्ठ खरबुजे मिळतात. अफगाणी लोक खरबुजांच्या तुकड्यांना वाळवतात आणि या गोड तुकड्यांना जगातून मागणी असते. पर्शियाच्या सीमेवर बल्ख शहर वसलेले आहे. एकेकाळी अंगावर भरपूर दागिने घालतात, करतात आणि कलाकुसरीत अतिशय निपुण आहेत. येथून पुढचा मार्ग काश्मीरचा आहे. काश्मीरचे लोक मूर्तिपूजक आहेत आणि जादूटोणा करतात. त्यांचे देव त्यांच्याशी बोलतात. काश्मीरबद्दल सांगण्यासारखे खूप आहे, पण मार्को तेथून वळसा घालून १२ दिवसांचा प्रवास करीत वाखानला आणि नंतर पुन्हा १२ दिवसांचा प्रवास करून पामीरच्या पठारावर आला. मध्य आशियातील या प्रदेशाला त्याच्या उंचीमुळे जगाचे छप्पर असेही म्हणतात. एवढ्या उंच प्रदेशावर पक्षीही उडू शकत नाही. येथे अन्न शिजू शकत नाही आणि अग्नीही नीट प्रज्वलित होऊ शकत नाही. या प्रदेशात गोलाकार शिंगे असलेल्या जंगली मेंढ्या आहेत. आता त्यांना मार्को पोलो मेंढ्या असे म्हटले जाते. पामीरचे पठार पार करून मार्को काशगर प्रांतात आला. व्यापारी आणि कुशल कारागिरांनी गजबजलेले हे शहर होते. सुंदर बगीचे, द्राक्षाचे हिरवेकंच मळे आणि कापसाची समृद्ध शेती असलेले काशगर म्हणजे सिल्क रूटचाच भाग होता. मार्को तेथून समरकंद, यारकंद, खोतान मार्गाने गोबीच्या वाळवंटात गेला.

मार्को म्हणतो, या वाळवंटात पक्षी- प्राणी दिसतच नाहीत. कारण त्यांना खायला अन्न नाही. काही ठिकाणी पाणी आहे, पण त्याची चव कडू लागते. तेथे रात्रीच प्रवास करावा लागतो.

# मर्चंट ऑफ व्हेनिस



अतिशय समृद्ध असलेल हे शहर तार्तर टोळ्यांच्या हल्ल्यांनी ओसाड पडले होते. उद्ध्वस्त संगमरवरी राजवाडे प्राचीन समृद्ध इतिहासाची साक्ष देत होते. तेथून मार्को १२ दिवसांचा एकाट प्रवास करतो. कोठेही वस्ती नाही. लोक दरोडेखोरांच्या भीतीने डोंगरात लपून बसली आहेत. प्रवासात अन्न मिळत नाही आणि सिंहांशी सामना करावा लागतो. एवढ्या कठीण प्रवासानंतर त्याला दोगान शहर आणि नंतर कुंडूझ प्रांतातील तालिकान शहर लागले. अनेक दिवसांनंतर पहिल्यांदाच त्याला येथे बाजार दिसला. डोंगरांमध्ये मिठाचे प्रचंड साठे होते. मिठासाठी दुरून दुरून लोक यायचे. बदख्शन हा प्रांत सध्या अफगाणिस्तानमध्येच आहे. येथील राज्यकर्ते स्वतःला अलेक्झांडर आणि डरायसची मुलगी रुखसाना यांचे वंशज समजतात. येथे नीलम आणि उत्तम प्रतीची चांदी आहे. सिघिनन या पर्वतावर खोल खणल्यावर माणके सापडतात. पण राजाच्या परवानगीशिवाय येथे खणले तर मृत्युदंडाची शिक्षा होते. उत्तम घोड्यांच्या पैदाशीसाठी आणि बहिरी ससाण्यांसाठीसुद्धा हा प्रांत प्रसिद्ध आहे.

अलेक्झांडरच्या घोड्याची प्रजाती येथील राजाच्या एका काकाकडे होती. पण त्याने हे घोडे राजाला देण्याचे नाकारले त्यामुळे राजाने काकाला मारले.याचा सूड म्हणून काकाच्या पत्नीने अलेक्झांडरच्या घोड्याची अख्खी प्रजातीच नष्ट केली. रक्ताने माखलेल्या आणि सुडाने पेटलेल्या इतिहास पुरुषाचा भेसूर चेहरा अनेकदा मार्कोच्या प्रवास वर्णनात दिसतो.
सात दिवसांच्या बल्खकडून दक्षिणेच्या प्रवासानंतर पशाई प्रांत लागतो. येथील लोक रंगाने सावळे असून मूर्तिपूजक आहेत. कारण दिवसा प्रचंड उष्णता असते. रात्री झोप लागली तर भरकटलेले आत्मे मागे लागतात. कधी वाद्यांचा आवाज येतो तर कधी खणखणणाऱ्या तलवारींचा. त्यामुळे प्रवाश्यांचा तांडा जवळजवळच झोपतो. चालतानादेखील कोणीच एकमेकांपासून दूर जात नाही. गोबीचे वाळवंट पार करून तो मांगुत प्रांतात आला. सध्या हा प्रदेश चीनच्या गान्सू आणि शाड् प्रांताचा आणि त्याअंतर्गत मंगोलिया स्वायत्त प्रदेशाचा भाग आहे. मार्को म्हणतो, येथे लोक तिबेटी बौद्ध आहेत. मृत्यू झाल्यावर ज्योतिषाला बोलावून पत्रिकेनुसार दहनाची वेळ ठरवली जाते. सहा महिन्यानंतरचा दिवस ज्योतिष्याने ठरवला तर कापूर आणि वनस्पती घालून प्रेत घरातच चांगल्या परिस्थितीत ठेवले जाते. कोणत्या दिशेने प्रेत न्यायचे, दररोज त्याला कोणते अन्न वाढायचे हे सर्व विधिवत ठरवले जाते.

कामूल प्रांत (सध्याचे हामी) अत्यंत श्रीमंत असल्याचे मार्को सांगतो. तेथील विलासी लोक गातात, वाद्य वाजवतात, नाचतात. कुणी तिर्हाईत माणूस घरी आला तरी त्याचे स्वागत होते. यजमान स्वतः घराबाहेर जातात आणि पत्नीला पाहुण्याची देखभाल करायला सांगतात. मोंगू खानला ही प्रथा आवडली नाही आणि त्याने बंदी घातली. पण येथील लोकांनी न राहवून त्याला नजराणा पाठवला. शेवटी हतबल होऊन मोंगू खान म्हणाला, तुम्हाला जे करायचे ते करा. चीनगीन तलास हा प्रांत वाटेवर लागला आणि येथे त्याने ऍसबेसटॉस या खनिजाला पाहिले. तेथून काराकोरम शहरापर्यंत पोहोचताना त्याला अनेक बौद्ध मठ लागले.

आनंद स्पंदन

**डॉ. अविनाश मोहरील**

# हातातले बोट सोडताना...



बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. माझा मुलगा शाळेत असताना त्याला मी सोडायला जायचो. एके दिवशी मी तेथे गेलो असता मला माझा एक मित्र भेटला. त्याच्या सोबत वहिनीदेखील होत्या. ते दोघेही त्यांच्या छकुलीस पहिल्यांदाच शाळेत सोडायला आले होते. त्याआधी काही वर्षांपूर्वी मी माझ्या पत्नीसोबत ते दिव्य पार पाडले असल्याने त्या दोघांच्या आणि त्या पिटुकलीच्या मानसिकतेचा अंदाज बांधू शकत होतो. त्यांना द्यावा लागणार म्हणून मी जरा वेळ तेथेच थांबलो. मी तो क्षण अनुभवलेला असल्याने मला सहजच त्यांच्या मनात काय चालले असेल, याचा अंदाज करता आला.

छकुली विचार करीत होती आज मला माझ्या आई-बाबांनी कुठे आणले आहे, मला काही कळतच नाही. सकाळी माझा छान अर्धा तास लाडो लाडो करणारी माझी आई आज माझ्यावर ओरडतच होती. आज मला हे वेगळेच कपडे घातलेत. बाबादेखील सकाळी उठून तयार झाले होते. आज दोघेही जण माझ्याच मागे होते. आता मला येथे घेऊन आले आहेत. माझे मन तर धडधड करते आहे. येथे माझ्यासारख्याच कपडे घातलेल्या सगळ्या मुले- मुली आहेत. एवढ्या गर्दीत मला खूपच भीती वाटते आहे. म्हणूनच मी माझ्या बाबांचा हात आणि आईच्या ओढणीचा काठ हातात घट्ट धरून ठेवलाय. मला माझे बाबा गर्दीत कधीच एकटीला सोडत नाहीत. त्यांची मी खूप लाडकी आहे. माझे बाबा माझा हात कधीच सोडत नाही म्हणूनच त्यांच्या जवळ मला खूप छान वाटते. ते मला कधीच सोडणार नाहीत... अरे! अरेरे! पण आज हे काय होतंय? माझे बाबा स्वतःच्या हाताने माझे बोट का सोडताहेत? बाबा! असे काय करताय? आई पण बाबांना काहीच का सांगत नाही? अरे! ह्या कोण बाई आहेत ज्यांनी माझा हात धरलाय? त्या मला माझ्या आई-बाबांपासून का ओढत आहेत? बाबा! तुम्ही काहीच का बोलत नाही या बाईंना? हे काय? मी घट्ट हात धरला असताना बाबाच माझा हात सोडवत आहेत. आज बाबाच मला या गर्दीत पाठवत आहेत. बाबा! असे करू नका. बाबा! तुमच्या छकुलीला असे दूर का करताय? मी या गर्दीत हरवून जाईन.... बाबा...! आई...! एव्हाना छकुलीचा रडवेला सूर आता मोठ्या रडण्यामध्ये परावर्तित झाला होता. वहिनींच्या डोळ्यातून तर अश्रू वाहणे सुरू झाले होते; माझा मित्रदेखील गहिवरून गेला होता. तो विचार करीत होता- मआज माझ्या छकुलीस पहिल्यांदा मी एका वेगळ्या जगात सोडणार आहे. माझी चिमुकली पोर आज माझ्यापासून, तिच्या आईपासून, घरापासून स्वतंत्रपणे पहिल्यांदाच वेगळी होणार. आजचा दिवस खरे तर येऊच नये, असे मला वाटत होते. पण शाळेत तर मुलांना पाठवावेच लागणार. आमची पोर आमच्याशिवाय कशी राहू शकेल. तिला ते शक्यच होणार नाही. आजपर्यंत रोज तिचा अर्धा तास लाडो- लाडो केल्याशिवाय तिला झोपेतूनच उठवत नाही; आज मात्र तिला मी जवळपास ओढतच आणले आहे. माझ्या पिटुकलीने माझे बोट गच्च धरले आहे. तिच्या त्या घट्ट बोट धरण्यातून तिला किती असुरक्षित वाटते आहे, हे मला जाणवते आहे. मी असे का करतो आहे? माझ्या पंखांखाली अत्यंत सुरक्षित असलेल्या माझ्या पोरीला मी का या गर्दीत सोडतो आहे. माझी पोर कावरीबावरी झालीय. मी काय करू? मला कळत नाही. ती बघा! ती माझ्या मुलीची मॅडम आली. अरे देवा! आता ही माझ्या पोरीला घेऊन जाणार. या मोठ्या गर्दीत मला माझ्या मुलीला सोडावे लागणार. तिचे बोट घट्ट होत चालले आहे. पण काय करू? आता मी तिला या मॅडमसोबत पाठविले नाही तर माझी पोर शाळेत कधीच जाऊ शकणार नाही. तिचे सश्यागत झालेले काळीज मला कळते आहे. ती मला काहीतरी विचारतेय. पण मी आता तिचे काहीही ऐकणार नाही. मी आता माझ्या हाताने तिचे बोट सोडणार. अरे देवा! काय हा प्रसंग? या गर्दीच्या आसमंतात मला माझ्या पिलास स्वतंत्रपणे उडण्यासाठी सोडावे लागणार. हा प्रसंगच माझ्या अंगावर काटा आणतोय. पण काय करणार? मला जोर लावावा लागतोय. तिचे बोट सुटतच नाहीय. माझ्याही अंगातील शक्ती निघून गेल्यासारखी होतेय. मला आता काहीतरी करावेच लागणार... मी जोर लावतोय... आणि अखेर बघा! मी माझ्या बछडीला सोडले... गेली... ती रडत रडत... बाबा! बाबा! हाका मारत दूर तिच्या विश्वात गेली. मला भरून आले आहे... माझ्या पोरीचे बोट मी निर्दयीपणे खेचून काढले आणि बघता बघता ती दृष्टिआड झाली. डोळ्यातील अश्रूंनी ती शाळेची इमारतदेखील धूसर झाली. पण काय करणार? मुलांना त्यांच्या विश्वात स्वतंत्रपणे वावरण्यासाठी कधी ना कधी सोडावेच लागणार! फार वाईट वाटले मला! माझी चिमुकली पोर माझ्याशिवाय, तिच्या आईशिवाय कशी बरे राहील? या एकाच गोष्टीचा विचार मनात येतोय..... बिच्चारी माझी पोर!

योगायोगाने त्या दिवशी शाळा सुटताना माझी परत माझ्या मित्राशी व वहिनींशी भेट झाली. ते दोघेही चिंताक्रांत होऊन छकुलीची वाट बघत होते. माझ्या मित्राने तर वहिनींना बजावलेदेखील की ती जर रडत आली तर तिला पुढच्या वर्षीच शाळेत घालूया वगैरे वगैरे. शाळा सुटली अन् चमत्कारच झाला... छकुली अक्षरशः धावत आली... हसत, बागडत. आल्या आल्या शाळेत घडलेल्या सगळ्या धमाल गमतीजमती सांगणे सुरू केले. तिला मॅडमने गाणे म्हणायला लावले, मग तिने तिला येत असलेले छान गाणे म्हणून दाखविले, मग मॅडमने तिची पापी घेतली, मॅडम तिला गुड गर्ल म्हणाल्या वगैरे वगैरे....

माझ्या मित्राने तिच्या गमती सांगण्याचे उधाण ओसरल्यावर हळूच विचारले - बेटा तुला आमची आठवण नाही आली? ती पोर क्षणात म्हणाली- मनाही बाबा, आम्ही इतकी मज्जा केली की मी तुम्हाला विसरूनच गेली... परत आपल्या आईचा हात धरून धमाल कहाण्या सांगत पुढे निघाली... तिच्या पाठमोर्या प्रतिमेकडे बघत माझ्या मित्राला मी म्हणालो मचला, तुझ्या छकुलीला उडण्यासाठी तिचे स्वतंत्र आकाश मिळाले. आता तुझे काम केवळ तिच्या पंखात बळ देणे आणि तिची भरारी बघणे... सोबतच एका कवितेच्या सुंदर ओळी आहेत; मी त्याला सांगितल्या...

**दुख में मत घबराना पंछी, ये जग दुख का मेला है।**
**चाहे भीड़ बड़ी अंबर पर, उड़ना तुझे अकेला है।**
**नन्हे कोमल पंख ये तेरे, और गगन की ये दूरी।**
**बैठ गया तो कैसे होगी? मन की अभिलाषा पूरी।**
**उसका नाम अमर है जग में, जिसने संकट झेला है..**
**चाहे भीड़ बड़ी अंबर पर उड़ना तुझे अकेला है....**
**जब तक सूरज आसमान पर, बढ़ता चल तू बढ़ता चल।**
**घिर जाएगा अंधकार, तब बड़ा कठिन होगा पल-पल।**
**लक्ष्य से पीछे तू मत हटना, भले कठिन ये खेला है...**
**चाहे भीड़ बड़ी अंबर पर, उड़ना तुझे अकेला है...**

विवेचन

**श्रीरंग श्री. हिर्लेकर**

# समीक्षा: कशी असावी... कशी नसावी?



समीक्षण म्हणजे साहित्यिक अथवा त्याची कृती याविषयी समीक्षकाने पूर्वग्रह दूर सारून फक्त कौतुक करणे किंवा दोषच दाखवणे असे नसून तिचे सम् + ईक्ष म्हणजे सांगोपांग अध्ययन करून विवेचन करणे. समीक्षकाने ग्रीक न्यायदेवतेप्रमाणे डोळ्यांवर पट्टी न बांधता भारतीय न्यायदेवतेच्या अलिप्त कमललो तिचे दर्शन घ्यावे आणि सामान्यांनाही घ या अर्थाने तो दार्शनिक असावा. को साहित्यकृती कशी उलगडावी याकरिता तंत्रयुक्त नावाच्या लेखात ३२ युक्त्या सांगित वाचकांना आठवत असतीलच.

मागील ३ लेखात विविध साहित्याचार्यांच काव्याची लक्षणे सांगणारी मते आपण बघित भामहांच्या मते अलंकार, शब्दरचना आ अर्थ यांना महत्त्व आहे. दण्डींनी काव्या दशप्राण कोणते हे सांगत वैदर्भी शैलीचा पुरस् केला तर वामनांनी रीती हाच काव्याचा असे म्हणताना भाषा, पदरचना आणि शैली सांगितले. विश्वनाथांनी रस म्हणजे काय हे सां मवाक्यं रसात्मकं काव्यंफ असा सिद्धांत सांगि

आनंदवर्धनांनी त्यांच्या ध्वन्यालोकात श सरल अर्थापेक्षा त्याचा सूचित अर्थ म्हणजे ध्वनी हाच काव्याचा प्राण समजावा, असे म्हटले. अभिनवगुप्तांनी त्यावर विवरण करीत लोचन टीकेत रसास्वाद कसा घ्यावा ते सांगितले. मम्मटांनी सर्वांच्याच विचारांचा समन्वय करणारी मते मांडली.

क्षेमेंद्रांनी औचित्याला महत्त्व दिले. थोडक्यात काव्याचे परीक्षण केवळ शब्द, अलंकार, छंद किंवा बाह्य रचनेवरून करू नये. कवीने प्रत्यक्ष लिहिलेल्या शब्दांतून नेमके सूचित केले आहे ते पाहणे महत्त्वाचे. रस हा काव्याच्या श्रेष्ठतेचा महत्त्वाचा निकष आहे. वाच्यार्थापेक्षा त्यामागील सूक्ष्म व्यंगार्थ काव्याला प्रभावशाली करतो. म्हणून समीक्षकाने मूळ शब्दांमागील अभिप्राय, भाव, रस आणि सूचित अर्थ समजून घ्यावा.

क्षेमेन्द्रांच्या औचित्य विचार चर्चेत औचित्य तत्त्वाला मध्यवर्ती स्थान दिले आहे. त्यांच्या मते शब्द, अर्थ, रस, अलंकार, पात्र, प्रसंग, देश, काल आणि वृत्ती यांचा परस्परांशी योग्य समन्वय असावा. त्यांचे प्रसिद्ध सूत्र म्हणजे औचित्यं रससिद्धस्य स्थिरं काव्यस्य जीवितम्। अर्थात रससिद्ध डहरीश जीवन म्हणजे औचित्य.

विविध साहित्याचार्यांची मते कधी एकमेकांना छेदक वाटली तरी ती परस्परांना पूरकच आहेत. जी काही मतांतरे असतील ती काव्याचा आत्मा नेमका साहित्याचे मूल्यांकन कसे करावे याकरिता आहेत, गुणवत्तेच्या अंतिम उद्दिष्टात नाहीत. समर्थ त्यांच्या दासबोधात उत्तम साहित्याच्या काही कसोट्या सांगताना लिहितात-

१) अक्षरमात्रे तितुके नीट। नेमस्ते पैस काने नीट। लेखन स्पष्ट, नीटनेटके आणि सुवाच्च असावे. यामुळे वाचकाला वाचताना अडथळा येऊ नये, पुढे वाचावे असे वाटले पाहिजे.

२) चुकी पाहतां सापडेना। गरज केली ते मघडेना। लेखकापासुनी। आशय स्पष्ट असावा.
समजून घेण्यासाठी लेखकाची पुन्हा मदत घ्यावी लागू नये.

(३) शब्दभेद अर्थभेद। मुद्राभेद प्रबंधभेद। नाना शब्दांचे शब्दभेद। जाणोनी पाहावे।। नाना आशंका प्रत्योत्तरे। नाना प्रचित साक्षात्कारे। म्हणजे लेखकाने शब्दांचे विविध अर्थ, मांडणीचे प्रकार, प्रश्न-उत्तरे, अनुभव, सिद्धांत या सर्वांचे भान असू द्यावे.

४) नाना पूर्वपक्ष सिद्धांत। प्रत्ययो पहावा नेमस्त। अनुमानावे खस्तवेस्त। बोलोंचि नये।। केवळ अनुमानावर न विसंबता पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, सिद्धांत नीट समजून मांडावा. प्रत्यक्ष प्रमाण बघावे, समर्थांनी लेखनक्रिया निरुपणात लेखन प्रक्रियेची बाह्य शिस्तही सांगितली आणि आशय कसा नेमस्त असावा तेही सांगितले. समीक्षणाच्या दृष्टीने समर्थांचे हे मार्गदर्शन मोलाचे आहे. भरतमुनी, भामह, दण्डी, वामन, विश्वनाथ, आनंदवर्धन, कुंतक, अभिनवगुप्त, क्षेमेन्द्र आणि शेवटी समर्थ अशा क्रमाने उत्तम साहित्याची कसोटी तपासत गेले तर समीक्षा कशी असावी, याची एक सुंदर चौकटच तयार होईल.

**समीक्षकाकडून अपेक्षा:**

आनंदवर्धन आणि अभिनवगुप्तांच्या मते समीक्षा ही गुणदोषवाचक पट्टी तर आहेच; त्याहीपेक्षा रसास्वादाची दृष्टी देणारे माध्यम ठरते. समीक्षक हा कवी आणि रसिक यांच्यामधील दुवा असावा. त्याने काव्याचे निर्मम विच्छेदन न करता हलकेच अंतरंग उलगडावे. काय पाहावे हे सांगता सांगता कसे पाहावे याचीही दृष्टी द्यावी. याचे एक लहानसे आणि घरगुती उदाहरण- माझा मुलगा सहा महिन्यांचा असताना त्याचा पाळणा बांधताना आम्ही सहज म्हटले- येथे नको, तेथे बांधू. अडचण होईल. माझे साहित्याचार्य वडील रागावून ी अडचण नाही. घराची शोभा आहे. । शोधणे अथवा विनाकारण स्तुती करणे क्षा नव्हे. येथे कसायाची कठोरता नको, जनता हवी. काव्याचे विच्छेदन नको, वावे. त्यातील सौंदर्य आणि उलगडावे. ी वर्षांपूर्वी रघुवंशातील काव्यसौंदर्य ाचा एक ग्रंथ माझ्याकडे समीक्षणासाठी ला.

इतका रसाळ विषय। सौंदर्याने समृद्ध। दैव त्याचे पोस्टमार्टेमच वाचावयास ाले. आपण एखाद्या रुक्ष विषयावरील हिती भरलेला शासकीय अहवालच चत आहोत असे वाटले आणि असे वाचले तर मूळ रघुवंश वाचावा, असे टेल? येथे केवळ शब्द, अक्षर, मात्रांची को. अलंकारातील माणिक मोती सांगू नये, फुलातील पाकळ्यांची संख्या न सांगता त्यातील गंध पसरवावा. एखादा अनभिज्ञ श्रोता भलत्याच वेळी दाद देतो तेव्हा तो केवळ शिष्टाचाराचा भंग करीत नसून गायक आणि श्रोत्यांच्या एकतानतेत, मूक संवादात व्यत्यय आणतो. समीक्षेलाही हेच लागू पडते. चुकीची समीक्षा कवी आणि रसिक यांच्यात भावसंवाद उत्पन्नच होऊ देत नाही. म्हणून समीक्षण म्हणजे कोणत्या सूक्ष्मतेकडे लक्ष द्यावे, कसे पाहावे, हे सर्व सांगणारी संस्कृती आहे. समीक्षकाने रसिक घडवावेत आणि हे काव्य, साहित्य, गद्य, पद्य, संगीत, मूर्तिकला, शिल्पकला सर्वत्र लागू आहे. प्रत्येक कलावस्तूला तिचे संदर्भ, तिचे संस्कार, सौंदर्यशास्त्र, औचित्य असते आणि ते जपणे हे समीक्षकाचे दायित्व आहे, कर्तव्य आहे.



## श्रीगणेशा देवा..!!

ओल्या गहन मातीवरचा उकार तुझ्या रे पायी
तू ओंकार स्वरूप या जगाच्या ठायी ठायी.
ती भिजून गंधात येते आकार तुझा घडवता
त्या हातात वसतो सहज
ती जाणीव भक्तीची वसता.
ती सुंदर निरामय ओळ मातीची संवेदना रे
रंगाचा जडतो साज देवत्व जाणते सख्या रे.
ही भक्ती चरणांवरची ही वाट गहिरी होता
सजलेल्या बाजारातून तुझी कळते रे मोहकता.
तू काठी तसाच तटस्थ वसतो
तरी मूर्तिरूपाचे बंध देव्हारी तत्त्व सजवतो.
आनंद आतुरता सार तुझ्या तत्त्वाशी जुळते
अन् तेथून प्रवाही मोळी
ती स्थिर जाणीव स्मरते
ती स्थिर जाणीव स्मरते... !
बाप्पा तुझ्यासाठी तुझे फूल तुलाच वाहिले
मनातल्या काठी सारं समाधान राहिले,
समाधान रे राहिले..

**श्रद्धा राऊत बुरले**

## गणेश गीत

पाहुणा आला, आला गणपती।
भाद्रपद चतुर्थीच्या दिवशी ।।धृ।।
एकदंत हा वक्रसुंडी।
पाशांकुश, मोदक हाती।
बैसला मूषक वाहनी।
धूप, दीप द्या, ओवाळा आरती।।१।।
विद्या, बुद्धी देई सकलां।
शांती-मती येई घराला।
मांडा आरासूनी मखरा।
दहा दिवसांचा हा असे सोबती।।२।।

**रेखा भिवगडे**

# ढगांचे घर कोरडे कसे पडले?

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे



**मेघालय म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहतात धुक्याने वेढलेले डोंगर, कोसळणारे असंख्य धबधबे आणि वर्षाचे बारा महिने बरसणारा पाऊस. मजगातील सर्वाधिक पावसाचे ठिकाणफम्हणून प्रसिद्ध असलेल्या मेघालयात यंदा मात्र सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. ही केवळ एका वर्षातील हवामानातील चूक आहे की भारतीय मान्सूनच्या बदलत्या स्वभावाचा गंभीर इशारा, हा प्रश्न अलिकडच्या काळात चर्चेत राहिला आहे..**

ज्या राज्याची ओळखच पावसामुळे आहे, त्याच राज्यात पावसाची कमतरता भास ही घटना साधी नाही. कारण मेघालयातील पाऊस हा केवळ स्थानिक हवामानाचा विषय नाही तर भारतीय मान्सूनची ताकद, बंगालच्या उपसागरातील आर्द्रतेचे वितरण आणि हवामानातील संतुलन यांचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे मेघालयात पाऊस कमी पडणे ही संपूर्ण मान्सून व्यवस्थेतील बदलाची चाहूल समजली पाहिजे. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार ४ जून ते २८ जुलै या कालावधीत मेघालयात साधारण ६३२.१ मिलीमीटर पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात मात्र केवळ २७२.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. म्हणजेच पावसात तब्बल ५७ टक्क्यांची तूट आली.

विशेष म्हणजे मेघालयच नव्हे तर आसाम, अरुणाचल प्रदेश आणि मणिपूरमध्येही सरासरीपेक्षा मोठी घट नोंदविली गेली आहे. यावरून ईशान्य भारतातील संपूर्ण मान्सून प्रणाली यंदा कमकुवत राहिल्याचे स्पष्ट होते. मेघालयात इतका पाऊस का पडतो, यामागे त्याची भौगोलिक रचना कारणीभूत आहे. बंगालच्या उपसागरातून येणारे दमट मान्सून वारे खासी, जयंतिया आणि गारो पर्वतरांगांवर आदळतात. पर्वतांवर चढताना हे वारे थंड होतात आणि त्यातील जलबाष्पाचे रूपांतर पावसात होते.

हवामानशास्त्रात याला ओरोग्राफिक रेनफॉल म्हणजेच पर्वतीय वर्षाव असे म्हटले जाते. या नैसर्गिक प्रक्रियेमुळे मासिनराममध्ये सरासरी ११ हजार ८०२ मिलीमीटर तर सोहरामध्ये ११ हजार ३५९ मिलीमीटर वार्षिक पाऊस पडतो. त्यामुळेच ही दोन्ही ठिकाणे जगभर प्रसिद्ध झाली; मात्र यंदा या प्रक्रियेलाच खीळ बसल्याचे दिसते.

हवामान विभागाच्या मते, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली कमी दाबाची प्रणाली ओडिशामार्गे मध्य भारताकडे सरकली. त्यासोबतच मोठ्या प्रमाणातील आर्द्रताही पश्चिम आणि मध्य भारताकडे वळली. परिणामी मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र यांसारख्या राज्यांमध्ये जोरदार पाऊस झाला; पण मेघालय आणि ईशान्य भारत मान्सूनच्या मुख्य सक्रिय पट्ट्याबाहेर राहिला. त्यामुळे ढगांची निर्मिती कमी झाली आणि मुसळधार पावसासाठी आवश्यक असलेली सततची आर्द्रता त्या भागात पोहोचलीच नाही. याचे पुरावे उपग्रह चित्रांमध्येही दिसून येतात.

इनसॅट-३डीएस उपग्रहाच्या प्रतिमांमध्ये मध्य भारतावर दाट ढगांचे साम्राज्य दिसत असताना मेघालयावर दग विरल आणि निरीक्षणानुसार, जगप्रसिद्ध मासिनराम आणि चेरापुंजीमध्येही यंदा अपेक्षेपेक्षा खूपच कमी पाऊस झाला. म्हणजेच निसर्गाच्या स्वतःच्या नियमांमध्ये काहीसा बदल घडताना दिसत आहे. याचा सर्वात मोठा परिणाम शेतीवर होणार आहे.

मेघालयातील बहुतांश शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. भात, मका, आले, हळद, संत्री, अननस आणि विविध फळपिकांसाठी नियमित पाऊस अत्यावश्यक असतो. पर्वतीय भागातील अनेक गावे नैसर्गिक झरे आणि डोंगराळ पाणवठ्यांवर अवलंबून आहेत. पाऊस कमी झाल्यास हे झ आटू लागतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होण्याची भीती आहे. नद्यांमधील पाण्याची पातळी कमी होईल. भूजल पुनर्भरण घटेल आणि पुढील उन्हाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. पर्यटन क्षेत्रासाठीही ही धोक्याची घंटा आहे.

मेघालयचा अर्थच ढगांचे घर. दरवर्षी लाखो पर्यटक केवळ येथील धबधबे, हिरवळ आणि मुसळधार पावसाचा अनुभव घेण्यासाठी येतात. नोहकलिकाई, सेव्हन सिस्टर्स, एलिफंट फॉल्स यांसारखे धबधबे हे राज्याच्या पर्यटनाचे मुख्य आकर्षण आहेत. पाऊस कमी झाल्यास या धबधब्यांमधील प्रवाह कमी होईल आणि पर्यटन उद्योगालाही मोठा फटका बसेल.

२०२५ मध्ये जवळपास १८ लाख पर्यटकांनी मेघालयला भेट दिली होती. या उद्योगावर हजारो कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. या संपूर्ण घटनेतून हवामान बदलाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. हवामानतज्ज्ञ मात्र एका वर्षाच्या आकडेवारीवरून निष्कर्ष काढण्यास तयार नाहीत. त्यांचे म्हणणे रास्त आहे; परंतु गेल्या दोन दशकांमधील निरीक्षणे वेगळीच कथा सांगतात. भारतात पावसाचे वितरण अधिकाधिक असमान होत चालले आहे. काही भागांमध्ये विक्रमी अतिवृष्टी होते, तर काही भाग दुष्काळाच्या उंबरठ्यावर पोहोचतात. काही दिवसांमध्ये महिनाभराचा पाऊस पडतो, तर नंतर अनेक आठवडे वातावरण कोरडे राहते. ही प्रवृत्ती आता वारंवार दिसू लागली आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या हवामान बदल मूल्यांकन अहवालातही याच गोष्टीची नोंद आहे.

जागतिक तापमानवाढीमुळे वातावरणात अधिक जलवाष्प साठत आहे. त्यामुळे पावसाच्या घटना अधिक तीव्र होत आहेत; पण त्यांचे वितरण अधिक अस्थिर होत आहे. म्हणजेच एकाच वेळी काही भागांमध्ये पूर आणि काही भागांमध्ये दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण होत आहे. यंदाच्या मान्सूनने हेच चित्र स्पष्ट केले आहे. आसामच्या काही जिल्हांमध्ये अभतप पस्थिती असताना मेघालय भारतीय मान्सून हा जगातील सर्वात गुंतागुंतीच्या हवामान व्यवस्थांपैकी एक आहे. अल-निनो, ला- निना, हिंद महासागरातील तापमान, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे पट्टे, जेट प्रवाह आणि स्थानिक भौगोलिक रचना अशा अनेक घटकांवर त्याचे स्वरूप अवलंबून असते. त्यामुळे एका घटकातील छोटासा बदलही हजारो किलोमीटर दूर परिणाम घडवू शकतो, म्हणूनच मान्सूनचे अचूक भाकीत करणे अजूनही हवामानशास्त्रासाठी मोठे आव्हान आहे.

या पृष्ठभूमीवर भारताने हवामान बदलाशी जुळवून घेण्याची तयारी अधिक वेगाने करणे आवश्यक आहे. पर्जन्यमानावर अवलंबून असलेल्या राज्यांमध्ये जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, लहान धरणे, झऱ्याचे पुनरुज्जीवन, भूजल पुनर्भरण आणि हवामान- स्मार्ट शेती यांना प्राधान्य द्यावे लागेल. हवामान अंदाज अधिक अचूक आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे. एकीकडे हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी कार्बन उत्सर्जनात कपात करण्याचे प्रयत्न सुरू आहेत; त्याचबरोबर बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढविणेही महत्त्वाचे आहे.

मेघालयसारख्या राज्यांनी पर्यटन, शेती आणि जलव्यवस्थापनासाठी नव्या परिस्थितीला अनुरूप धोरणे स्वीकारली पाहिजेत. येत्या काळात येथील परिस्थिती सुधारली, तरी यंदाचा अनुभव हवामानशास्त्र आणि धोरणकर्त्यांसाठी महत्त्वाचा धडा ठरणार आहे. त्यातून अनेक नवे निष्कर्षही पुढे येत आहेत.

मेघालयातील पावसाची तूट ही केवळ एका राज्याची बातमी नाही. त्याकडे तेवढ्याच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे ठरेल. हा भारतीय मान्सून अधिक अनिश्चित, अधिक टोकाचा आणि अधिक असमतोल होत असल्याचा स्पष्ट संकेत आहे. ज्या भूमीची ओळखच मुसळधार पावसाने आहे, तीच भूमी पावसाच्या प्रतीक्षेत राहते, हा विरोधाभास भविष्यातील हवामान संकटाचे वास्तव अधोरेखित करतो. आज गरज आहे, ती हवामान बदलाला केवळ पर्यावरणाचा विषय न मानता विकास, अर्थव्यवस्था, शेती, जलसुरक्षा आणि राष्ट्रीय नियोजनाचा केंद्रबिंदू मानण्याची. अन्यथा, आज मेघालय कोरडे पडले आहे; उद्या देशातील इतर पर्जन्यसमृद्ध प्रदेशही अशाच अनिश्चिततेच्या भोवर्यात अडकू शकतात. निसर्ग वेळोवेळी इशारे देत असतो. प्रश्न एवढाच आहे की, आपण ते वेळेत समजून घेतो का?

(लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)



# ज्ञानेश्वरीतील शब्दछाया

शब्दवैभव
प्रा. डॉ. सुहास उगले




संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या ज्ञानेश्वरीकडे आपण कितीही वेळा वळलो, तरी एखादा शब्द नव्याने भेटतो आणि मनाच्या अनाम कोपऱ्यात प्रकाश पडतो. काही शब्दांचा अर्थ आपण शब्दकोशातून समजून घेतो; पण काही शब्द समजण्यापेक्षा जाणवतात, अर्थापेक्षा अनुभवले जातात आणि उच्चारापेक्षा मनात घुमतात. परिमळु, अळूमाळू यांसारखे शब्द याच अनुभूती विश्वाची दारे उघडतात. अशा शब्दांना आस्वादाच्या दृष्टीने शब्दछाया म्हणता येईल. ही काटेकोर पारिभाषिक संज्ञा नसून शब्दाभोवती निर्माण होणाऱ्या नाद, भाव, प्रतिमा, सूचकता आणि अनुभूतीच्या छटेला दिलेले एक सुंदर नाव असे तिचे स्वरूप मानता येईल. कारण शब्दाला एक अर्थ असतो; पण त्या अर्थाभोवती एक अदृश्य भावविश्वही असते. तोच त्याचा शब्दछायाभाग.

शब्दाचा अर्थ आणि शब्दाची अनुभूती-
परिमळु म म्हणजे सुगंध. हा त्याचा शब्दार्थ. पण परिमळु म्हटले की, केवळ सुगंधाची माहिती मिळत नाही. मनात एखादे फूल उमलते, मंद वारा वाहतो, एखादी जुनी आठवण जागी होते आणि एक प्रसन्न भाव अलगद मनाला स्पर्शून जातो. म्हणजेच शब्दकोशीय अर्थाच्या पलीकडे शब्दाची एक भावछाया असते.

अळूमाळू सारख्या शब्दात तर अर्थाइतकेच त्याचे ध्वनिसौंदर्य महत्त्वाचे आहे. त्या उच्चारातच एक हळुवार, अस्पष्ट, अलगद स्पर्शन जाणारी हालचाल जाणवते. शब्द जणू काही सांगत नाही; तो काहीतरी घडवतो. शब्दाचा अर्थ बुद्धीला कळतो; पण शब्दाची छाया मनाला जाणवते. माउलींना अशा शब्दांची गरज का भासली?

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे कार्य केवळ भगवद्गीतेचा अर्थ सांगणे नव्हते. गीतेतील गहन तत्त्वज्ञान सामान्य माणसाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचवणे, हे त्यांच्या काव्यप्रतिभेचे मोठे आव्हान होते. ब्रह्म, आत्मा, चैतन्य, समत्व यांसारख्या संकल्पना अमूर्त आहेत. त्या केवळ तर्काच्या भाषेत मांडल्या तर बुद्धी त्यांना समजून घेईल; पण मनाला स्पर्श होणार नाही. म्हणून माउली तत्त्वज्ञानाला प्रतिमा देतात, प्रतिमेला नाद देतात आणि नादाला भावनेची ऊब देतात. त्यांची भाषा केवळ माहिती देत नाही; ती अनुभवाचे वातावरण निर्माण करते. याच कारणाने ज्ञानेश्वरी निव्वळ तत्त्वज्ञान ग्रंथ न राहता काव्यात्मक अनुभवग्रंथ बनते.

**शब्दांचे मानसशास्त्र-**

मानवी मन हे केवळ तर्कावर चालत नाही. संवेदना, भावना, स्मृती, कल्पना आणि अवचेतन अनुभव त्याच्या जाणिवेला आकार देतात. एखादा शब्द या अनुभव साखळीला स्पर्श करतो तेव्हा तो केवळ माहिती देत नाही; तो स्मृती जागवतो आणि भावना हलवतो. आई, माती, पाऊस, चांदणे, परिमळ या शब्दांचे शब्दार्थ मर्यादित असले, तरी त्यांच्या भावछटा अमर्याद असतात. प्रत्येक व्यक्तीच्या अनुभवविश्वानुसार त्या बदलतात. परिमळु एका वाचकाला मोगऱ्याची आठवण करून देईल; दुसऱ्याला पहाटेच्या तुळशीची तर तिसऱ्याला बालपणीच्या अंगणाची.

शब्द एक; पण मनात उमटणारी त्याची छाया अनेक. हीच काव्याची मानसशास्त्रीय ताकद आहे.

ज्ञानेश्वरीची ओवी ही केवळ वाचण्यासाठी नाही; ती ऐकण्यासाठीही आहे. ओवीतील लय, पुनरुक्ती, अनुप्रास, शब्दांची ध्वनिरचना आणि बोलीभाषेचा ओलावा यामुळे तिचा परिणाम केवळ अर्थबोधापुरता मर्यादित राहत नाही.

विशेषतः अळूमाळू सारख्या शब्दांत ध्वनी स्वतःच अर्थनिर्मिती करतो. शब्दाचा उच्चार ज्या प्रकारची हालचाल मनात निर्माण करतो, ती शब्दार्थापेक्षा सूक्ष्म असते. म्हणून माउलींच्या भाषेतील सौंदर्य हे अर्थसौंदर्याइतकेच नादसौंदर्याचेही आहे.

तत्त्वज्ञान बुद्धीला प्रश्न विचारते; काव्य मनाला स्पर्श करते. ज्ञानेश्वरांनी या दोन्हींचे अद्वितीय ऐक्य साधले. त्यांच्या ओवीत अध्यात्म आहे; पण ते अवघड नाही. ज्ञान आहे; पण ते कोरडे नाही. उपदेश आहे; पण त्यात कठोरता नाही. कारण लोकभाषेतील सहजता आणि काव्यात्मक प्रतिमाशक्ती यांनी गहन विचाराला माणसाच्या जगण्याची भाषा दिली आहे. यामुळेच ज्ञानेश्वरीतील भाषा कधी घरगुती वाटते, कधी लाघवी, कधी गूढ, तर कधी बालसुलभ.

**शब्द ते आत्मस्पर्श-**

माउलींच्या शब्दप्रयोगाची एक अंतः यात्रा अशी पाहता येते- शब्द नाद प्रतिमा भावना स्मृती अनुभूती आत्मस्पर्श, शब्द कानावर पडतो, नाद मनात उतरतो, नादातून प्रतिमा उभी राहते, प्रतिमेतून भावना जागते आणि ती वैयक्तिक स्मृतीशी जोडली की शब्दाचा अनुभव आपला होतो. म्हणून ज्ञानेश्वरी केवळ वाचायची नसते; ती ऐकायची, जाणायची आणि अनुभवायची असते.

ज्ञानेश्वरांनी शब्दांचा वापर केवळ अर्थ पोहोचवण्यासाठी केलेला नाही. त्यांनी शब्दांना अनुभव वाहून नेणारी पात्रे बनवले. म्हणून काही शब्द ज्ञान देतात, काही चित्र उभे करतात, काही भावना जागवतात; पण माउलींचे काही शब्द यापलीकडे जाऊन मनाची अवस्था बदलतात. हीच त्यांच्या काव्यप्रतिभेची खरी उंची. म्हणून ज्ञानेश्वरी समजून घेण्यासाठी केवळ शब्दार्थ पुरेसा नाही.

तिच्या शब्दांच्या मागे असलेल्या नादछटा, भावछटा, प्रतिमाछटा आणि अनुभूतीच्या सूक्ष्म तरलतेचा आस्वाद घ्यावा लागतो. शब्दाचा अर्थ शब्दकोश सांगतो; शब्दाची अनुभूती मन सांगते आणि कदाचित ज्ञानेश्वरीचे हेच एक मोठे गूढ आहे. ती शब्दांनी लिहिलेली आहे; पण तिचा खरा अर्थ शब्दांच्या पलीकडे अनुभवायचा आहे.

# नात्याचा अर्थ

समाजभान
अंजली देशपांडे

नातं एक हळुवार गुंफलेली वीण. कधी काळाच्या ओघात उसवेल, कधी विरून जाईल, पण त्यातील ऊबदारपणा, प्रेम कायम राहील. माणसाने खरं तर त्याच्या सोयीनुसार त्या प्रेमरूपी गुंफणीला अनेक नावे दिली- आई- वडील, बहीण-भाऊ, आत्या- भाची, काका- काकू, मावशी- भाचा. नात्यांची नावे बदलली तरी प्रेम, जिव्हाळा एकच असतो. आधुनिक काळात तसेच आपल्याला कलियुग म्हणता येईल, पिढीनुसार नात्यांचा ओघ किंवा वेळेनुसार भेटीगाठी कमी होतील जिव्हाळा मात्र संपणार नाही. म्हणजे तसंच बघायला झालं तर सासूची जागा सुनेने, आत्याची जागा भाचीने, बापाची मुलाने घेतली तर त्यात वावगं काय? तुमच्यापेक्षाही सुगरण आहे सून तुमची हे ऐकल्यावर सासूला आनंदच व्हायला हवा. भाची अगदी छान काळजी घेते हो आजी- आजोबांची असं झाल्यावर आत्याचं माहेर कुठे परकं होतं? तिला अभिमानच वाटतो ना. व्वा साहेब, मुलगा मस्त हो तुमचा, सगळं सांभाळतो असं ऐकलं की बापालाही आनंद होतो.

बदलत्या काळानुसार जुन्या नात्याची जागा नवीन नातं घेणारच. सुरुवातीला असणाऱ्या आत्याच्या माहेरात आता चिमुकल्या भाच्या माहेराला येणारच पण आत्याचं महत्त्व कमी होईल असं नाही. ते नातं सांभाळून ठेवण्याची जबाबदारी त्या घरच्या सुनेची, भाचीची आणि अनुक्रमे मुलाचीही असतेच बरं का. नातं कसं असावं याचा विचार करताना डोळ्यांसमोर येतं ते माहेर... प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील हा जिव्हाळ्याचा विषय. सासरी उद्भवलेले प्रश्न, काळजी, चिंता सर्व इथे सांगायचे। मोकळं व्हायचं आणि परत नव्या उमेदीने सासरी जायचं, असा साधारण प्रयत्न समस्त स्त्रीवर्ग करत असावा. कारण तिथे असतो तो विशाल वटवृक्षरूपी बाप, सर्व चुका पदरात घेणारी माउली आणि थोडं पुढे गेल्यावर आधार देणारा भाऊ आणि मैत्रीण असणारी वहिनी. कधी कधी दुर्दैव म्हणा किंवा नियती, आई- वडील लवकर जातात, वडील मागे राहतात तर कधी आई आणि मग त्या वटवृक्षाची जागा घेतो भाऊ आणि माउलीची जागा घेते वहिनी. आई- वडील नाहीत म्हणून माझं माहेर संपलं असं वाटून न घेता आता आम्ही बहीण- भाऊ मिळून सगळं सांभाळू अशी बहिणी- ची भावना असते, असावी.

भाऊ नावाचा वटवृक्ष कधी कधी कल्पवृक्षही होतो. माझी बहीण आता पोरकी व्हायला नको म्हणून तो तिची प्रत्येक इच्छा पूर्ण करतो आणि ती बहीण होते आई, भावाला सांभाळून घेते, जोपासते, आधार देते. सगळं छान होतं. नणंद- भावजय मैत्रिणी होतात. मग आगमन होतं नव्या पिढीचं, भाचा किंवा भाची. आत्या आनंदात नहाते. नातेरूपी वेलीवर नवी फुले बहरत जातात. आता मात्र हा भाऊ नावाचा वटवृक्ष उतारवयात येतो.

ज्या वटवृक्षाची सावली आतापर्यंत अनुभवली, ज्याचा आधार घेतला, कारण ते बहरलेलं होतं; पण मग उतारवयात त्या वटवृक्षाकडे नव्याने बघण्याची गरज असते तसेच त्याला आता आपल्या आधाराची गरज आहे. त्या आधाराची जबाबदारी आणि समंजसपणा दाखवून त्याच्या सावलीत वाढलेल्या नवीन रोपट्यांनी घ्यावी. हळूहळू त्या वटवृक्षाला गृहीत धरलं जातं आणि शोभेची वस्तू समजली जाते. काळानुसार बदल झालेल्या नवीन गोष्टींना दुजोरा दिला जातो. कारण आता त्याच्या आयुष्याची संध्याकाळ. तिथेच खरं तर त्याच्या अनुभवाचा प्रकाश याचा नवीन पिढीनेही अनुभवायचा असतो.माझ्या मते त्या वटवृक्षाचं काम कायम सावली देण्याचं असतं, हे अगदी खरं आहे. ती सावली टिकवायचं काम त्याच्या सावलीत आसरा घेणाऱ्या किंवा आधी आसरा घेत असलेल्या त्या अनेक रोपटं असणाऱ्यांचीही आहे. मला वटवृक्षाची सावली आजही मिळावी असं वाटत असेल तर तो वटवृक्ष आजही तितकाच स्वच्छ, निर्मळ आणि पवित्र आहे, असा माझा विश्वास असायलाच हवा.

आजपर्यंत मला ज्या वटवृक्षाने आधार दिला, आज सावली घेताना मला माझ्या दोन्ही हातांनी त्याला आधार द्यायला हवा. कारण त्याला आज माझ्या आधाराची गरज आहे. हे जर मी पाळत असेन तर माझ्यासाठी वटवृक्षाची सावली तितकीच स्वच्छ आणि निर्मळ असेल. कोणाच्याही सांगण्याने, वाईट विचाराने मी माझे मन दूषित करणार नाही आणि मी त्या वटवृक्षाची प्रतिमा मलिन होऊ देणार नाही. कुठल्याही गैरसमजाला बळी पडून मी नात्यावरचा विश्वास ढळू देणार नाही. असं असेल तर त्याची सावली घेण्याचा माझा पूर्ण अधिकार आहे. अधिकाराचं म्हणायचं झालं तर अधिकार आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कर्तव्य योग्य रीतीने पार पाडली तरच माझ्या अधिकाराला महत्त्व आहे. कारण कर्तव्याशिवाय अधिकार व्यर्थ आहे. हे असं सगळीकडे होत नाही म्हणूनच अलिकडच्या काळात उसवत चाललेली नात्याची वीण आपल्याला दिसून येते.

बालपणी एकत्र वाढलेले बहीण-भाऊ दुरावताना दिसतात, बहिणी-बहिणी एकमेकींशी बोलत नाहीत, अनौपचारिक नात्यात औपचारिकता दिसून येते. लग्नकार्यात नातेवाईक, आप्तेष्टांची गर्दी कमी झालेली दिसते. म्हणूनच विश्वास, प्रेम या आधारावर नात्यांची वीण घट्ट बांधावी लागते. प्रेमाने, आपुलकीने आणि विश्वासाने नाती जोडून ठेवली तर आयुष्यरूपी वेलीवर नात्यांचा मेळ जमायला वेळ लागणार नाही आणि मग ते नातेरूपी वृक्ष पुन्हा एकदा बहरून येईल.



कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

मानव म्हणून जगायला सुरुवात झाल्यानंतर समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी काही लोकोत्तर विभूतींनी दिलेल्या योगदानाचा इतिहास धुंडाळला तर त्यात ऋषी विश्वामित्र एकमेवाद्वितीय आहेत, याची खात्री पटेल. एक महापराक्रमी चक्रवर्ती राजा राजर्षी ते ब्रह्मर्षी असा आध्यामिक उन्नतीचा प्रवास करतो. यातून मिळालेल्या सामर्थ्यानं समाज संपन्न करण्यासाठी अतिशय प्रभावी असा मंत्र देऊ करतो, हे सारं अद्भुत आहे. एक राजा आणि एक मंत्रद्रष्टा ऋषी अशी दोन परस्पर भिन्न आयुष्य जगलेल्या या व्यक्तिमत्त्वाचा परिचय दोन स्वतंत्र भागात करून देण्याशिवाय गत्यंतर नाही. म्हणून हा लेख राजा विश्वामित्राला चित्रित करणारा आहे.

प्रजापतीचा पुत्र कुश, त्याचा पुत्र कुशनाभ आणि या कुशनाभाचा पुत्र गाधी. कान्यकुब्ज क्षेत्रात कुशानं राजवंशाची स्थापना केली. त्यामुळे हा वंश म्हणवला गेला कुशिक. या कुशाचा अत्यंत आपल्या पतीला विनवलं. त्यावर त्यांनी आपल्या मुलात नाही तरी आपल्या नातवात मात्र हे क्षात्रतेज उतरल्याशिवाय राहणार नाही, असं भाकीत केलं. पण आपण आपल्या सासऱ्याला होणाऱ्या मुलाविषयी काहीच करू शकणार नाही, हे स्पष्टच सांगितलं.

यशावकाश सत्यवती आणि तिची आई दोघीही गर्भवती होऊन प्रसूत झाल्यात. सत्यवतीच्या मुलाचं नाव ठेवलं जमदग्नी आणि भावाचं नाव विश्वरथ नंतर पुढे विश्वामित्र म्हणून ख्याती पावला. ते अतिशय क्रोधी आणि शीघ्रकोपी होते. तर, विश्वामित्र राजकुळात जन्मले तरीही त्यांना ऋषी होण्याची तीव्र इच्छा होती तर जमदग्नी ऋषींचा सर्वात लहान मुलगा म्हणजे राम! हाती परशु धारण करत शस्त्रास्त्रविद्येत नैपुण्य मिळवलं. अजेय योद्धा आणि सप्तचिरंजीवांपैकी एक म्हणून मान्यता पावलेले परशुराम. म्हणजे कान्यकुब्ज नरेश विश्वामित्र, महाप्रतापी परशुरामांचे मामा आजोबा होत. ही झाली राजपुत्र म्हणून जन्माला आलेल्या विश्वामित्रांची जन्म कथा. कालांतरानं त्यांच्यावर राज्याभिषेकदेखील झाला. त्यांची कारकीर्द चांगलीच चालली होती. एक दिवस आपल्या निवडक सैनिकांसह शिकारीला गेले असताना त्यांचा मार्ग चुकला




तेजस्वी असा नातू गाधी राज्यावर बसला. त्याला सत्यवती नावाची एकुलती एक कन्या होती. ती सुविद्य आणि उपवर होताच तिचा विवाह भृंग ऋषींच्या ऋचिक नावाच्या पुत्रासोबत करून देण्यात आला. आपल्या पतीकडे तिनं स्वतःला आणि आपल्या आईला पुत्र व्हावा म्हणून काही अनुष्ठान आणि उपाययोजना करावी, अशी गळ घातली. ऋचिक ऋषींनी केलेल्या प्रयोगातून दोघींसाठी दोन वेगवेगळे चरू म्हणजे मातीची सुगडी तयार झालीत. सत्यवतीचा चरू आकारानं काहीसा मोठा होता आणि तिच्या आईला दिलेला त्या मानानं लहान. आपापल्या चरूतील रसायन (औषध) घेतल्याने दोघींना मुलगे होतील, असं ऋचिक ऋषींनी सत्यवतीला सांगितलं आणि ते साधनेला बसले.

सत्यवतीच्या आईला मात्र चरूंच्या आकारातला हा फरक काही केल्या पटेना. जावयांनी मला आकारानं लहान चरू का दिला, हा प्रश्न तिला स्वस्थ बसू देई ना. अखेर तिच्या आग्रहाला बळी पडून सत्यवतीनं मोठा चरू तिला दिला आणि लहान चरू स्वतःला ठेवला. दोघींनी त्यातलं औषध सेवन केलं.

आपल्या पत्नीनं घोळ घातला आहे हे ऋचिक ऋषींच्या लक्षात आलं. त्यांनी तिला रागावत म्हटलं की दोन्ही चरूंत वेगवेगळे गुणधर्म असलेल्या बालकांसाठी दोन वेगवेगळी रसायनं तयार केलेली होती. मी ऋषी कुळातला आहे म्हणून मला ब्राह्म्य तेजाचा मुलगा होणं अपेक्षित होतं. त्यामुळे तुला दिलेल्या चरूत मी ब्राह्म्य तेज उत्पन्न करणारे गुणधर्म असणारं रसायन सिद्ध केलं होतं. तर तुझे वडील राजे आहेत म्हणून त्यांना होणाऱ्या पुत्रात क्षात्र तेजाचं रोपण व्हावं म्हणून तुझ्या आईसाठी सिद्ध केलेलं औषध क्षात्रतेजाच्या गुणांसह सिद्ध केलं होतं. आता नेमकं उलटं होणार. आपला मुलगा क्षात्रवृत्तीचा आणि तुझ्या आईचा मुला ब्राह्मवृत्तीचा होईल. सत्यवतीनं आपली चूक मान्य करत क्षमायाचना केली आणि तिला ब्राह्म्य तेजाचाच मुलगा व्हावा म्हणून काही उपाययोजना करा असं आणि ते वसिष्ठ ऋषींच्या गोनार्द येथील आश्रमात येऊन पोहोचले. तर, इतक्या सगळ्यांचा पाहुणचार करताना ब्रह्मर्षी वसिष्ठ आणि अरुंधतीनं यथासांग केला. या आश्रमात इतक्या सगळ्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था अगदी उत्तम झाली ती कशी, याचं राजाला आश्चर्य वाटलं. चौकशी केली असता कामधेनु नावाची गाय त्यांच्या गोशाळेत आहे, अशी माहिती मिळाली.

कामधेनु ही समुद्रमंथनातून उत्पन्न झाली दिग्य गोमाता असून ती ज्याच्याकडे असते त्याच्या सर्व इच्छा तत्काळ पूर्ण करते, अशी तिची ख्यातीही त्याच्या कानी आली. समग्र संसाधनांना सहजी उपलब्ध करून देणारी गाय या आश्रमात शोभत नाही. तिला राजगोशाळेतच ठेवायला हवं, असा विचार विश्वामित्राच्या मनात आला. त्यामुळे वसिष्ठांच्या गोशाळेत हंबरणारी कामधेनू हवी म्हणून त्यांनी हट्ट धरला. त्यावर देवराज इंद्रानं मध्यस्थी करत त्याची समजूत घातली- कामधेनु बाळगण्याची पात्रता फक्त ब्रह्मर्षी असलेल्या व्यक्तीतच असते. इतर कोणालाही ती पोसण्याचा अधिकारही नाही आणि सामर्थ्यही. हे सारं इथे सविस्तर सांगण्याचं कारण म्हणजे वैदिक काळात एकूणच परिस्थिती काय होती याकडे लक्ष वेधणं. त्यातला पहिला बिंदू म्हणजे डिझायनर बेबीची संकल्पना. ज्या प्रकारचे गुण धर्म वृत्ती मुलांमध्ये असावी असं वाटतं त्याप्रमाणे गर्भधारणा करण्याचं तंत्र या ऋचिक ऋषींनी विकसित केलं होतं, असं एकूण या वर्णनावरून वाटतं. दुसरा बिंदू कामधेनुसारखी संसाधन परिपूर्ण व्यवस्था ही ज्ञानी, संयमी आणि निःस्वार्थ असलेल्या पतीपत्नीकडे सुरक्षित असायचे. अगदी राजानं जरी ती आपल्याकडे असावी म्हणून आग्रह धरला तरीही त्यानं ती पात्रता मिळवावी, असं निक्षून सांगण्यात येत असे. राजा असला तरी त्याला मनमानी करण्यास मनाई होती. राजा म्हणून अतिशय पराक्रमी, बलाढ्य आणि कर्तृत्ववान राजा विश्वामित्राची ही आठवकथा....

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

# बोरी बाभळीची माया...



बोली मराठीतील अनेक साहित्यकृतींचे लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याशी अनुबंध जुळलेले आहेत. आपल्याकडे लोकप्रतिभेने लोकरामायणातील अनेक प्रसंग लोककथा- लोकगीतांतून सांगितले आहेत. गरोदर असताना सीतेचे एकटे वनवासात असणे आणि लवकुश यांचा जन्म होणे ही घटना स्त्री प्रतिभेला साद घालणारी आहे. रानावनात एकाकी अवस्थेत सीतेचे प्रसूत होणे ही घटना लोकप्रतिभेने वर्णिली आहे. भर दुपारी उन्हात रानात एकाकी अवस्थेत एका स्त्रीच्या प्रसूतीचा प्रसंग सांगणारी कवी ना. धों. महानोर यांची एक इवलाशी कविता आहे.

कानोसा घेताना केळ अंगात कापते
सिताफळीच्या कानात काही हळूच
सांगते, बोरी वो बाभळी मायेच्या झाल्या
नारी, केळ कमळण झाली प्रसूत दुपारी,
सुने माळरान, डोळा रुखे रुखे ऊन, पोटी
लपेटून निघे सासुरवाशीण - ना. धों. महानोर

रानातल्या कविताफ या संग्रहातली ही ३२ क्रमांकाची कविता. गर्भार असणारी एक स्त्री रानात बोरी बाभळीच्या सान्निध्यात भर दुपारी प्रसूत झाल्याची घटना कवितेचे मध्यवर्ती सूत्र आहे. ही स्त्री एकटी आहे; गर्भवती आहे, दिवस भरले असतानाही ती रानात एकटी आली आहे, याचा अर्थ ती कष्टकरी आहे. कदाचित वाळली लाकडे गोळा करण्यास ती रानात गेली असेल. तिच्या प्रसूत होण्याची घटना केळ सीताफळीला हळूच सांगत आहे, त्या दोघींच्या संवादातून एका स्त्रीच्या प्रसूत होण्याची घटना आपल्याला कळते.

कवितेचा रूपबंध, शब्दबंध मोठा अन्वर्थक आहे. कानोसा घेताना केळ अंगात कापते ही ओळ मोठी सूचक आहे. केळीच्या अंगी साक्षात स्त्रीतत्त्व आहे असा लोकसमज आहे. केळी देखील स्त्री सारखीच प्रसूत होते, अशी आदिम लोकानुभूती आहे. केळीचे प्रसूती क्षणी अंगभर, शहारणे, तिच्यातून कंपित असा स्वर निघणे या सार्या बाबी केळी आणि स्त्रीच्या संदर्भात अगदी थोड्या प्रमाणात का होईना, पण सारख्या आहेत.

कुण्या स्त्रीच्या प्रसूतीची साक्षात घटना स्त्रीमन आणि स्त्रीदेह लाभलेली केळ सीताफळी जवळ सांगत आहे; पण सांगण्यापूर्वी ती कानोसा घेते. कुणी ऐकत तर नाही ना? हे तपासण्यासाठी ती कानोसा घेते. हा कानोसा घेताना केळ अंगात कापते, येथे केळीच्या तनामनातील प्रसूती विषयीची स्त्रीसुलभ सलज्ज भावना दाटून येते आणि ती अक्षरशः अंगाअंगात कापते. केळ सीताफळीशी बोलण्याच्या संदर्भात केळीविषयीचा आदिम लोकसमज दडला आहे. या लोकसमजातून केळ सीताफळीच्या का हळूच सांगण्याच्या क्रियेचे उपयोजन कवितेत केले गेले आहे. केळ सीतफळीच्या कानात पुढील ओळी सांगते.

**बोरी वो बाभळी मायेच्या झाल्या नारी**
**केळ कमळण झाली प्रसूत दुपारी**

ज्याचे कोणी नाही, त्याच्या बोरी बाभळी हा देखील आदिम लोकसमज आहे. या बोरीबाभळींनी सीतेला देखील माया दिली, बोरी बाभळी मायेच्या नारी होऊन सीतेला, अहिल्येला, शकुंतलेला, शबरीला सतत मदत करणाऱ्या ठरल्या. बोरी बाभळी मायेच्या नारी होण्याचे प्रसंग लोकगीतांमध्ये अनेक ठिकाणी आहेत. लोकरामायणात तर बोरी बाभळीच्या मायाळपणाचे अनेक संदर्भ आहेत.

**सीताला वनवास कसा झाला आयका**
**अरण्य वनामध्ये बोरी बाभळी बायका**
**सीताबाई कवटाळती। बोरीबाभळी ऐकून**
**लक्षुमन देर गेले वनात सोडून**
**बाभळी हे ग बोरी। तुम्ही वनीच्या नारी**
**सीता घातली सांभाळी।**

लोकप्रतिभेने अनेक ठिकाणी बोरीबाभळीचे मायाळपण मुक्तपणे गायिले आहे. कापणाऱ्या अंगाने केळ सीताफळीच्या कानात सांगते- बोरी वोऽ बाभळी मायेच्या झाल्या नारी एकटी स्त्री दुपारी भर रानात प्रसूत झाली, तेव्हा बोरी बाभळी मायेच्या नारी झाल्या, त्यांनी तिला प्रसुतीच्या क्षणी स्त्रीला हवी असणारीक स्त्रीची मदत केली, आडोसा दिला. आपल्या बोलीत ओटी भरणे हा शब्दप्रयोग आहे. मातृत्व, सृजनशीलता आणि सौभाग्याचा केलेला गौरव या शब्दांत आहे. ओटी भरणे या संस्कृतीतील एका लहानशा विधीचे अर्थ मात्र फार सकारात्मक आहेत. ओटी भरण्याच्या विधीच्या माध्यमातून लोकसंस्कृतीने स्त्रीच्या ठायी असलेल्या सृजनशीलतेचा, संस्कारशील मातृत्वाचा गौरव केला आहे.

कवितेतील पुढच्या दोन ओळी अन्वर्थक आहेत.

कमळ झाली प्रसूत दुपारी, इथे केळ कमळण हा बोलीतला शब्द आहे. जैत रे जैत चित्रपटातल्या चिंब पावसानं रान झालं आबादानी.... या गीतात झाकू नको कमळणबाई. सखे लावण्याची खाणी या ओळीतही कमळण हा शब्द येतो. कमळण म्हणजे स्त्रीचे ओटीपोट. केळ कमळण हा स्त्रीच्या ओटीपोटाचाच उल्लेख आहे. केळीच्या उदरातून कमळासारखे फूल घेऊन जन्माला येणारे फळ आणि केळ कमळणातून म्हणजे ओटी पोटातून गर्भाशयातून जन्मणारा नवा जीव. या समाजधर्मामुळे केळ कमळण हा शब्द. झाकू नको कमळण बाई या ओळीतही कमळण म्हणजे ओटी पोट. नाभीच्या खालचा भाग. लावण्यखणी असणारी ती पावसात भिजत आहे. आभाळातल्या पावसाने आणि शृंगारसक्तीच्या पावसाने जिचे रान आबादानी झाली आहे. अशा अनिवार शृंगाराच्या ओढीच्या आवेगाच्या क्षणी झाकू नको कमळण बाई हे त्याचे शब्द मोठे सूचक आहेत.

केळ कमळण प्रसूत झाली दुपारी या ओळीत केळ कमळण या शब्दापूर्वी फक्त एक रेष आहे, म्हणजे रिकामी जागा आहे. ती स्त्री कोण होती? ते माहीत नाही आणि सांगण्याची गरजही नाही. उदरात गर्भ होता ती स्त्री प्रसूत झाली. बोरीबाभळी मायेच्या नारी झाल्या आणि उदरात गर्भ असणारी एक स्त्री प्रसूत झाली. ही घटना केळ अंगात कापत कापत सीताफळीच्या कानात सांगत आहे.

केळीसाठी ही घटना सामान्य नाही. एकट्या स्त्रीचे रानात बोरीबाभळीच्या साक्षीने, सान्निध्यात आणि मायेच्या नारी बनून केलेल्या मदतीने भर दुपारी प्रसूत होणे हे केळीसाठी आणि सीताफळीसाठी देखील मोठे अप्रूप आहे. अंगावर काटा आणणारे आहे, प्रसूतीच्या अनुभवाची जाण केळीला आहे. म्हणून तर ती अंगाने कापत असणाऱ्या अवस्थेत कानोसा घे सीताफळीच्या कानात सांगते. केळ आणि सीताफळीचे लोकगीतांमधील नातेही आदिम आहे.

**सीताबाईला ढवाळे। खाऊ वाटलं केळ। गर्भ आले सीताफळ।।** ढवाळे म्हणजे डोहाळे. गर्भासी आवडे मातेचा डोहाळा हे संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे शब्द येथे आठवणे स्वाभाविक आहे. गर्भाला सीताफळ संबोधण्याचा लोकसमज आहे.

(पान ६ वर)

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# नात्यांचं महावस्त्र- भाग आठ: 'आत्या' (माहेरच्या मायेचा एक हळवा कोपरा)

**नात्यांना काही नावे असतात आणि काही नात्यांना सुगंध असतो. नाव उच्चारलं की नातं समोर येतं; पण काही नाती आठवली की मनात एखादा गंध दरवळतो... जुन्या घराचा, अंगणातल्या तुळशीचा, उन्हाळ्याच्या सुट्टीचा, चुलीवरच्या स्वयंपाकाचा आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मायेचा!**



नात्यांचं महावस्त्र' विणताना आपण आतापर्यंत आईची 'मायेची पैठणी', बाबांची 'सह्याद्रीची ढाल', आजीची 'संस्कारांची शिदोरी', आजोबांचे 'सुरकुत्यांमधील शहाणपण', मामाचा 'माहेरचा समृद्ध दुवा' आणि मावशीची 'आईची प्रतिछाया' अनुभवली. या महावस्त्रात असाच एक हळवा, आपुलकीचा आणि माहेर-सासर या दोन घरांना जोडणारा रेशमी धागा म्हणजेच 'आत्या'!

तुम्ही म्हणाल, कशासाठी सांगत आहात ही नाती? तर नात्यांनीच कुटुंब आणि समाज जोडला जातो. आपलं जीवन समृद्ध होतं ते नात्यांमुळेच ना! आपल्याला एकट्याला काय महत्त्व आहे? जशी आईची बहीण म्हणजे मावशी, तशी वडिलांची बहीण म्हणजे आत्या. मावशी आणि आत्या... नावं वेगळी आहेत, नाती वेगळी आहेत; पण माया आणि प्रेम यात फरक नाही. कदाचित व्यक्तिपरत्वे थोडाफार फरक कोणाला जाणवू शकेल, पण त्याचा विचार इथे आपल्याला करायचा नाही.

वडिलांच्या बहिणीला आपण 'आत्या' म्हणतो. नात्यांच्या व्याख्येत ही माहिती अगदी पुस्तकी आणि बरोबर आहे; पण भावनेच्या कोशात 'आत्या' या शब्दाचा अर्थ एवढाच नसतो. आत्या घरातील सगळ्या नात्यांना व्यापून उरते. आत्या म्हणजे बाबांच्या माहेरची जिवंत आठवण. 'बाबांचं माहेर?' तुम्ही म्हणाल, अहो, माहेर आईचं असतं, बहिणीचं असतं; बाबांचं कसं असेल? पण मला वाटतं, बाबा लहान असताना ज्या गावी राहिले, ज्या घरात राहिले आणि आई-बाबा आदी ज्या व्यक्तींसोबत राहिले, ते ठिकाण म्हणजे त्यांचं माहेरच! एखाद्या स्त्रीला आपल्या माहेरची जेवढी ओढ असते, तेवढीच ओढ बाबांनाही त्यांनी बालपण जिथे घालवलं, ज्यांच्यासोबत घालवलं त्या नातेवाईकांची आणि मित्रांची असते. आणि आत्या म्हणजे बाबांच्या बालपणाची साक्षीदार! एकाच घरात वाढलेले, बरोबर जेवलेले, दंगामस्ती केलेले, भांडलेले, रुसलेले आणि पुन्हा हसलेले.

आईच्या माहेरची माणसं आपल्याला 'मामा', 'मावशी', 'आजोबा', 'आजी' म्हणून लहानपणापासूनच जवळची वाटतात. पण बाबांच्या माहेरची माणसंही तितकीच आपली असतात, हे जाणवायला कधी कधी थोडा वेळ लागतो. कारण वडील स्वतःच्या भावना फारशा बोलून दाखवत नाहीत; त्यांच्या माहेरच्या आठवणींचा कप्पा ते सहज उघडत नाहीत. पण जेव्हा आत्या घरी येते, तेव्हा बाबांच्या चेहऱ्यावर अचानक एक वेगळंच निष्पाप बालपण उमलतं. अरे, तू अजूनही तसाच आहेस! आत्याने बाबांना असं म्हटलं की आपण आश्चर्याने बाबांकडे पाहतो. कारण आपल्यासाठी ते शिस्तप्रिय बाबा असतात, पण आत्यासाठी तो अजूनही तिचा लहान भाऊ असतो! आत्या म्हणजे केवळ एक नातं नाही; ती आपल्या वडिलांच्या हरवलेल्या बालपणाची खरीखुरी साक्षीदार असते. बालपणात आत्या म्हणजे एक वेगळीच लाडकी व्यक्ती असते. उन्हाळ्याच्या सुट्टीत आत्याच्या गावाला जाणं म्हणजे जणू एखादी आनंदी सहलच! तिच्या घरात गेल्यावर आईच्या घरापेक्षा थोडं अधिक स्वातंत्र्य मिळतं. आईने जर आत्याकडे आपल्या मुलाच्या खोड्यांची तक्रार केली, तर आत्या बहुतेक वेळा मुलांचीच बाजू घेते. असू दे गं... मुलंच आहेत. थोडं खेळणार, थोडा दंगा करणार! आत्याच्या या एका वाक्यात भाच्याला मिळालेला हक्काचा जामीन असतो! पण आत्या फक्त लाड करणारी नसते, वेळ आली तर ती प्रेमाने समजही देते.

माझ्या लहानपणाच्या अनेक आठवणी आत्याशी जोडल्या गेल्या आहेत. त्या आठवणी लिहायच्या म्हटलं, तर आत्याच्या उल्लेखाशिवाय त्या पूर्ण होणारच नाहीत. तसं तर मला दीर्घकाळ आत्याची माया लाभली. आत्या आणि तिचे यजमान यांनी माझ्या मनावर उत्तम संस्कारांचं शिंपण केलं, त्यातून मी खूप काही शिकलो.

माझं लहानपण एका अगदी छोट्या खेड्यात गेलं. पण आत्या कल्याणला राहत असल्याने मी दर सुट्टीत तिच्याकडे जायचो. ग्रामीण भागात राहत असलेल्या माझ्यासारख्या अजाण मुलाला शहरी संस्कृतीचा स्पर्श आणि ओळख तिच्यामुळे झाली. त्यांनीच मला तेव्हा 'मनाचे श्लोक' हे पुस्तक भेट दिलं होतं. ते मला म्हणाले होते, विश्वास, हे श्लोक पाठ कर. ते पाठ झाले की मला सांग. त्याप्रमाणे मी तेव्हा सगळे श्लोक पाठांतर केले होते. त्यांनी त्यावेळी मला एक वही आणि पेन बक्षीस म्हणून दिले होते.

आज इतकी वर्षं उलटून गेली, तरी ती वही, ते पेन आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे ते 'मनाचे श्लोक' अजूनही माझ्या हृदयात कोरलेले आहेत. पुढे याच 'मनाचे श्लोकां'शी माझं नातं इतकं दृढ होईल आणि त्यावर माझ्याकडून एक विस्तृत लेखमाला लिहिली जाईल, याची त्या वेळी मला कल्पनाही नव्हती! काही नाती केवळ भेटीगाठींनी टिकत नाहीत; ती आठवणींच्या मुळांनी टिकतात. काळ जसजसा पुढे जातो, आपण मोठे होतो आणि मग शिक्षण, नोकरी, संसार, मुलं... प्रत्येकजण आपापल्या जगात रमतो. आत्याच्या घरच्या फेऱ्या कमी होतात, फोनवरच्या गप्पा कमी होतात. 'नंतर बोलू' म्हणता म्हणता असे अनेक 'नंतर' निघून जातात; पण नात्यातील 'अंतर' कधीच वाढत नाही.

आजच्या काळात कुटुंबाची व्याख्याही बदलली आहे. पूर्वी एकत्र कुटुंबात आत्याचं येणं-जाणं सहज असायचं. घर मोठं होतं, माणसं जास्त होती, अंगण मोठं होतं, माणसांची मनंही मोठी होती आणि वेळही भरपूर होता. पण आता काळानुसार सगळ्याच गोष्टींचा संकोच झाला आहे. माणसं जवळ असूनही वेळ दूर निघून गेला आहे. पूर्वी आत्या अचानक दारात उभी राहायची, काय गं, आलीस? असा प्रश्न विचारण्याआधीच घरात तिच्या स्वागताची तयारी व्हायची! आज कोणीच अचानक येत नाही. आधी फोन येतो-वेळ आहे का? तुम्ही घरी आहात का? सगळ्याच गोष्टी बदलल्या. आत्याच्या नात्यात आणखी एक सुंदर गोष्ट असते. ती आपल्या आईची नणंद असली, तरी अनेकदा आईची जिवाभावाची मैत्रीणही असते. दोघी एकत्र आल्या की जुन्या आठवणींची पेटी उघडते. बाबांच्या बालपणातील गमतीशीर किस्से बाहेर येतात आणि मग आपल्याला कळतं- आपले बाबा ज्या व्यक्तीला 'माझी बहीण' म्हणतात, तिच्यासाठी ते अजूनही 'दादा' किंवा 'भाऊ'च आहेत. भावाबहिणीचं नातंही अतिशय विलक्षण असतं. लहानपणी एकमेकांशी क्षुल्लक गोष्टीवरून भांडणारे, मोठे झाल्यावर एकमेकांच्या संकटात धावून जाणारे! संसाराच्या वाटेवर दोघे वेगवेगळ्या घरात गेले, तरी मनाच्या कोपऱ्यात त्यांचं माहेरचं घर कायम राहतं; आणि त्या घराची एक जिवंत खूण असते-'आत्या'. म्हणूनच, दुर्दैवाने जेव्हा वडील जग सोडून जातात, तेव्हा आत्याला होणारं दुःख फक्त भावाच्या जाण्याचं नसतं; तिच्या आयुष्यातील एक संपूर्ण मोठा अध्याय बंद झाल्याचं असतं. 'माझा भाऊ' म्हणत ज्याच्याशी ती आयुष्यभर बोलली, भांडली, हसली, रुसली... त्याचा आवाज अचानक कायमचा शांत झालेला असतो. त्या वेळी आत्याच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू पाहताना आपणही अंतर्मुख होतो. तेव्हा जाणवतं की नाती रक्तावर आधारित नसतात, आठवणींची मुळे त्याहून खूप खोल गेलेली असतात!

आत्या आणि भाचा-भाची यांचं नातंही तितकंच सुंदर. आई-वडिलांच्या शिस्तीच्या चौकटीबाहेर मायेची एक मोकळी खिडकी उघडी ठेवणारी व्यक्ती म्हणजे आत्या! आज भाचा मोठा झाला, त्याला स्वतःची मुलं झाली, तो स्वतः बाबा झाला; तरी आत्याच्या नजरेत तो अजूनही तोच छोटासा मुलगा असतो. किती मोठा झालास रे! हे वाक्य आत्या जितक्या वेळा म्हणते, तितक्या वेळा आपल्याला जाणवतं की तिच्या मनात आपण कधीच मोठे झालेले नसतो. आणि आजच्या कृत्रिम जगात ही गोष्ट किती दिलासा देणारी असते! आत्याला हिंदीत 'बुआ' म्हणतात. पण भाषा बदलली की नातं बदलत नाही. 'आत्या' म्हटलं की जशी आपल्या मनात मायेची एक ओळखीची प्रतिमा उभी राहते, तशीच 'बुआ' म्हटलं की हिंदी भाषिकांच्या मनातही! 'बुआ' या शब्दातही एक वेगळीच गोडी आहे. हिंदी घरात कदाचित बुआ के घर चलो! असं म्हटलं की बालपणाला आनंदाची चाहूल लागते, आणि मराठी घरात आत्याकडे चल! म्हटलं की बालपणाला पंख फुटतात! पण दोन्हीकडे स्वागत करणारा मायेचा हात मात्र अगदी सारखाच असतो. कारण नाती सीमा मानत नाहीत-'आत्या' असो की 'बुआ'!

आजच्या डिजिटल युगात नाती एका क्लिकवर जोडली जातात आणि एका क्लिकवर दूरही जातात. व्हिडिओ कॉलवर चेहरे दिसतात, संदेशांमध्ये शुभेच्छा येतात. पण आत्याने हातावर ठेवलेला उबदार हात, डोक्यावरून फिरवलेली मायेची थाप आणि काळजी घे रे! म्हणताना तिच्या आवाजात उतरलेली खरीखुरी काळजी... याला जगात कोणत्याही डिजिटल तंत्रज्ञानाचा पर्याय नाही. वय वाढतं तसं माणसाला महागड्या भेटवस्तूंपेक्षा माणसं अधिक हवीहवीशी वाटतात- विशेषतः आपल्या माहेरच्या आठवणींशी जोडलेली माणसं. कारण ज्या घरातून ती कधीतरी सासरी गेली, त्या घरातील माणसं, आवाज, हसणं-रडणं, रुसवे-फुगवे, सण-उत्सवांची लगबग... सगळं तिच्या मनात कुठतरी जिवंत असतं. तिच्या माहेरच्या आठवणींचा शेवटचा धागा कधी कधी तिच्या भावाच्या मुलांशी जोडलेला असतो. म्हणूनच आत्याला भेटणं म्हणजे केवळ एका नातेवाईकाला भेटणं नव्हे! ते आपल्या वडिलांच्या बालपणाला भेटणं असतं.

'आत्या' हे नातं माहेरच्या अंगणातल्या त्या जुन्या, समृद्ध झाडासारखं असतं... ज्याच्या सावलीत आपण कधीतरी खेळलो होतो, ज्याच्या फांद्यांवर कधी झोका घेतला होता; आणि आयुष्याच्या उन्हात खूप पुढे आलो, तरी ज्याची शीतल सावली मनातून कधीच जात नाही... आत्या म्हणजे त्या सावलीचं मायेचं नाव!

# ग्रहसंकेत

## (रविवार, २० सप्टेंबर ते शनिवार, २६ सप्टेंबर २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २० सप्टेंबर-** अदु:ख नवमी, भागवत सप्ताहारंभ, संत चुडामणी महाराज पुण्यतिथी देगलूर, सोमेश्वर भागवत सप्ताह प्रारंभ बिळाशी (शिराळा), चंद्रदेव जयंती उदासीन संप्रदाय वाशिम, अंबिका माता किरणोत्सव ममदापूर (निपाणी) ✻ **सोमवार, २१ सप्टेंबर-** रामकृष्ण परमहंस पुण्यतिथी, निसर्गदत्त महाराज पुण्यतिथी, ईश्वरभारती महाराज पुण्यतिथी बेलेश्वर (ता. जि.बीड), मंगळदेवग्रह जन्मोत्सव अमळनेर, सिद्धेश्वर रुद्राभिषेक मालगाव (मिरज), लक्ष्मणबुवा मोरजकर पुण्यतिथी आजरा ✻ **मंगळवार, २२ सप्टेंबर-** परिवर्तिनी एकादशी, कर्मवीर भाऊराव पाटील जयंती ✻ **बुधवार, २३ सप्टेंबर-** विषुव दिन, वामन जयंती ✻ **गुरुवार, २४ सप्टेंबर-** प्रदोष, गोविंद प्रभू जयंती (महानुभवीय), गोत्रीरात्री व्रतारंभ ✻ **शुक्रवार, २५ सप्टेंबर-** अनंत चतुर्दशी, सार्वजनिक गणेश विसर्जन, पर्युषण पर्व समाप्ती (दिगंबर), सूरदास ढेरे महाराज पुण्यतिथी कुपी कवठेमहाकाळ ✻ **शनिवार, २६ सप्टेंबर-** प्रोष्ठपदी पौर्णिमा, भागवत सप्ताह समाप्ती, संन्यासिना चातुर्मास समाप्ती, कुलधर्म, अन्वाधान, (पौर्णिमा महालय २९ सप्टेंबर २, ३, ७ किंवा १० ऑक्टोंबर यापैकी एका दिवशी करावा), श्री लाहिरी महाशय पुण्यदिन, श्री गणेश यात्रा मसूर

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २१, २३, २६ (१२ नंतर) सप्टेंबर ✻ बारसे- २१, २३, २४ सप्टेंबर ✻ जावळ- २३, २४, २५ (११ पर्यंत) सप्टेंबर ✻ **गृहप्रवेश-** २१, २३, २४ सप्टेंबर

### मेष :- संघर्ष करावा लागेल

इतरांकडून कमीत कमी अपेक्षा ठेवल्या तर जीवन आनंदी बनू शकते. चतुर्थात मंगळ तर व्ययात शनि यामुळे थोडा संघर्ष करावा लागेल. सोमवारचा बुध-गुरु लाभ योग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. महत्त्वाची कामे पूर्वार्धात करावीत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २१, २३

### वृषभ:- संधी स्वीकारा

स्वतःहून जास्तीत जास्त तडजोड केली तर जीवन यशस्वी बनू शकते. राशीतील हर्षलमुळे थोडे सामंजस्याने रहावे लागेल. बुध, गुरु लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. नोकरीत पदोन्नतीचे योग आहेत. थोडी तडजोड करून संधी स्वीकारा. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २०, २४, २५

### मिथुन:- कलागुणांचा विकास

आपण स्वतःच्या नजरेत योग्य असाल तर लोकांच्या नजरेकडे लक्ष देऊ नका. राशी स्वामी बुधाचा धनस्थ गुरुशी होणारा लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. उद्योग व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. वाहन सौख्य लाभेल. नव्या विचारांना चालना मिळेल. कलागुणांचा विकास होईल. शुभ ता. २१, २४

### कर्क:- उत्साहवर्धक घटना

लोकांच्या नजरा गरजेनुसार बदलत असतात, त्या ओळखल्या जाव्यात. राशीतील गुरुचा बुधाशी होणारा लाभ योग अंगीकृत कार्यात प्रगती करणारा आहे. उत्साहवर्धक घटना घडतील. योजलेल्या कामांना गती मिळेल. आत्मविश्वास वाढेल. सरकारी कामे करून घ्यावीत. प्रगतीच्या संधी लाभतील. गुढ शास्त्रात प्रगती घडेल. पुढचे पाऊल पडेल. शुभ ता. २३, २४

### सिंह:- फार दगदग नको

फक्त समाधान शोधा, अपेक्षा आयुष्यभर संपणाऱ्या नसतात. सुखेश, अष्टमेश मंगळ बारावा झाल्याने स्थावर व आरोग्यासाठी खर्च करावा लागेल. धनस्थ रवि, बुध अनुकूल आहेत. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. वैवाहिक सौख्य विलंबाने लाभेल. फार दगदग करू नका. शुभ ता. २१, २३

### कन्या:- नव्या संधी लाभतील

समाधानी माणसांना खोट्या मुखवट्याची गरज पडत नाही. राशीतील रवि, बुध अनुकूल फलदायी आहेत. गायन वादनादि कलेत प्रगती साधता येईल. बुध, गुरु लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. नोकरी व्यवसायात नव्या संधी लाभतील. अडचणींवर मात कराल. अपेक्षित संधी लाभतील. आत्मविश्वास वाढेल. अपेक्षित कामे होतील. नवे विचार साकार होतील. शुभ ता. २३, २५

### तुला:- मनासारखी प्रगती

आजी म्हणजे चालती बोलती ज्ञानाची शिदोरी असते. कर्मस्थ गुरुशी बुधाचा होणारा लाभ योग कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती करणारा आहे. राशी स्वामी शुक्र राशीतच असल्याने सौख्यादायी घटना घडतील. ज्ञानदान, वैद्यकीय अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. योजलेल्या कामांना गती येईल. अनुकूलता वाढत जाईल. फार चिंता करू नका. शुभ ता. २४, २५

### वृश्चिक:- आर्थिक प्रगतीचे योग

हरलात तरी आपल्या पराभवाची जास्त चर्चा व्हायला हवी. बुध- गुरुचा लाभ योग आर्थिक प्रगती करणार आहे. भाग्यवृध्दिंगत करणाऱ्या घटना घडतील. हौस मजेसाठी जास्त खर्च होणार आहे. गृहनिर्माण क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. जनसंपर्कातून चांगला लाभ होईल. शुभ ता. २१, २५

### धनु:- व्याप वाढवू नका

संघर्ष असावा की, लढतीचा आदर झाला पाहिजे. चौथा शनि, आठवा मंगळ प्रतिकूल असला तरी कार्यक्षेत्रात प्रगती साधता येईल. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. लाभातील शुक्र आर्थिक कामे यशस्वी करणारा आहे. विचाराने रहावे. अपेक्षित घटना घडतील. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. कामाचा व्याप वाढवू नका. शुभ ता. २३, २५

### मकर:- अडचणीची चिंता नको

एकटे उभे राहण्याची हिंमत ठेवा, जग ज्ञान देते, साथ नाही. बुध-गुरु लाभ योग भाग्योदयकारक घटना घडविणारा आहे. गृहसजावट, खाद्यपदार्थ अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. भाग्यस्थ रवि-बुध अनुकूलता वाढवतील. वेळीच मार्ग निघत जाईल. संततीशी मतभेद टाळावेत. शुभ ता. २३, २५

### कुंभ:- यांत्रिक क्षेत्रात प्रगती

माणसाने कुंडीतल्या नाही तर जमिनीत लावलेल्या झाडासारखं असावं. राशीतील राहू थोडे परावलंबित्व दाखवितो. विलंबाने पण चांगल्या घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात प्रगती साधता येईल. कलेत प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघेल. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. सरकारी कामांना विलंब लागेल. फार विचार करू नका. शुभ ता. २१, २५

### मीन:- दैवी कृपा लाभेल

मनाला मन ओळखतं, जे मनातून येतं, ते सरळ मनालाच भिडतं. राशीस्वामी गुरुचा बुधाशी होणारा लाभ योग आर्थिक प्रगती करणारा आहे. प्राप्तीचे प्रमाण विविध मार्गाने वाढणार आहे. योजलेली कामे चिकाटीने होतील. भागीदारीच्या व्यवसायात प्रगती साधता येईल. जुने येणे वसूल होईल. दैवी कृपा लाभेल. फार चिंता करू नका. शुभ ता. २१, २५

!! शुभ भवतु !!

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळके

# "अष्टांगयोग"

**योगदर्शनामध्ये योगाच्या प्रक्रियेत चित्ताच्या एकाग्रतेला फार महत्त्व देण्यात आले आहे. चित्त म्हणजे मन. व्यावहारिक अथवा पारमार्थिक कोणतीही गोष्ट घ्या. त्यात चित्ताची एकाग्रता अवश्य लागते. कुठलाही व्यवहार असो, तेथील यशापयश तुमच्या एकाग्रतेवर अवलंबून आहे. व्यापार, व्यवहार, शास्त्रशोधन, राजकारण, मुत्सद्देगिरी काहीही घ्या; प्रत्येक ठिकाणी जे यश मिळेल ते त्या त्या पुरुषाच्या चित्ताच्या एकाग्रतेवर आहे.**


नेपोलियनची अशी गोष्ट सांगतात की, युद्धाची व्यवस्था एकदा नीट लावून दिली म्हणजे तो समरभूमीवर गणिताचे सिद्धांत सोडवीत बसे. तंबूवर गोळे पडत, माणसे मरत; पण नेपोलियनचे चित्त गणितातच असे. एवढा तो मग्न होऊन जाई. केवढी ही एकाग्रता! अशी एकाग्रता होणे फार कठीण असते. कारण बाहेरचा अपरंपार संसार मनात भरलेला असतो. त्याचा त्याग केल्याशिवाय एकाग्रता अशक्य. हा भयानक संसार आपल्या अवतीभोवती सारखा फिरत असतो. साध्या प्रार्थनेची अथवा भजनाची गोष्ट घ्या.

आपण प्रार्थना करायला सुरुवात केली आणि जरा कुठे खुट्ट असा आवाज आला तर आपल्या चित्ताची एकाग्रता भंग. पण जो प्रार्थनेतून भगवंताशी तन्मय झाला, त्याला बाहेरच्या आवाजाशी काय देणेघेणे! तो त्याला ऐकूसुद्धा येणार नाही. पण चित्ताची एकाग्रता होणे अतिशय कठीण असते. संसारातील इतर अनेक विषय चित्ताची एकाग्रता होण्यामध्ये मोठेच अडथळे निर्माण करतात. या विषयांशी चित्ताचा संबंध जसजसा येईल तसतसा आकार धारण करणे हा चित्ताचा स्वभाव ठरतो. चित्ताचा संबंध एका क्षणी एका वस्तूशी येतो तर दुसऱ्या क्षणी दुसऱ्या वस्तूशी येतो. त्यामुळे चित्ताची अवस्था एकच न राहता वस्तूनुसार सारखी बदलत असते. चित्ताच्या या बदलणाऱ्या अवस्थांनाच वृत्ती असे म्हणतात. पुरुषाचा वस्तूशी प्रत्यक्ष संबंध येत नाही तर या वृत्तींद्वारे येतो. चित्ताची एकाग्रता होण्यासाठी या अनावश्यक वृत्तींचा निरोध म्हणजेच प्रतिबंध आवश्यक असतो. यांचा, म्हणजेच चित्त आणि वृत्तींचा निरोध म्हणजेच योग. म्हणूनच मयोगश्चित्त वृत्ती निरोधः असे म्हटले आहे.

चित्ताला अशा प्रकारची स्थिरता आणि शुद्धता प्राप्त करण्याकरिता म्हणजेच चित्तवृत्ती निरोध कसा करावा हे अष्टांगयोगाच्या आठ पायऱ्यांद्वारे सांगितले आहे. (१) यम (२) नियम (३) आसन (४) प्राणायाम (५) प्रत्याहार, (६) धारणा (७) ध्यान व (८) समाधी. या आठ पायऱ्यांना योगाची अष्टांग साधने म्हणतात. या आठ पायऱ्या आता समजावून घेऊ. योगाची ही आठ अंगे योगदर्शनामध्ये पुढील सूत्रात सांगितली आहेत.

यमनियमासनप्राणायामप्रत्याहार
धारणाध्यानसमाधयोऽष्टावङ्गानि।।

(साधनपाद, सूत्र २९). योगाच्या या आठ अंगांपैकी पहिली पाच अत्यंत महत्त्वाची समजली जातात. त्यांचे अनुष्ठान यथावत् आणि पूर्णत्वाने झाले पाहिजे. यांना बहिरंग साधने म्हणतात. नंतरची तीन योगास पोषक म्हणून अनुष्ठेय आहेतच. पण योगातील प्रगती सर्वस्वी त्यावर अवलंबून नसल्याने साधकाने आपली एकंदर अंतर्बाह्य परिस्थिती असेल तद्रुसार यावच्छक्य आचरावी अशी आहेत. यांना अंतरंग साधने म्हणतात. या अष्टांगयोगातील पहिले अंग यम आहे. यम म्हणजे वाईट वृत्तींचे



दमन. मनुष्यमात्राच्या हातून जे व्यवहार घडत असतात त्या सर्वांचा संबंध त्याचे शरीर, वाणी आणि मन या तिहींशी येत असतो. यामुळे योगाभ्यासी पुरुषांनी आपल्या सर्व व्यवहारांचे आचरण अशा रीतीने करावयास पाहिजे की ते करीत असता आपल्या शरीराने, वाणी आणि मनानेही इतरांस दुःख होणार नाही. हे यम पाच आहेत. पुढील सूत्रात ते सांगितले आहेत.

अहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः (साधनपाद, सूत्र ३०). यातील पहिला प्रकार आहे अहिंसा. अहिंसा म्हणजे कोणत्याही प्राण्याला कायिक अथवा वाचिक कोणत्याही प्रकारे न दुखावणे तसेच कोणाही भुताचा मत्सर किंवा द्रोह न करणे. सत्य याचा अर्थ खोटे न बोलणे हे सर्वांनाच ठाऊक आहे. आपल्या अंतःकरणात कोणत्याही गोष्टीविषयी जे ज्ञान असते ते अगदी त्याच स्वरूपात दुसर्याच्या अंतःकरणात संक्रमित झाले पाहिजे अशा रीतीने बोलणे म्हणजे सत्य बोलणे. हे ज्ञान यथावत होणार नाही किंवा भलतेच ज्ञान होईल किंवा मुळीच ज्ञान होणार नाही अशा रीतीने बोलू नये. आपल्या मनातील आवश्यक ज्ञानापासून अन्यास मुद्दाम भरकटवू नये. अस्तेय म्हणजे परधनाचा अपहार न करणे. देहाधिकांच्या खऱ्या आवश्यकतेकरिता आणि खऱ्या आवश्यकतेपुरते विषयसेवन करणे हे स्तेय होत नाही. पण खऱ्या आवश्यकतेपेक्षा अधिक विषयांचा उपभोग घेणे हे तात्त्विकदृष्ट्या स्तेय होय. दुसऱ्याचे जे असेल त्याचा त्याच्या अनुज्ञेवाचून किंवा त्याला न कळविता उपभोग घेणे किंवा उपभोगार्थ अपहार करणे यास व्यवहारात आपण चोरी म्हणतो. यापासून दूर राहिले पाहिजे.

ब्रह्मचर्य हा चौथा यम. असलेल्या अन्नवस्त्रादिकांची तरतूद झाल्यावर कोणत्या एखाद्या विषयाकडे मनुष्य ओढला जात असेल तर तो स्त्रीविषयाकडेच ओढला जातो. असा मानव योगाभ्यासाला आणि तदंगभूत ब्रह्मचर्यव्रताचरणाला अनधिकारीच असतो. म्हणून आपल्या लैंगिक वासनांवर नियंत्रण ठेवणे हे अत्यंत आवश्यक असते. यानंतरचा पाचवा यम म्हणजे अपरिग्रह. स्वतःच्या सुखासाठी अनेक साधनांचा संग्रह करणे म्हणजे परिग्रह होय. जगण्यासाठी असा परिग्रह आवश्यकच असतो. पण असे अनेक विषय असतात की मनुष्याला त्याच्या शरीरासाठी आणि मनासाठी अनावश्यक विषयांचा आणि त्यांच्या साधनांचा आवश्यक संग्रह न करणे म्हणजे अपरिग्रह होय.

या पाचही यमांचा एकत्र विचार केला म्हणजे एक गोष्ट लक्षात येते की, या सर्वांच्या मुळाशी संयम ही महत्त्वाची गोष्ट अनुस्यूत आहे. मनुष्याच्या स्वभावाचा कल हा वरील नियम न पाळण्याकडेच असतो. या यमातील अ- हिंसा, अ- स्तेय आणि अ-परिग्रह हे तीन निषेध रूप असून सत्य आणि ब्रह्मचर्य हे विधिरूप आहेत. याचाच अर्थ असा की, जगद्व्यवहारात हिंसा, स्तेय आणि परिग्रह या गोष्टी अगदी स्वाभाविक आहेत. मनुष्याचा निसर्गतःच या गोष्टी करण्याकडे ओढा असतो. त्यामुळे या तिन्ही शब्दांमध्ये मअफ हा निषेधरूप शब्द लावून कमीत कमी हिंसा करणे, कमीत कमी स्तेयाचरण करणे आणि कमीत कमी परिग्रह करणे असा त्याचा अर्थ अभिमत असतो. उरलेल्या दोन शब्दांचे तसे नाही. सत्य आणि ब्रह्मचर्य हे भावरूप पदार्थ आहेत. पण मनुष्याचा स्वभाव नैसर्गिकरीत्या ह्या गोष्टींचे पालन करण्याकडे नसतो. तर अ- सत्य आणि अ-ब्रह्मचर्य यांच्याकडेच जास्त ओढा असतो.

जगद्व्यवहारात मनुष्य असत्याचरण आणि अब्रह्मचर्य यांचेच खुशाल अवलंबन करताना दृष्टीस पडतो. तेव्हा जीवांच्या हिंसा, स्तेय, परिग्रह, असत्य आणि अब्रह्मचर्य यांकडे असलेल्या नैसर्गिक प्रवृत्तींना आळा घालण्याकरिता प्रचंड संयमशक्तीची आवश्यकता आहे.

या सर्व यमांचे पालन केवळ कृतीतूनच झाले पाहिजे असे नाही तर त्याबद्दलचे वाईट विचारसुद्धा मनात यायला नको. जीझस ख्राईस्टने म्हटलेले प्रसिद्ध आहे की, एखाद्या महिलेकडे पापवासनेने पाहणे व्यभिचार करण्यासारखेच असते. त्यामुळे काया, वाचा आणि मनसा या तीनही तर्हेने आपण नसूनही तो त्यांचा संग्रह त्यांपासून पूर्णपणे अलिप्त राहिले पाहिजे.

पान १ वरून

# फोडणारेच फुटीच्या उंबरठ्यावर!

बहुसंख्य लोक आयर्लंडच्या एकीकरणाला अनुकूल असल्याचे दिसल्यास, सार्वमताची तरतूद त्यात आहे. स्कॉटलंडमध्ये २०१४ मध्ये झालेल्या स्वातंत्र्यावरच्या सार्वमतात, स्वतंत्र होण्याचा प्रस्ताव नाकारण्यात आला. परंतु, त्यानंतरचा ब्रिटन पूर्वीसारखा राहिलेला नाही. विशेषतः २०१६च्या 'ब्रेझिट'नंतर स्कॉटलंडमधील ब्रिटिश संघाविषयीची नाराजी अधिक तीव्र झाली.

स्कॉटलंडने युरोपियन संघात राहण्याच्या बाजूने मतदान केले, तर इंग्लंडच्या बहुमताने बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे 'ब्रिटिश' या सामूहिक ओळखीतील राजकीय प्राधान्याचा फरक स्पष्ट झाला. आज स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंडच्या सत्ताधारी पक्षांना मिळणारे राजकीय बळ, त्याच व्यापक बदलाचे लक्षण ठरावे. या समीकरणात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे उत्तर आयर्लंडविषयीचे विधानही महत्त्वाचे. आयर्लंडचे एकीकरण झालेले पाहायला आवडेल, असे त्यांनी अलीकडचे म्हटले होते. त्यामुळे, या घटनांच्या साखळीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. तथापि, स्कॉटलंड किंवा उत्तर आयर्लंड स्वतंत्र झाले, तर प्रश्न केवळ नकाशापुरताच राहणार नाही. ब्रिटनची सामरिक क्षमता, अर्थव्यवस्था, ऊर्जा-सुरक्षा आणि अटलांटिकमधील भूमिका यांवरही त्याचा परिणाम होईल. विशेषतः ब्रिटनचा अण्वस्त्रप्रतिबंधक कार्यक्रम स्कॉटलंडशीच संबंधित आहे. फासलेन येथे ब्रिटनच्या अण्वस्त्रधारी पाणबुड्यांचा तळ असून, कुलपोर्ट येथे ट्रायडंट अण्वस्त्रसाठ्याशी संबंधित सुविधा आहेत. स्कॉटलंड स्वतंत्र झाल्यास, या तळांचे भवितव्य हा लंडन आणि एडिनबर्ग यांच्यातील सर्वांत गुंतागुंतीच्या प्रश्नांपैकी एक ठरेल. ब्रिटनचे साम्राज्य एकेकाळी जगभर पसरले होते. 'फोडा आणि राज्य करा' ही नीती इंग्रजांनी अवलंबली. पण, आज त्याच ब्रिटनसमोर स्वतःची राजकीय सीमा टिकवण्याचा प्रश्न उभा आहे. युनायटेड किंगडमची खरी कसोटी आता एवढीच आहे की, स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड यांना ब्रिटनमध्ये राहणे, हे इतिहासाचे बंधन वाटते की, भविष्यासाठीचा स्वेच्छेचा निर्णय. या प्रश्नाचे उत्तर आता केवळ ब्रिटिश संसदच ठरवू शकणार नाही, हे मात्र नक्की!

पान २ वरून

# विवंचना

चण्याची खरेदी बंद करा. आमचा नाईलाज आहे. मालक चिडून बोलले, हा काय प्रकार आहे. इतके दिवसापासून नंबर लावला. आज माल आणा असा मॅसेज आला म्हणून आणला तर घेत नाही म्हणता. असं कसं करू शकता तुम्ही? साहेब, चिडू नका. आम्ही काय करू शकतो, आम्ही हुकूमाचे ताबेदार! दिलगिरीने अध्यक्ष बोलले... मालकाचे फोनवरील बोलणे ऐकून सर्व शेतकरी गोळा झाले...आम्ही हे सहन करणार नाही... आमचाच माल नं आमचेच हाल. गाडी भाडे, हमाली, माल भरायची मजुरी हे नुकसान कोण देणार? सर्व जमाव निदर्शने करू लागला. शेतकरी नेते आले. भाषणबाजी झाली. राजकीय नेत्यांना फोन लावले, पण उपयोग झाला नाही. राज्य सरकार केंद्र सरकारकडे बोट दाखवते व केंद्र राज्याकडे. व्यापारी तर कमी भावात शेतकऱ्याचे लचके तोडायला तयारच होते. वाट पाहून पाहून गाड्या गावाकडे निघाल्या. आसमानी संकटासोबत सुलतानी संकटाने बेजार पोशिंदा मात्र माल पिकवला तर विकावा कुठे, या विवंचनेचा कडू काढा मुकाट्याने पीत आहे. मनातल्या मनात म्हणू लागला.... विवंचनेचा कडू काढा कडूनिंबा संग पीतो आलं साल गेलं साल जीव मातीत जडतो... घरी भारत गेला तर बायकोने मोठ्यानं गळा काढला. तसा तो धावतच घरात गेला. म्हणाला, ऐ बाले काय झाले वं? अजी पोरीले दवाखान्यात घेऊन जा लागते. पोरीच पोट वज्जर दुखत हाय जी... अव तं, माल घेतला नाही नाफेड नं. आता कुठून लावू दवाखान्याले पैसा, कोण देणार वेळेवर! पैशाची जुळवाजुळव करता करता रात झाली. सकाळी सावित्रीच्या आवाजाने जाग आली. भारत घरात जाऊन पाहतो तर काय, पोर रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडली होती. सावित्री जोरानं बोंबल्ली, दुपवली व माय माही पोरगी, गेलं बाई पोटात लेकरू... भारतनं डोकं दोन पायात लपवून आपल्या न्याचारीले वाट करून दिली.

पान ३ वरून

# मर्चंट ऑफ व्हेनिस

काराकोरम १३ व्या शतकाच्या पूर्वार्धात मंगोल साम्राज्याची राजधानी होती. इ. स. ११७१ मध्ये तार्तर टोळ्यांनी चेंगीजखानला आपला राजा घोषित केले. त्याचा वंशज कुब्लाई खान हा सर्वश्रेष्ठ राजा आहे, असे तो सांगतो.

मार्को म्हणतो, तो शक्तिशाली, गोरापान, तेजस्वी आणि तरतरीत नाकाचा आहे. हिवाळ्याचे तीन महिने तो बीजिंगमध्ये राहतो. त्याच्या दरबारी तिबेटी आणि काश्मिरी ज्योतिषी आणि मांत्रिक आहेत. कागदी नोटांचा आणि चांदीच्या नाण्यांचा व्यवहार चीनमध्ये सातव्या शतकापासून सुरू होता. मार्कोमुळे युरोपातही कागदी चलनाची संकल्पना पोचली. तुतीच्या झाडाचा गाभा काढून कागद बनवतात. प्रत्येक नोटेवर अधिकाऱ्याचा सही-शिक्का असतो. शेंदरी रंगाचा शिक्का असलेली नोट वैध ठरते. अवैध नोट बनवणाऱ्यास फाशीची शिक्षा दिली जाते.

जळणासाठी लाकूड न वापरता दगडी कोळसा वापरला जातो. खानाची टपालसेवाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. राजाचे हुकूम घेऊन घोडेस्वारांचे पथक वेगवेगळ्या प्रांतात जाते. दर २५ मैलांवर घोडा सरायीत दला जातो आणि नवीन घोडा ताज्या दमाने पुढचे २०० मैल अंतर पार करतो. पायी टपाल घेऊन जाणारे तीन मैल अंतर धावत पार करतात. ते धावताना त्यांच्या कमरेला बांधलेल्या घंटा गोड किणकिणत असतात. तीन मैल धावून झाल्यावर थांब्यावरचा कारकून नोंदवहीत तपशील उतरवून नवीन दमाच्या माणसाच्या हातात टपाल सोपवतो. वाटेतल्या नदीनाल्यांमध्ये जलसेवा उपलब्ध असते. गाव १० दिवस दूर असले तरी टपाल दोन दिवसात पोचते. कुब्लाई खानाच्या राजवाड्याच्या मध्यवर्ती एक भव्य घंटा टांगलेली असते. रात्रीच्या प्रहरी तीनदा घंटानाद झाल्यावर कोणीही घराबाहेर पडण्याची हिंमत करीत नाही. फक्त मूल जन्माला आल्यास किंवा एखादी आपत्ती आल्यास नागरिक घराबाहेर पडू शकतात. कुब्लाई खानाचा आदर्श सम्राट अशोक होता. त्याच्यासारखीच त्याने आपल्या साम्राज्याच्या राजरस्त्यांच्या कडेला झाडे लावली. धर्मशाळा बांधल्या. जनतेसाठी धान्याची कोठारे उभारली. साथीचा रोग जनावरांमध्ये पसरला तर तो सरकारी मदत द्यायचा. गरीब लोकांना मोफत कपडे वाटायचा. कुब्लाई खानाबद्दल मार्को नेहमीच सहृदयतेने लिहितो.

प्रवासामध्ये काहीही सुखसोयी उपलब्ध नसताना मार्कोने कोणत्या मनस्वी उर्मीने व्हेनिसचे आरामाचे जीवन सोडून आशिया खंडात प्रवास केला असेल, कोण जाणे. पण त्याच्या मनस्वी उर्मीमुळे आणि अथक धडपडीमुळे भारताच्या आणि आशिया खंडातील मध्ययुगीन इतिहासाचा तो एक महत्त्वाचा दुवा ठरला. मार्को पोलो वाचल्याशिवाय आपल्याला आजचा भारत, आजूबाजूचे शेजारी देश आणि आशिया खंड समजत नाही. मार्को शेवटी तुरुंगामध्ये गेला आणि तेथे त्याला प्रवास वर्णन लिहिण्यासाठी वेळ मिळाला. नियतीचा हा अद्भुत खेळच म्हणायचा. नाहीतर विदेशी माणसाच्या नजरेतून मध्ययुगीन भारताचे दर्शन आपल्याला कधीच घडले नसते!

पान ५ वरून

# बोरी बाभळीची माया...

त्यामुळे लोकगीतांसह महानोर यांच्या कवितेतही केळ आणि सीताफळीच्या संवादाचे उपयोजन आदिम लोकरहाटी, लोकवाणीमुळेच झाले असावे. केळ कमळण झाली प्रसूत दुपारी या ओळीपाशी केळी सीताफळीचा संवाद संपतो. आणि प्रसूतीनंतरची घटना कथन करणाऱ्या ओळी पुढे येतात.

**सुने माळरान, डोळा रुखे रुखे ऊन**
**पोटी लपेटून निघे सासुरवाशीण..**

ती रानातून बाहेर पडली, सारे माळरान सुने सुने अहे. जंगल नाही, खुरटी झुडपे, भकास वाटणारे माळरान, ऊन रुखे रुखे आहे. डोळ्यांना सुखावणारे मुळीच नाही उलट ते रुखेपण डोळ्यांना भेडसावणारे आहे; या भकास, उजाड पार्श्वभूमीवर शेवटची ओळ येते. पोटी लपेटून निघे सासुरवाशीण. नुकतेच जन्मलेले पोर उराशी कवटाळून, पोट फडक्याने बांधून सासुरवाशीण निघाली आहे. ती सासुरवाशीण आहे, पण तिला माहेर नाही. हे सासुरवाशीण या शब्दानेच सूचकपणे सांगितले आहे. प्रसूतीच्या वेळी माहेराची आठवण साहजिक आहे.

प्रसूतीच्या वेळी तिला रानातल्या बोरीबाभळीने माहेरची माया दिली आहे. लोकवाणीतील शब्द आणि लोकजीवनातील लोकसमाजाचे सूचक उपयोजन यामुळे ही कविता अक्षरशः लावण्यवती झाली आहे. आपण जेव्हा जेव्हा ना. धों. महानोर यांची ही कविता वाचतो, तेव्हा तेव्हा रामायणापासून आजतागायत भर दुपारी रानावनात बोरीबाभळींच्या सान्निध्यात प्रसूत होणाऱ्या अगणित स्त्रियांचे शब्दात न मावणारे दुःख मनात रुंजी घालते.

परराष्ट्रकारण

कौस्तुभ वीरकर

# पाकिस्तानचा नवा फास...



**पाकिस्तानला एक विचित्र आजार जडला आहे. स्वतःच्या अंगावरच्या जखमा भरलेल्या नाहीत; पण जगाच्या जखमांवर मलमपट्टी करण्याची त्याला घाई. स्वतःच्या घरात बलुचिस्तान धुमसत आहे, अफगाणिस्तानची सीमा अस्थिर आहे, अर्थव्यवस्था अजूनही 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी'च्या उपकाराखाली आहे आणि राजकारणावर लष्कराची सावली अधिकाधिक गडद होत आहे. तरीही, पाकिस्तानने आता सौदी अरबच्या सुरक्षेची हमी घेण्याचा विडा उचलला आहे.**

अलीकडेच पाकिस्तान, सौदी अरब आणि तुर्कीये यांनी 'मक्का संयुक्त संरक्षण करार' केला. 'तिघांपैकी कोणावरचाही हल्ला, तिन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल,' अशी या कराराची मूलभूत तरतूद. हा करार आक्रमणासाठी नव्हे, तर सामूहिक प्रतिबंध आणि संरक्षणासाठी असल्याचे पाकिस्तानने म्हटले होते. परंतु, आंतरराष्ट्रीय राजकारणात करारातील शब्दांपेक्षा परिस्थितीच त्याचे अर्थ ठरवते. अलीकडेच सौदी अरबवर 'हुतीं'नी हल्ले केल्यावर पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी पाकिस्तान करारातील आपली बांधिलकी पाळण्यास बाध्य असल्याचे विधान केले. त्यामुळे कालपर्यंत असणारी प्रतिबंधात्मक व्यवस्था, प्रत्यक्ष लष्करी जबाबदारीत रूपांतरित होण्याची भीती पाकिस्तानसमोर निर्माण झाली आहे.

पाकिस्तानची मूलभूत चूक म्हणजे, सामरिक क्षमता आणि सामरिक महत्त्वाकांक्षा यांची गल्लत करणे. या आधी सौदीच्या नेतृत्वाखालील लष्करी कारवाईत सहभागी होण्याचा प्रश्न आला होता, तेव्हा पाकिस्तानने सावध भूमिका घेत थेट युद्धात उतरणे टाळले. आज मात्र नव्या करारामुळे अशी तटस्थता राखण्याची मोकळीक पाकिस्तानसमोर उरलेली नाही. पाकिस्तानने स्वतःचे सामरिक महत्त्व सिद्ध करण्याच्या नादात, ही बांधिलकी स्वीकारली आहे. यामागे त्याचे आर्थिक आणि राजनैतिक गणित आहेच. परंतु, या लाभांच्या बदल्यात स्वीकारलेली जोखीम किती मोठी आहे, याचे भान पाकिस्तानला नाही. सौदीची सुरक्षा प्रश्नांत येमेनपासून लाल समुद्रापर्यंत आणि इराणपासून अमेरिकेपर्यंत अनेक शक्ती गुंतल्या आहेत. त्यामुळे पाकिस्तानने या करारातून प्रत्यक्षात एका व्यापक संघर्ष व्यवस्थेशीच स्वतःचे भवितव्य जोडले आहे.

विशेषतः इराणचा प्रश्न पाकिस्तानसाठी नाजूक आहे. सौदीचा भागीदार म्हणून पाकिस्तानला इराणविषयी कठोर भूमिका घ्यावी लागू शकते; पण इराण हा त्याचा शेजारी आहे. सौदीच्या सुरक्षेची बांधिलकी जर इराणविरोधी लष्करी भूमिकेत बदलली, तर पाकिस्तानसमोर बाह्य युद्धाइतकाच सीमासुरक्षेचाही प्रश्न उभा राहू शकतो. दरम्यान, या कराराचे पालन करण्यास सुरुवात झाल्याने त्याला केवळ कागदी स्वरूप राहिलेले नाही.

सौदीत या व्यवस्थेचे सचिवालय स्थापन होणार असून, सुरुवातीची तीन वर्षे त्याचे नेतृत्व पाकिस्तानकडे असेल. त्यामुळे पाकिस्तान केवळ लष्करी भागीदार न राहता, या नव्या सुरक्षाव्यवस्थेचा संस्थात्मक घटक ठरतो. पण, त्याच वेळी पाकिस्तानच्या स्वतःच्या सुरक्षेची स्थिती काय आहे? अफगाण सीमावर्ती भागातील तणाव, बलुचिस्तानातील हिंसाचार आणि दहशतवादी संघटनांच्या सक्रियतेमुळे त्याची सुरक्षा यंत्रणा, आधीच अनेक आघाड्यांवर गुंतलेली आहे. अशा परिस्थितीत मध्य- पूर्वेतील अतिरिक्त लष्करी बांधिलकी स्वतःहून ओढवलेले संकट आहे.

पाकिस्तानला कदाचित वाटत असेल की, या करारामुळे त्याचे सामरिक वजन वाढेल. पण, हा भ्रम आहे. दुसऱ्याच्या आर्थिक सामर्थ्यावर किंवा मित्रांच्या लष्करी क्षमतेवर विसंबून राहून स्वतःची भूमिका मोठी करता येते; युद्धाची किंमत मात्र शेवटी स्वतःलाच मोजावी लागते.

मध्य- पूर्वेतील संघर्ष किती वाढेल, इराणची पुढची चाल काय असेल, अमेरिकेची भूमिका किती बदलेल किंवा 'हुतीं'ची प्रतिक्रिया कुठेपर्यंत जाईल, यांपैकी एकाही गोष्टीवर पाकिस्तानचे नियंत्रण नाही. तरी त्याने स्वतःला त्या समीकरणात बांधून घेतले आहे.

आज त्याच्यासमोर खरी कसोटी सौदीचे रक्षण करण्याची नसून, स्वतःला अनावश्यक युद्धात ओढले जाण्यापासून वाचवण्याचीच आहे. राष्ट्राचे वजन वाढवण्यासाठी दुसऱ्याच्या संघर्षाचे ओझे उचलणे, ही रणनीती नसते. पाकिस्तान आज स्वतःच्या जखमा भरून काढण्याऐवजी दुसर्याच्या युद्धाची जबाबदारी स्वीकारत आहे. संकट त्याने निर्माण केलेले नसेलही; पण त्यात ओढले जाण्याचा दरवाजा मात्र त्याने स्वतःच उघडला आहे.



# आकाशातून जमिनीवरील नजर अधिक भेदक

अंतराळ

अजय तिवारी

अंतराळातील प्रत्येक यश हे केवळ विज्ञान- तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे प्रतीक नसते. त्यामागे देशाच्या सुरक्षिततेपासून शेतीपर्यंत आणि आपत्ती व्यवस्थापनापासून पर्यावरण संवर्धनापर्यंत अनेक क्षेत्रांना नवी दिशा देण्याची क्षमता दडलेली असते. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) जिओसिंक्रोनस कक्षेत इमेजिंग उपग्रह यशस्वीपणे स्थापित केल्याने भारताच्या पृथ्वी निरीक्षण क्षमतेला नवा आयाम मिळाला आहे. या उपग्रहाकडे केवळ अंतराळातील आणखी एक यशस्वी प्रयोग म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. पृथ्वी निरीक्षण करणार्या उपग्रहांचे महत्त्व गेल्या काही दशकांत वाढले आहे. पूर्वी एखाद्या प्रदेशाचे चित्र मिळवण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी, विमान किंवा इतर पारंपरिक साधनांवर अवलंबून राहावे लागत असे. आता अंतराळातून मिळणारी छायाचित्रे, विविध प्रकारचे सेन्सर आणि त्यातून उपलब्ध होणाऱ्या माहितीचे संगणकीय विश्लेषण यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील बदलांचा सातत्याने मागोवा घेणे शक्य झाले आहे. विशेषतः जिओसिंक्रोनस कक्षेतील उपग्रह एखाद्या मोठ्या भौगोलिक क्षेत्रावर सातत्याने लक्ष ठेवू शकतात. आधुनिक आपत्ती व्यवस्थापनासाठी ही बाब अत्यं महत्त्वाची आहे.

भारतासारख्या भौगोलिक आणि हवामानाच्या दृष्टीने वैविध्यपूर्ण देशासाठी अशा उपग्रहांचे महत्त्व अधिक आहे. एका बाजूला हिमालयीन प्रदेशातील भूस्खलन, दुसरीकडे किनारपट्टीवरील चक्रीवादळे, तर अनेक राज्यांमध्ये पूर दुष्काळ आणि जंगलातील वणवे अशी विविध आव्हाने भारतासमोर असतात. एखादी नैसर्गिक आपत्ती आली की, सर्वप्रथम गरज असते ती अचूक माहितीची. ती तातडीने मिळाल्यास बचावकार्य अधिक परिणामकारकपणे आखता येते. उपग्रहांकडून मिळणारा डेटा या कामी निर्णायक ठरू शकतो. पूरस्थितीचे उदाहरण घेतले, तर जमिनीवरून संपूर्ण प्रभावित प्रदेशाचे चित्र एका वेळी मिळणे कठीण असते; मात्र उपग्रहाच्या मदतीने मोठ्या क्षेत्राचा आढावा घेता येतो. पाण्याचा विस्तार, पूरग्रस्त वस्त्या, शेतीचे नुकसान आणि वाहतुकीच्या मार्गांवरील परिणाम यांचे आकलन वेगाने होऊ शकते. उपग्रह हे केवळ छायाचित्र देणारे माध्यम न राहता निर्णय प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग बनेल. या उपग्रहाचा आणखीएक महत्त्वाचा उपयोग म्हणजे शेती.

हवामानातील बदल, पाण्याची उपलब्धता, जमिनीची गुणवत्ता आणि पिकांची स्थिती यांचे अचूक निरीक्षण करणे अत्यावश्यक आहे. शेतात प्रत्यक्ष जाऊन प्रत्येक पिकाची स्थिती तपासणे शक्य नाही; मात्र उपग्रहांच्या मदतीने मोठ्या क्षेत्रावरील पिकांची वाढ, वनस्पतींची स्थिती, जमिनीतील ओलावा आणि काही प्रमाणात पिकांवरील ताण याचा अंदाज घेता येतो. कोणत्या भागात पिकांची स्थिती समाधानकारक आहे, पाण्याची कमतरता कुठे आहे, अतिवृष्टीचा परिणाम कुठे झाला आहे किंवा कुठल्या प्रदेशात पीकहानीची शक्यता अधिक आहे, याचा व्यापक आढावा घेता येतो.

पीकविमा, नुकसानभरपाई, सिंचनाचे नियोजन आणि कृषी सल्ला या सर्व क्षेत्रांमध्ये अशा माहितीचा उपयोग होऊ शकतो; मात्र येथे एक महत्त्वाची अट आहे. उपग्रहातून मिळालेला डेटा शेतकऱ्यांपर्यंत आणि प्रशासनाच्या तळागाळातील यंत्रणांपर्यंत वेळेत पोहोचला पाहिजे. अंतराळातील माहिती केवळ सरकारी सर्व्हरवर किंवा संशोधन संस्थांच्या अहवालात अडकून राहिली, तर तिचा प्रत्यक्ष फायदा मर्यादितच राहील. पर्यावरणाच्या दृष्टीनेही पृथ्वी निरीक्षण उपग्रहांचे महत्त्व मोठे आहे. जंगलांचा विस्तार कमी होणे, जलस्रोतांमध्ये होणारे बदल, किनारपट्टीची धूप, शहरीकरणाचा वाढता वेग, जमिनीच्या वापरातील बदल आणि नैसर्गिक अधिवासांवर होणारे अतिक्रमण यांचा सातत्याने मागोवा घेता येतो.

आज हवामान बदलामुळे पृथ्वीवरील अनेक परिसंस्था वेगाने बदलत आहेत. या बदलांचे दस्तावेजीकरण आणि त्याचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी दीर्घकालीन उपग्रह डेटा अमूल्य ठरतो. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही अशा उपग्रहांचे महत्त्व दुर्लक्षित करता येणार नाही. देशाच्या विस्तीर्ण भूसीमा आणि समुद्रकिनाऱ्यामुळे सतत देखरेख ठेवणे हे मोठे आव्हान आहे. सीमावर्ती भागातील हालचाली, समुद्री क्षेत्रातील बदल आणि संवेदनशील प्रदेशांमधील घडामोडींचे निरीक्षण करण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञान हे महत्त्वाचे साधन ठरते. अर्थात, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित उपग्रह क्षमतांचा तपशील सार्वजनिक करणे योग्य नसले, तरी आधुनिक युद्धनीती आणि सुरक्षा व्यवस्थेमध्ये अंतराळ तंत्रज्ञानाचे स्थान आता निर्णायक झाले आहे, हे निर्विवाद आहे. यामुळे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाकडे केवळ वैज्ञानिक अभिमानाच्या दृष्टीने पाहण्याऐवजी त्याचा आर्थिक आणि सामाजिक परिणामही समजून घ्यायला हवा. गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील अंतराळ क्षेत्रात खाजगी कंपन्यांचा सहभाग वाढला आहे. रॉकेट निर्मिती, उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण सेवा, डेटा विश्लेषण आणि अंतराळाधारित अनुप्रयोग अशा अनेक क्षेत्रांमध्ये नव्या उद्योगांना संधी निर्माण होत आहे. अंतराळ क्षेत्रातील स्टार्टअप्सची वाढ ही या बदलाची महत्त्वाची खूण आहे; मात्र पुढील आव्हान केवळ अधिकाधिक उपग्रह अवकाशात पाठवण्याचे नाही. खरी कसोटी आहे ती अंतराळातून मिळणाऱ्या माहितीचे जमिनीवरील उपयुक्त सेवांमध्ये रूपांतर करण्याची.

उपग्रहाने शेतातील ओलावा मोजला; पण त्याचा उपयोग शेतकर्याला योग्य वेळी सिंचनाचा सल्ला देण्यासाठी झाला नाही, तर तंत्रज्ञानाची क्षमता अपुरी वापरली गेली असेच म्हणावे लागेल. उपग्रहाने पूरग्रस्त भागाचा अचूक नकाशा तयार केला; पण तो बचाव पथकाला वेळेत उपलब्ध झाला नाही, तरी त्या माहितीचे मूल्य कमी होते. त्यामुळे 'स्पेस डेटा टू ग्राऊंड इम्पॅक्ट' ही पुढील टप्प्यातील भारताची महत्त्वाची दिशा असायला हवी. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांच्या विविध विभागांमध्ये अधिक चांगला समन्वय आवश्यक आहे.

कृषी, जलसंपदा, पर्यावरण, महसूल, आपत्ती व्यवस्थापन, संरक्षण आणि नगरविकास अशा विभागांनी उपग्रहाधारित माहितीचा एकात्मिक वापर केला पाहिजे. त्याचबरोबर स्थानिक प्रशासनाला ही माहिती समजण्यास आणि वापरण्यास सक्षम करणारी यंत्रणा उभी करावी लागेल. उपग्रह डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि भौगोलिक माहिती प्रणाली यांचा एकत्रित वापर झाला तर त्याचे परिणाम अधिक व्यापक असतील. भारताने अंतराळ क्षेत्रात आत्म निर्भरतेच्या दिशेने निश्चितच मोठी वाटचाल केली आहे. चंद्र, मंगळ, सूर्य आणि मानवी अंतराळ मोहिमांच्या दिशेने झालेल्या प्रगतीने भारताची वैज्ञानिक क्षमता जगासमोर सिद्ध केली आहे; परंतु त्याचा लाभ सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात जाणवेल, तेव्हाच अंतराळ क्षेत्राचे खरे सामर्थ्य सिद्ध होईल.

हवामानाचा अचूक अंदाज, शेतकऱ्याला वेळेवर कृषी सल्ला, पूरग्रस्त नागरिकांना जलद मदत, जंगलांचे संरक्षण, जलस्रोतांचे संवर्धन आणि सुरक्षित सीमांसाठी सक्षम निरीक्षण हीच अंतराळ तंत्रज्ञानाच्या यशाची खरी मोजपट्टी ठरेल. भारतासाठी ही केवळ आणखी एका उपग्रहाच्या प्रक्षेपणाची कथा नाही. ही 'अंतराळातील शक्ती' आणि 'जमिनीवरील गरज' यांना जोडण्याची संधी आहे. आकाशातून पृथ्वीवर ठेवलेली ही नजर जितकी अचूक असेल, तितके देशाचे नियोजन अधिक सक्षम होईल आणि विज्ञानाचा अंतिम उद्देशही अंतराळ जिंकण्यापेक्षा पृथ्वीवरील जीवन अधिक सुरक्षित आणि शाश्वत बनवणे असेल.

राजकारण

विजय कुलकर्णी

# राजस्थानात हार की गूंज

**नुकत्याच घोषित झालेल्या राजस्थानमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेने काँग्रेसच्या 'हाता'ला ठेंगाच दाखविला. राजस्थानमध्ये ३१८ नगरपालिका, नगर परिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच संपन्न झाल्या. त्यांपैकी जवळपास २३९ नगरपालिका, महानगरपालिका आणि नगर परिषदांमध्ये भाजपने विजयी घोडदौड केली. त्यामुळे या निकालांतून राजस्थानच्या जनतेने मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि केंद्रातील मोदी सरकारवर विश्वास व्यक्त केल्याचे दिसून आले.**

राजस्थानमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे अवघ्या देशाचे लक्ष होते. कारण, दिल्लीतील 'जंतरमंतर'वरील आंदोलनाच्या नकारात्मक वातावरण निर्मितीनंतर या निवडणुका पार पडत होत्या. तसेच काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी 'छात्रो की गूंज'ची सुरुवातही राजस्थानच्या कोटा शहरातूनच केली होती. कारण, कोटा हे शहर 'कोचिंग क्लासेसची फॅक्टरी' म्हणून ओळखले जाते. देशभरातील विद्यार्थी स्पर्धा- परीक्षांच्या तयारीसाठी कोटामध्ये वास्तव्यास आहेत. म्हणूनच, राहुल गांधींनी विद्यार्थ्यांचा मोदी सरकारविरोधी असंतोष उफाळून यावा, यासाठी कोटाची निवड केली खरी. हजारोंची गर्दीही जमवली. पण, तरीही कोटावासीयांनी काँग्रेसवर विश्वास दर्शविलेला नाहीच.

कोटा महानगरपालिकेच्या निवडणुकीत १०० पैकी भाजपला ५५ जागांवर, तर काँग्रेसला ४० जागांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे जनतेने काँग्रेसची 'झूठ की गूंज' साफ नाकारल्याचेच यावरून स्पष्ट होते. बिहारमधील बांकीपूरच्या पोटनिवडणुकीत प्रशांत किशोर यांच्या विजयानंतर भाजपची ताकद ओसरल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. परंतु, राजस्थानच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीने विरोधकांच्या या 'फेक नॅरेटिव्ह'ला सुरुंग लावला आहे. तसेच राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या नेतृत्वावर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांच्या तोंडावरही कुलुप लागले आहे. एकीकडे राजस्थानात भाजपच्या जनाधारावर शिक्कामोर्तब होत असताना, राहुल गांधींसह काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांना ही 'हार की गूंज' चपराक लागवणारीच म्हणावी लागेल.

### काँग्रेसची 'झूठ की गूंज'

लोकशाहीत विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षांना धोरणांवरून धारेवर धरणे, ही नैसर्गिक प्रक्रिया. पण, विरोध करताना नेमका तो विरोध कोणत्या मुद्द्यांवर करावा आणि त्या विरोधामागचे तर्क काय, तथ्य काय, हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे. पण, दुर्दैवाने राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाला तर्क, तथ्य यांच्याशी दुरान्वयाने संबंधच उरलेला नाही. विरोधी पक्षच मुळी इतका कमकुवत, ढिसाळ असल्यामुळे त्यांच्याकडे जनता सत्ताधारी या चष्म्यातून पाहूच शकत नाही, हेच वास्तव. विरोधक म्हणून यांची अशी दैना उडालेली असेल, तर सत्ताधारी म्हणून यांना संधी दिलीच, तर हे देशालाच बुडवल्याशिवाय गप्प बसणार नाही, अशी यांची गत! विरोधकांच्या विरोधासाठी विरोध करणाऱ्या अलीकडच्या दोन उदाहरणांकडे पाहू.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात 'ब्रिक्स परिषद' सर्वस्वी यशस्वी झाली. त्यावरून मोदी सरकारवर टीका करायची, तर काय आणि कशी, असा प्रश्न राहुल गांधींना पडला असावा. मग काय, त्यांनी चक्क 'ब्रिक्स परिषदे'साठी शाकाहारी जेवण पाहुण्यांसाठी उपलब्ध करून दिल्याच्या मुद्द्यावरून टीका केली. त्यामुळे खाण्या-पिण्याच्या मुद्द्यावरून नाहक वाद निर्माण करून चर्चेत राहण्याचाच हा केविलवाणा प्रकार!

तीच गत 'यूपीआय'बाबतच्या निर्णयाची. दोन हजार रुपयांवरील 'यूपीआय' व्यवहारांवर केंद्र सरकार सरसकट शुल्क आकारणार, म्हणून राळ उडवून राहुल गांधी मोकळे झाले. पण, सरकारने यापूर्वी आणि काल पुन्हा स्पष्ट केले आहे की, 'यूपीआय' व्यवहारांवर सर्वसामान्य ग्राहकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच, भविष्यात 'एमडीआर' आकारला गेला, तर तो नाममात्र असेल, जो दुकानदारांना भरावा लागेल. याचाच अर्थ, 'यूपीआय'चे ९६ टक्के व्यवहार, एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीसोबत केलेले 'यूपीआय' व्यवहार यांवर कोणतेही शुल्क नसेल. त्यामुळे नैराश्यग्रस्त राहुल आणि काँग्रेसच्या या 'झूठ की गूंज'ची पुन्हा पोलखोल झाली आहे.



# लोकमान्य गणपत्युत्सव : ज्ञान, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव!

मागोवा

शैलेंद्र रिसबूड



१४ विद्या ६४ कलांचा अधिपती असलेला गणनायक, सर्वांसाठी प्रथम पूजनीयच. मराठी वाङःमयात संतांनीही, त्यांच्या कवनाप्रारंभी गजाननाची करुणा भाकल्याचे दिसते. ते स्वातंत्र्यलढ्यातही लोकमान्य टिळकांनीही गणरायाच्या उत्सवाला सार्वजनिक स्वरुप देत, स्वातंत्र्याचा मंत्र जनमानसाला दिला. आज गणरायाच्या उत्सवाचे स्वरुप ते त्याचे गणरायाचे रुप यांवर सर्वदूर चर्चा घडतना दिसते. अशावेळी संत ज्ञानेश्वर आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारातील गणरायाच्या आणि त्याच्या उत्सवाचा मागोवा घेणारे लेख...

पुण्याचे आणि गणेशोत्सवाचे नाते अतूट आहे. तेथील गणेशोत्सवास मार्गदर्शन लाभले, ते खुद्द लोकमान्य टिळकांचे! मेळे, शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम, नामवंत वक्त्यांची व्याख्याने, यामुळे पुण्यातील गणेशोत्सवाची शोभा सुरुवातीपासूनच वाढली. धार्मिकता, पारंपरिकता आणि सामाजिक समरसतेचे दर्शन येथील उत्सवात घडते. सध्या सजीव- निर्जीव पौराणिक व ऐतिहासिक देखावे, रोशणाईयुक्त सजावट, मोठे महाल आणि ढोल- ताशा पथके यांचा जमाना आला असून, तंत्रज्ञानावर आधारित देखावे आणि सामाजिक प्रबोधनपर देखावेही इथे दिसतात. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर या गणेशोत्सवाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे, कळत-नकळत प्रभाव पाडला आहे; आपला ठसा उमटवला आहे. अर्थातच, हे सारे अतिशय सहजतेने आणि स्वाभाविकपणेच होऊन गेले.

लोकमान्य टिळकांना भारतीय आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरांची सखोल जाण होती. ‘भगवंताचे अधिष्ठान’ आपल्या ‘राजकारणा’ला व हिंदूंच्या सामर्थ्यवर्धनास उपयोगी पडावे असेच त्यांना वाटे. हिंदूंनी संघटित व्हावे व अन्यायाचे निर्दालन करावे, अशी तळमळही लोकमान्य टिळकांना लागली होती. पण, त्यासाठी नवा पंथ, नवी संस्था कशाला? जुन्या उत्सवांनाच नवे स्वरूप देण्याचे त्यांनी ठरविले. यासाठी त्यांनी घरोघरी होणार्या हिंदूंच्या गणेशोत्सवासच, सार्वजनिक स्वरूप दिले, एक समाजहिताचे साधन बनवले आणि राजकीय जागृतीचा पाया घातला. गणेशोत्सवाच्या मेळ्यांतील पदांनी, सर्व स्तरांतील लोकांपर्यंत हे जागृतीचे लोण पोहोचवले. दहा-दहा दिवस शेकडो सार्वजनिक गणपतींपुढे व्याख्याने होऊ लागली, कीर्तने रंगू लागली, पोवाडे खणाणू लागले आणि मेळे दणाणू लागले. एकेक मेळा म्हणजे पाच-पंचवीस तरुणांचा, कसलेल्या शरीराचा व लाठी-कवायत शिकलेल्यांचा ताफाच असे. खड्या आवाजाने भक्तीचे सूर काढणाच्या कार्यकर्त्यांचे ते जणू शिबीरच. हे मेळे म्हणजे स्वराज्याचे मळेच!

उत्सवाद्वारे लोकांना धार्मिक, नैतिक व राजकीय शिक्षण देणारे लोक, जुन्या व नव्या लोकांस अत्यंत प्रिय वाटतात, अशी शिकवण ‘केसरी’तून वारंवार देऊन, टिळकांनी सुशिक्षितांना गणेशोत्सवाकडे वळविले. लोकमान्य टिळकांना भारतीय सांस्कृतिक प्रबोधनाच्या आधारेच, देशवासीयांमध्ये देशभक्तीची प्रेरणा निर्माण करायची होती. त्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतले. यात ‘सार्वजनिक गणेशोत्सवा’चा उल्लेख प्रामुख्याने करता येईल.

‘सार्वजनिक सभे’चे काम करत, गणेशोत्सव सुरू करताना लोकमान्यांनी विचारपूर्वकच पावले टाकलेली होती. पारतंत्र्यामुळे स्वाभिमानशून्य झालेल्या समाजात स्वत्वाची जाणीव निर्माण व्हावी आणि त्याचबरोबर समाजातील शक्तींचा योग्य रीतीने अविष्कार व्हावा, यासाठीच टिळकांनी विविध चळवळी व उपक्रम सुरू केले. हे उपक्रम यशस्वी करण्यासाठी ते लोकशिक्षण करीत. त्यासाठी त्यांनी ‘केसरी’तून लेखनही केले. गणपती उत्सवाबाबतचे लोकमान्यांचे लेखन वाचले, तर त्याबाबतीतील त्यांचा दृष्टिकोनही केवळ धार्मिक उत्सव सुरू करण्याचा नसल्याचे लक्षात येईल. गणपती उत्सवातून अध्यात्मपरता वाढावी अशीच टिळकांची भूमिका असती; तर त्यांनी त्यांच्या अग्रलेखांतून ‘गणपती’ या देवतेचे स्वरूप, मोक्षसाधनेतील उपासनेचे स्थान, याबद्दल विवेचन केले असते. परंतु, लोकमान्यांची ही भूमिका निश्चित नव्हती. गणपती उत्सवाला सामाजिक स्वरूप यावे, त्यानिमित्ताने विविध सामाजिक कार्यक्रम व्हावेत, भाषणांच्या द्वारा लोकजागृती व्हावी, असाच आग्रह लोकमान्यांनी धरला.

या दृष्टीनेच ‘केसरी’तून या विषयावर लिहिताना त्यांनी, गणपती उत्सवाच्या सामाजिक आशयावरच अधिक भर दिला. समाज एकत्र येऊन, त्याचा सामाजिक दृष्टिकोन जागृत झाला म्हणजे, मग राष्ट्रवादाची शिकवण चांगल्या रीतीने देता येईल, असे लोकमान्यांना वाटत होते. त्यांनी कायमच ‘गणेशोत्सवा’कडे, राष्ट्रवादाची आधुनिक संकल्पना समाजात रुजविण्याचे साधन म्हणूनच पाहिले. ‘कादंबरीकारास मात्र कल्पनागम्य देखावा,’ असे वर्णन करून, टिळकांनी १८९४च्या उत्सवाचे आणि रम्य देखाव्यांचे हृद्य वर्णन मोठ्या उल्हासाने पुढीलप्रमाणे केले आहे- गणपतीच्या मूर्ती खरोखरच प्रेक्षणीय होत्या. मेळ्यांचा सरंजाम पाहून तर आमची मतिच गुंग झाली. मेळ्यांतील प्रत्येक इसमाचा तो उज्ज्वल पोशाखातील धरण्यासाठीची हातात धरलेली त्याची ती चित्रविचित्र काठी, एकाच ठेक्याने पडणारे सर्वांचे ते पाऊल, पद्ये म्हणणारांचा तो मनोहर आवाज, बाकीच्या लोकांचे भक्तिरसाने ओथंबलेले ते गाणे, सर्वत्र स्वधर्माच्या स्तुतीने भरलेले ते कर्णमधुर आलाप, आमच्या मराठेबंधूंचा तो वीरश्रीपूर्वक उत्साह आणि त्यांची ती भव्य निशाणे इत्यादि गोष्टी एके ठिकाणी नव्हे, दोन ठिकाणी नव्हे, शंभर ठिकाणी पाहण्याचा आम्हांस अलभ्य लाभ झाला.

लोकमान्य टिळकांची गणेशोत्सवात होणारी भाषणे त्या काळाचा विचार केल्यास, चांगलीच स्फोटक होती. लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला जे राष्ट्रीय महोत्सवाचे स्वरूप दिले ते काकासाहेब खाडिलकरांनुसार, लोकांच्या स्वाभाविक ओघाला कोणते वळण दिले असता राष्ट्रहित सहजगत्या साधणारे आहे, ते लोकनायक होऊ पाहणार्यांने लोकांत मिसळूनच समजावून घेतले पाहिजे. गणेशोत्सवातील भाषण असो, अथवा मार्केटात बोलावयाचे असो, लोकांना जागे करण्यासाठी आणि प्रतिकाराला सिद्ध करण्यासाठी त्यांनी वाणीचा जितका उपयोग केला, तितका दुसऱ्या कोणी क्वचितच केला असेल. ‘कायद्याने सुधारणा होता कामा नये,’ हा आग्रह टिळकांनी ज्याप्रमाणे सुधारकांविरुद्ध धरला; त्याचप्रमाणे ‘असा कायदा करून आमच्या धार्मिक चालीरीतीत ढवळाढवळ न करण्याचे तुम्ही आश्वासन दिले आहे, त्याला जागा,’ असा इशाराही त्यांनी राज्यकर्त्यांना दिला. गणेशोत्सवाला त्यांनी व्यापक सार्वजनिक स्वरूप दिले. धार्मिक भावनेचा व ऐतिहासिक परंपरेचा आश्रय घेण्याच्या व सामान्य शेतकऱ्यांमध्ये व मध्यमवर्गीयांमध्ये असंतोष निर्माण करण्याच्या या तंत्राचा अवलंब टिळकांनी केल्यामुळे, राज्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी संशय निर्माण होऊ लागला. कारण, धार्मिक भावना दुखावल्या गेल्यास त्याचे परिणाम काय होतात, याची थोडीशी चुणूक १८५७च्या बंडात राज्यकर्त्यांना दिसली होती. धार्मिक भावनेच्या आधारावर हिंदू व मुसलमान एकत्र आल्याचे, ते अखेरचे महत्त्वाचे उदाहरण होते. यामुळेच धर्मभावना प्रबळ असल्यामुळे तिच्या आधारावर दोन्ही जमातींना एकत्र येऊ देता कामा नये, हेच इंग्रजांच्या राजकीय धोरणाचे एक महत्त्वाचे सूत्र झाले. निरनिराळ्या प्रश्नांवर पद्धतशीरपणे असंतोष निर्माण करण्यास टिळकांनी प्राधान्य दिले आणि त्याचबरोबर धार्मिक भावनेच्या साहाय्याने, अधिकाधिक लोकांना एकत्र आणण्याचेही प्रयत्न त्यांनी केले.

‘गणपत्युत्सव’ सुरू करण्यामागे लोकमान्य टिळकांचे विविध हेतू होते. यात उत्तमातील उत्तम कीर्तने व्हावीत, प्रवचने व्हावीत, प्रबोधनात्मक कार्यक्रम व्हावेत, शूरवीरांचे दांडपट्टे लोकांनी बघावेत, पारंपरिक विद्यांचे आणि कलांचे दर्शन तिथे व्हावे; त्यातून १८ पगड जाती एकत्र येऊन, सर्व समाजबांधवांनी उत्सव साजरा करावा, असे त्यांना वाटे. १८९५च्या ‘यंदाचा गणपत्युत्सव’ या लेखात, टिळकांनी उत्सवाच्या वाढत्या प्रमाणाबाबत आनंद व्यक्त केला आहे. त्यात राष्ट्राचा अभ्युदय, ऐयाची वृद्धी, एक धर्म, एक राजा आणि एक भाषा ही राष्ट्रीयत्वाची प्रधान अंगे असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. गणेशोत्सवाच्या सुरुवातीच्या काळात, टिळकांच्या व्याख्यानांचे विषय ‘तत्त्वज्ञान’ असे. सुक्ष्मरित्या पाहिल्यास, टिळक ‘गीता-रहस्य’ची तयारीच मनोमन करीत असल्याच दिसते.

१९०७ सालच्या गणेशोत्सवात लोकमान्य टिळकांनी जी व्याख्याने दिली, त्यात त्यांच्या मनात उसळणारा संताप एकसारखा व्यक्त होत होता. या भाषणात उमटलेल्या शब्दामागे विलक्षण निर्धार होता. ते म्हणत, सध्याची स्थिती जर तुम्हास असह्य झाली नसेल, तर हे राष्ट्र जितया लवकर मरेल तितकेच बरे! कृतघ्न लोकांनी या भूमीला भार होण्यापेक्षा, दुसरे कोणी येऊन ती सनाथ करतील हे त्यांचे उद्गार! १९१४च्या गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत टिळकांनी भाग घेऊ नये, ही सरकारची इच्छा टिळकांनी मान्य केली. त्यावेळी ही इच्छा ‘त्या वर्षापुरतीच मान्य’ असेही पुण्याच्या कलेटरला त्यांनी कळवले.

एवढेच नव्हे, तर त्या उत्सवात ‘राजद्रोही’ पुढार्यांचा जयजयकार करू नका, फार काय तर त्यांच्या नातेवाइकांचाही पुष्पहारादिकांनी गौरव करू नका, असा बंदीचा हुकूमच ‘मॅजिस्ट्रेट’ने सोडला. गणेशोत्सवाचे स्वरूप दिवसेंदिवस वाढत चालले. त्याचे महत्त्व चिरोल साहेबाने पुढील शब्दांनी वर्णिले आहे, आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठिंबा असला म्हणजे चांगले, या उद्देशाने हिंदुस्थानातील अत्यंत लोकप्रिय देव जो गणपति, तो आपल्या सर्व चळवळींचेच आदिदैवत करण्याची लुप्ति टिळकांनी लढविली. सार्वजनिक गणेशोत्सव १३०व्या वर्षापुढे पाऊल टाकावयाला निघाला असताना, या उत्सवाचा वेगवेगळ्या अंगांनी, मोकळेपणाने आणि निकोप दृष्टीने विचार करणे गरजेचे झाले आहे. आपल्या स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप द्यावयाचे ठरविले, ते सर्वसामान्य माणसापर्यंत राजकीय विचार जाऊन पोहोचावा, त्याच्या अंतःकरणाला तो भिडावा यासाठीच.

ब्रिटिश साम्राज्यवादाचे जोखड झुगारायचे असल्यास, कोणत्या दिशेने जावयाला हवे, काय काय करायला हवे याचे स्पष्ट, नेमके आणि रेखीव चित्र लोकांच्या डोळ्यांसमोर उभे राहावे यासाठीच. सामान्य माणसाचा बुजरेपणा, सत्तेपुढे भयभीत होऊन वाकण्याचा भेदरटपणा जावा, पारतंत्र्यात खितपत पडायचा प्रसंग आल्यास कोणती पावले उचलावीत याची जाणीव व्हावी; शिवाय चार माणसे जोडून एक विचाराची बळकट संघटना उभारल्याशिवाय हे कार्य तडीला नेता येणार नाही, हे मनात पक्के रुजवण्यासाठी राष्ट्रीय उत्सवासारखे एखादे माध्यम हवे, आपल्या हाती एक नवे शस्त्र पाहिजे, ही गोष्ट लोकमान्यांनी अचूक हेरली होती.

# ‘यूपीआय’च्या शाश्वततेला काँग्रेसी विरोध

ज्या काँग्रेसने काही वर्षांपूर्वी ‘यूपीआय’च्या उपयुक्ततेविषयीच शंका उपस्थित केली होती, आज पुन्हा तीच काँग्रेस ‘यूपीआय’वरील ‘एमडीआर’च्या शुल्कआकारणीलाही विरोध करुन जनतेची दिशाभूल करताना दिसते. त्यामुळे जनतेने काँग्रेसी अपप्रचाराला कदापि बळी न पडता, ‘यूपीआय’मागचे शाश्वत अर्थकारणही समजून घ्यायला हवे.

राजकारण

प्रतिनिधी




भारतातील डिजिटल अर्थव्यवस्थेच्या यशाची चर्चा होताना, ‘यूपीआय’चा उल्लेख हा अपरिहार्य असाच! २०१६ मध्ये सुरू झालेल्या या व्यवस्थेने रोख पैशावर आधारित व्यवहारांची सवय आमूलाग्र बदलून टाकली. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ‘यूपीआय’च्या माध्यमातून सुमारे २४ हजार १६२ कोटी व्यवहार झाले आणि त्यांचे मूल्य ३१४ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक होते. ऑगस्ट २०२६ मध्येच सुमारे २ हजार ४०० कोटी व्यवहारांतून २९.८७ लाख कोटी रुपयांची उलाढाल झाली. आता इतक्या प्रचंड प्रमाणावर चालणारी व्यवस्था देशाच्या डिजिटल पायाभूत सुविधेचा महत्त्वाचा भाग बनली आहे. तथापि, एवढी मोठी व्यवस्था चालते कशी, हा प्रश्नही उपस्थित व्हायलाच हवा. सर्व्हर, नेटवर्क क्षमता, सायबर सुरक्षा, फसवणूक प्रतिबंध, तांत्रिक देखभाल, ग्राहकसेवा आणि सततची क्षमता वाढविणे, यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्ची पडतो.

संसदेच्या वित्तविषयक स्थायी समितीने उद्योगाच्या अंदाजाचा दाखला देत ‘यूपीआय’ परिसंस्था चालविण्याचा वार्षिक परिचालन खर्च सुमारे २० हजार ७०० कोटी रुपये असल्याचे नमूद केले आहे. हा सरकारने केलेला स्वतंत्र खर्चाचा हिशोब नसून, उद्योगाचा अंदाज आहे, हे लक्षात घेणे आवश्यक. त्याचवेळी २०२६-२७ मध्ये ‘यूपीआय’ आणि कमी मूल्याच्या डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. म्हणजे अंदाजित खर्च आणि सरकारी प्रोत्साहन यांच्यात मोठी तफावत आहे. परंतु, दहा वर्षे ‘यूपीआय’ मोफत ठेवण्यामागे डिजिटल व्यवहारांना चालना देण्याचे सरकारचे प्रमुख धोरण होते. त्या काळात केंद्र सरकारने या परिसंस्थेला आर्थिक पाठबळ दिले. मात्र, व्यवहारांची संख्या हजारो कोटींवर पोहोचल्यानंतरही, त्याच पद्धतीने संपूर्ण खर्च सरकारी तिजोरीतून उचलत राहणे किती काळ शक्य आहे, हा स्वाभाविक प्रश्न. सरकारने याच कारणासाठी मोठ्या व्यापारी व्यवहारांवर मर्यादित ‘एमडीआर’ (मर्चंट डिस्काऊंट रेट)ची रचना आणली आहे. याचा अर्थ ‘यूपीआय’ महाग करण्याचा निर्णय असा नसून, त्याची आर्थिक शाश्वतता टिकविण्याचा हा प्रयत्न आहे, असे त्याकडे पाहावे लागेल. नव्या व्यवस्थेतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, ग्राहकांच्या खिशावर थेट शुल्क लादलेले नाही. एखाद्या व्यक्तीने दुसर्या व्यक्तीला केलेले ‘यूपीआय’ व्यवहार कोणत्याही रकमेचे असले, तरी ते शुल्कमुक्तच राहतील. व्यापाऱ्यांना केलेले दोन हजार रुपयांपर्यंतचे व्यवहारही शुल्कमुक्त राहतील. छोट्या व्यापार्यांसाठी शून्य ‘एमडीआर’ची स्वतंत्र तरतूद आहे. त्यामुळे सुमारे ९६ टक्के ‘पी२एम’ व्यवहार या नव्या ‘एमडीआर’च्या कक्षेबाहेर राहतील, असे अर्थमंत्रालयाने स्पष्ट केले आहे. ‘पी२एम’ म्हणजे ‘पर्सन टू मर्चंट’ अर्थात एखाद्या व्यक्तीने दुकानदार, व्यापारी किंवा व्यावसायिक संस्थेला केलेला डिजिटल पेमेंट व्यवहार. दोन हजार रुपयांपेक्षा अधिकच्या निवडक ‘पी२एम’ व्यवहारांवर ०.४ टक्के ‘एमडीआर’ लागू होईल. ७५ हजार रुपयांवरील व्यवहारांसाठी त्याची कमाल मर्यादा ३०० रुपये आहे. रेल्वे, दूरसंचार, विमा, इंधन आणि कृषी निविष्ठांसारख्या कमी नफ्याच्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवहारावर पाच रुपये निश्चित ‘एमडीआर’ ठेवण्यात आला आहे. भांडवली बाजाराशी संबंधित व्यवहारांसाठी ०.०२ टक्के दर आणि ३०० रुपयांची कमाल मर्यादा आहे. त्यामुळे ‘यूपीआय’वर ०.४ टक्के सरसकट कर असा कांगावा दिशाभूल करणारा ठरतो. ‘एमडीआर’ हा कर नाही. ते व्यापारी व्यवहाराच्या पेमेंट परिसंस्थेतील शुल्क आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सरकारने बँका आणि पेमेंट सेवा पुरवठादारांना ‘एमडीआर’चा भार ग्राहकांवर टाकता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. ‘एमडीआर’मधून मिळणारी रक्कम बँका, पेमेंट सेवा पुरवठादार आणि ‘यूपीआय’ अ‍ॅप पुरवठादार अशा परिसंस्थेतील घटकांमध्ये वितरित होणार आहे. त्यामुळे ग्राहकांकडून थेट शुल्क घेऊन ‘यूपीआय’ चालविण्याची व्यवस्था या निर्णयातून निर्माण होत नाही. याच निर्णयावर काँग्रेसने मात्र सरकार अमेरिकेच्या दबावापुढे झुकल्याचा आरोप केला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकार अमेरिकेच्या दबावासमोर झुकल्याचे म्हणाले. कारण, ‘यूपीआय’वर शुल्कआकारणी केल्यास त्याचा लाभ ‘व्हिसा’, ‘मास्टर कार्ड’सारख्या अमेरिकी कंपन्यांना होईल, हा त्यामागील तर्क. तसेच काँग्रेसकडून युक्तिवाद करण्यात आला की, मोठ्या व्यवहारांवरील शुल्क व्यापारी ग्राहकांकडून वसूल करू शकतात आणि त्यामुळे ‘यूपीआय’च्या मोफत व्यवस्थेला तडा जाईल. अर्थातच, हा राजकीय आरोप आहे. उलट संसदीय समितीनेच ‘यूपीआय’च्या आर्थिक शाश्वततेसाठी अधिक स्वावलंबी महसूल मॉडेलची गरज अधोरेखित केली होती, हे लक्षात घ्यायला हवे.

अमेरिकेच्या लाभाचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या काँग्रेसने जरा आपल्या सत्ताकाळातील डिजिटल अर्थव्यवस्थेचा इतिहासही आठवला पाहिजे. ‘व्हिसा’ आणि ‘मास्टरकार्ड’सारख्या आंतरराष्ट्रीय कार्ड नेटवर्कच्या माध्यमातून भारतात डिजिटल व्यवहार होत होते. त्या व्यवहारांवर ‘एमडीआर’ची व्यवस्था होती. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी तत्कालीन सरकारनेही काही शुल्कांमध्ये सवलती दिल्या. त्यामुळे डिजिटल व्यवहारांच्या अर्थकारणाचा प्रश्न आज अचानक निर्माण झालेला नाही. प्रश्न एवढाच आहे की, ‘यूपीआय’चा विस्तार झाल्यानंतर त्याचा वाढता खर्च कोण उचलणार? पण, आताच नाही तर यापूर्वीही ‘यूपीआय’ची व्यवहार्यता, ग्रामीण भागातील वापर आणि डिजिटल पायाभूत सुविधांची क्षमता याबाबत त्या काळात काँग्रेसकडून शंका व्यक्त झाल्या होत्या. आजच्या अनुभवाने त्या शंकांपैकी अनेकांना उत्तर दिले आहे. म्हणूनच आता ‘यूपीआय’च्या आर्थिक शाश्वततेवर चर्चा करताना जुन्या राजकीय भूमिकांपेक्षा आजची वस्तुस्थिती महत्त्वाची ठरते. काँग्रेसला ‘यूपीआय’च्या शुल्करचनेवर प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. व्यापार्यांवर नव्या शुल्काचा प्रत्यक्ष परिणाम काय होईल, त्याचा व्यवसायाच्या किमतींवर अप्रत्यक्ष परिणाम होईल का आणि ग्राहकांवर हा भार पडणार नाही, याची अंमलबजावणी किती काटेकोर होईल, यावर सरकारला उत्तरदायी धरलेच पाहिजे. खरं तर ‘यूपीआय’ची आजची व्याप्तीच त्याचे महत्त्व अधोरेखित करते. भारतात दर महिन्याला हजारो कोटी व्यवहार हाताळणारी ही व्यवस्था आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही विस्तारत आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये ‘यूपीआय’ने सुमारे २ हजार ४०० कोटी व्यवहार हाताळले. अशा व्यवस्थेची सायबर सुरक्षा आणि तांत्रिक क्षमता मजबूत ठेवण्यासाठी सातत्याने गुंतवणूकही आवश्यक. सरकारनेही कमी मूल्याच्या व्यवहारांना संरक्षण देत मोठ्या व्यापारी व्यवहारांमधून परिसंस्थेला मर्यादित महसूल मिळवून देण्याचा मार्ग निवडला आहे. ‘यूपीआय’ ही कोणत्याही एका सरकारची मालमत्ता नाही, तर ती भारताने उभारलेली डिजिटल सार्वजनिक पायाभूत व्यवस्था आहे. तिच्यावर टीका करताना सरकारला प्रश्न हे विचारले पाहिजेत आणि व्यापारी व ग्राहकांच्या हिताचे संरक्षण झालेच पाहिजे. मात्र, राजकीय आरोपांच्या ओघात या व्यवस्थेची वास्तविकता नाकारता कामा नये. दहा वर्षे मोफत सेवा दिल्यानंतर तिच्या शाश्वततेचा विचार होणे, अपरिहार्य असेच. दोन हजार रुपयांपर्यंतचे व्यवहार आणि छोटे व्यापारी शुल्कमुक्त ठेवून मोठ्या व्यवहारांवर मर्यादित ‘एमडीआर’ आणण्याचा निर्णय, हा त्याच दिशेने केलेला एक प्रयत्न आहे. त्यामुळे ‘यूपीआय’विरोधात काँग्रेसने मोहीम राबवण्याऐवजी त्याची तांत्रिक ताकद कशी वाढेल, यावर देशात चर्चा होणे अधिक संयुक्तिक ठरेल